रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २२७ । पृष्ठे १० ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

**पाहिजेत**

संस्थेअंतर्गत असणाऱ्या शासकीय / अशासकीय अनुदानातून सुरू असलेल्या विविध प्रकल्पामधून अकाउंटंट असिस्टंट, प्रकल्प व्यवस्थापक, प्रकल्प असिस्टंट, कौन्सिलर, जनसंपर्क प्रमुख इत्यादी विविध पदाकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवार पदवीधर BSW, MSW, B.Com, MBA अर्हता प्राप्त असावा. अनुभवींनी अपेक्षित मानधनासह ही जाहिरात प्रसिद्ध झाले पासून आठ दिवसात अर्ज करावेत. सदर पदे तालुकास्तरावर, जिल्हा स्तरावर व गाव पातळीवर असून ही पदे रायगड, ठाणे जिल्ह्यातून भरावयाचे आहेत. अर्ज खालील ई-मेलवर करावेत.msvtrecrutment.com, msvt.in

रायगड, शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६

# कृषीवल

किंमत ४ ₹

## बोर्डाच्या परीक्षेसाठी प्रशासन सज्ज

**रायगड :** राज्यातील दहावी-बारावीच्या परीक्षेत कॉपी टाळण्यासाठी अनेक भरारी पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. यंदा राज्यभरात दहावीचे १६ लाख १४ हजार ६७४ विद्यार्थी परीक्षेला बसणार असून, जवळपास ५,१११ परीक्षा केंद्रे तयार करण्यात आली आहेत. तर, बारावीचे १६ लाख ३० हजार विद्यार्थी परीक्षेला बसणार असून, यांच्यासाठी ३,३८७ परीक्षा केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. राज्यातील काही परीक्षा केंद्रांवर कॉपी प्रकरणे समोर आल्याने संबंधित क्रेंद्रावर त्वरित कारवाई करण्यात आली आहे. दहावीसाठी ३१ परीक्षा केंद्रे, तर बारावीसाठी ७६ परीक्षा केंद्रे रद्द केली आहेत.




## वे|ध|क

### जि.प.साठी ३८६, तर पं.स.साठी ६८६ अर्ज

**रायगड :** रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी उमेदवारी अर्जांची छाननी प्रक्रिया पार पडली. यात एकूण १६ उमेदवारी अर्ज बाद ठरविण्यात आले असून, त्यामध्ये जि.प.साठी पाच आणि पं.स.साठी अकरा अर्जांचा समावेश आहे. छाननीनंतर जि.प.साठी ३८६, तर पं.स.साठी ६८६ असे एकूण १,०७२ अर्ज वैध ठरविण्यात आले आहेत. अर्ज माघारीच्या प्रक्रियेनंतरच निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार असून, कोणते उमेदवार माघार घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.दरम्यान, उमेदवारी अर्जांवरील हरकती व त्यावरील सुनावणीमुळे माणगाव, खालापूर, पनवेल तालुक्यांमध्ये प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू होती. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक अधिकाऱ्यांना रात्री उशिरापर्यंत छाननीची प्रक्रिया पूर्ण करावी लागली.

# अलिबागमध्ये दीडशे अर्ज पात्र

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य पदांसाठी दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची छाननी गुरुवारी पार पडली. एकूण १५२ अर्जांपैकी दोन अर्ज अपात्र ठरवण्यात आले असून, १५० अर्ज पात्र ठरल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.



अलिबाग तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या जागांसाठी ही निवडणूक होत असून, गुरुवारी सकाळी उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी मुकेश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली अर्ज छाननी प्रक्रिया राबवण्यात आली. यावेळी विविध राजकीय पक्षांचे उमेदवार व कार्यकर्ते उपस्थित होते.

रायगड जिल्हा परिषदेच्या ५९, तर पंचायत समितीच्या ११८ जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. •> पान २ वर

## शिंदे गट ‘अपात्र’

**श्रीवर्धनमध्ये जि.प. उमेदवाराचा अर्ज फेटाळला**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या उमेदवारी अर्ज छाननीत शिंदे गटाला मोठा धक्का बसला आहे. बोर्ली पंचतन जिल्हा परिषद मतदारसंघातून शिंदे गटाकडून उमेदवारी दाखल केलेले मंगल पाभरेकर यांचा अर्ज छाननीत अवैध ठरवण्यात आला आहे. त्यामुळे श्रीवर्धन तालुक्यात शिंदे गट अपात्र ठरल्याची चर्चा आहे.

श्रीवर्धन तालुक्यात आराठी आणि बोर्ली पंचतन या दोन जिल्हा परिषद जागांसह दिघी, बोर्ली पंचतन, आराठी आणि बागमांडला या चार पंचायत समिती जागांसाठी निवडणूक होत आहे. •> पान २ वर

## महामार्गावर स्फोट

**पेणच्या वाशी नाका परिसरात भीतीचे वातावरण**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**



मुंबई-गोवा महामार्गावर गुरुवारी सकाळी सिलिंडरने भरलेल्या टेम्पोला आग लागून झालेल्या स्फोटामुळे पेण तालुक्यातील वाशी नाका परिसरात एकच खळबळ उडाली. या आगीत टेम्पोमधील नऊ सिलिंडरचा स्फोट झाला असून, वाहन पूर्णतः जळून खाक झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली •> पान २ वर

## पनवेल : महापौरपद ‘ओबीसी’साठी राखीव

**राज्यातील २९ महापालिकांच्या आरक्षणाची सोडत जाहीर**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्रातील महापालिकांच्या महापौरपदांसाठी आरक्षणाची सोडत नुकतीच जाहीर करण्यात आली असून, पनवेल महापालिकेचे महापौरपद हे इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आले आहे. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीत पनवेलमध्ये ओबीसी प्रवर्गातील उमेदवाराला महापौरपदाची संधी मिळणार आहे.

राज्य सरकारकडून जाहीर करण्यात आलेल्या या आरक्षणात राज्यातील एकूण २९ महानगरपालिकांचा समावेश आहे. या आरक्षण प्रक्रियेत महिलांसाठी मोठ्या प्रमाणावर जागा राखीव ठेवण्यात आल्या असून, अनेक महापालिकांमध्ये •> पान २ वर

### पालिकेतील भ्रष्टाचारप्रकरणी कारवाई करा : कडू

पनवेल पालिकेतील आस्थापना विभागात सुरू असलेल्या अनियमितता, अनागोंधी कारभार, पदोन्नतीमधील घोटाळे तसेच भ्रष्टाचाराच्या विविध प्रकरणांची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी नगर विकास विभागाकडे केली आहे. •> पान २ वर

## आठ माओवाद्यांचा खात्मा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

झारखंडच्या पश्मी सिंहभूम जिल्ह्यातील सारंडा जंगलात सुरक्षा दल आणि माओवाद्यांमध्ये झालेल्या भीषण चकमकीत एक प्रमुख माओवादी कमांडर अनल दा उर्फ तुफान ठार झाला. त्याच्यावर एक कोटी रुपयांचे बक्षीस होते. तसेच या चकमकीत आठ माओवादी ठार झाले आहेत. ही कारवाई कोब्रा आणि सीआरपीएफच्या संयुक्त पथकाने केली. ही कारवाई माओवाद्यांना मोठा धक्का मानला जात आहे.

## लष्कराचे वाहन कोसळून दहा जवानांचा मृत्यू

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

जम्मू-काश्मीरच्या दोडा जिल्ह्यात लष्कराचे एक वाहन दरीत कोसळून दहा जवानांचा मृत्यू झाल्याची घटना गुरूवारी घडली. भदरवाह-चंबा आंतरराज्य मार्गावर खन्नी टॉपजवळ हा अपघात झाला. तसंच या अपघातात अन्य ११ जवान जखमी झाल्याचे वृत्त आहे.

भदरवाहचे ब्लॉक मेडिकल ऑफिसर (बीएमओ) डॉ. वर्षा शर्मा यांनी सांगितलं की, एकूण २१



जवान एका वाहनातून प्रवास करत होते. त्यावेळी अचानक हे वाहन दरीत कोसळले. या अपघातात दहा जवानांचा मृत्यू झाला आणि दहा गंभीर जखमी झालेल्या जवानांना चांगल्या उपचारांसाठी रेफर करण्यात आलं आहे. तर, किरकोळ जखमी असलेल्या एका जवानावर भादरवाह रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच, वरिष्ठ पोलीस आणि लष्करी अधिकारी जखमी जवानांवर उपचार आणि त्यांच्या शिफ्टिंगची देखरेख करण्यासाठी भदरवाह रुग्णालयात दाखल झाले आहेत.






# ग्रामस्थांचा प्रवास धुरळ्यातून

## आंबिवली-एकसल रस्त्याच्या संथ कामाचा परिणाम

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत-कल्याण राज्यमार्गावरून आंबिवली व एकसल गावांकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने परिसरातील ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्याचे काम रखडल्यामुळे नागरिकांना धुळीमधून प्रवास करावा लागत असून, स्थानिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



कर्जत-कल्याण राज्य मार्गालगत आंबिवली ते एकसल गावांना जोडणाऱ्या या मुख्य रस्त्यावर मोरीचे काम सुरू असल्याने मार्ग पूर्णतः बंद करण्यात आला आहे. त्यामुळे दोन्ही गावांचा थेट संपर्क तुटला असून, प्रशासनाने दिलेला पर्यायी मार्ग अत्यंत खराब व कच्चा असल्याने संपूर्ण परिसरात धुळीचे साम्राज्य पसरले आहे. या रस्त्यावर पाणी मारले जात नसल्याने वाहनचालक व ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत आहे.

या परिस्थितीचा सर्वाधिक फटका शालेय विद्यार्थ्यांना बसत असून, धुळीमुळे लहान मुलांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. पालकांकडून श्वसनविकारांची भीती व्यक्त केली जात आहे. त्यातच गेल्या काही दिवसांपासून परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे समोर आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. पर्यायी रस्ता जंगलातून जात असल्यामुळे सायंकाळनंतर प्रवास करणे धोकादायक ठरत आहे.

रस्त्याचे काम वेळेत पूर्ण न झाल्यामुळे आंबिवली व एकसल गावांची कोंडी झाली असून, ग्रामस्थ संतप्त झाले आहेत. काँक्रिटीकरणाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करून मुख्य मार्ग तातडीने खुला करावा, पर्यायी रस्त्यावर नियमित पाणी मारून धुळीचा त्रास कमी करावा तसेच मोरीचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. धुळीमुळे मुलं आजारी पडत असून, रात्री बिबट्याच्या भीतीने घराबाहेर पडणे कठीण झाले आहे. प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन काम मार्गी लावावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## स्थानिक मागण्या मान्य

। पालघर । प्रतिनिधी ।

पालघर जिल्ह्यातील शेतकरी, कामगार व कोळी समाजाच्या मागण्यांसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेच्या वतीने काढण्यात आलेल्या लॉन्ग मार्चनंतर स्थानिक मागण्या मान्य झाल्याने पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावरील घेराव स्थगित करण्यात येणार आहे. मात्र, राज्यस्तरीय मागण्यांसाठी आंदोलन सुरूच राहणार असल्याचे माकपने स्पष्ट केले आहे. दोन दिवस पायी चालत हजारो शेतकरी पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचले होते. जिल्हाधिकाऱ्यांसोबत झालेल्या चर्चेत वनाधिकार कायद्याची अंमलबजावणी, वरकस व बेनामी जमिनी नावे करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम, तसेच रोजगार हमी कामांची उपलब्धता या मागण्या मान्य करण्यात आल्या.

## फणसाड अभयारण्यात मोजणार पक्ष्यांचा किलबिलाट



। पाली / बेणसे । प्रतिनिधी ।

> फणसाड वन्यजीव अभयारण्य हे जैवविविधतेच्या दृष्टीने अत्यंत समृद्ध आहे. 'सिटिझन सायन्स'चा मूळ उद्देशच सामान्य नागरिकांना संवर्धन प्रक्रियेत सहभागी करून घेणे हा आहे. या पक्षी गणनेतून मिळणारा डेटा भविष्यातील संवर्धन आराखडा तयार करण्यासाठी महत्त्वाचा वैज्ञानिक दस्तऐवज ठरेल. निसर्गप्रेमींनी या प्रक्रियेचा भाग व्हावे. - डॉ. निखिल भोपळे, व्यवस्थापकीय विश्वस्त, ग्रीन वर्क्स ट्रस्ट

रायगड जिल्ह्यातील निसर्गसंपन्न फणसाड वन्यजीव अभयारण्यात पुन्हा एकदा पक्ष्यांचा किलबिलाट मोजला जाणार असून, पक्षीप्रेमी व निसर्ग अभ्यासकांसाठी ही एक पर्वणी ठरणार आहे. 'ग्रीन वर्क्स ट्रस्ट' आणि महाराष्ट्र वन विभाग (ठाणे वन्यजीव विभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत 'फणसाड पक्षी गणना' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमात नागरिक, पक्षीमित्र आणि निसर्ग अभ्यासक सहभागी होऊन शास्त्रीय पद्धतीने पक्षी निरीक्षण व दस्तऐवजीकरण करणार आहेत. हा उपक्रम एसबीआय फाउंडेशनच्या 'CONSERW' (Conservation through Sustainable Engagements, Restoration and Wildlife Protection) कार्यक्रमांतर्गत राबवला जात असून, तो केवळ सहल नसून एक महत्त्वाचा 'सिटिझन सायन्स' उपक्रम आहे.

या उपक्रमात सामान्य नागरिक वैज्ञानिक पद्धतीचा वापर करून पक्ष्यांच्या प्रजातींची नोंद करतील. त्यामुळे फणसाड अभयारण्यात आढळणाऱ्या जैवविविधतेचा अधिकृत व शास्त्रीय दस्तऐवज तयार होण्यास मदत होणार आहे. कोकणातील मुरुडरोहा पट्ट्यात वसलेले फणसाड वन्यजीव अभयारण्य रातवा, बेडुकमुखी, गिधाडे, मलबारी धनेश यांसारख्या दुर्मिळ पक्ष्यांसाठी प्रसिद्ध आहे. शेकरू या महाराष्ट्राच्या राज्य प्राण्याच्या संवर्धनासाठी स्थापन झालेल्या या अभयारण्यात २५० हून अधिक पक्षी प्रजाती आढळतात. यामध्ये अनेक स्थलांतरित पक्ष्यांचाही समावेश आहे. या उपक्रमात सहभागी होण्याची इच्छा असलेल्या नागरिकांनी https://forms.gle/jec6pdQBU5i8ypKF7 या लिंकवर जाऊन अर्ज भरावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## अनंत देवघरकर यांना अष्टपैलू साहित्य जीवनगौरव पुरस्कार

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अष्टपैलू संस्कृती कला अकादमी मुंबई या संस्थेतर्फे ज्येष्ठ कवी माजी प्राचार्य अनंत केशव देवघरकर सर ह्यांना अष्टपैलू साहित्य जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा सोहळा १८ जानेवारी रोजी आळंदी येथे पार पडला.







अष्टपैलू संस्कृती कला अकादमी या संस्थेचे अनेक कवी स्पर्धक सदस्य असून, या संस्थेचे अध्यक्ष स्वतः अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असलेले ह.भ.प. शिवाजी खैरे हे सातत्याने मराठी भाषा संवर्धनाकरिता नियमितपणे प्रयत्नशील असतात. या संस्थेमार्फत दर महिन्याला राज्यस्तरीय काव्यस्पर्धा घेतल्या जातात. या स्पर्धा दिलेल्या तीन विषयांपैकी एका विषयावर दिलेल्या काव्यप्रकारात लिहिणे बंधनकारक असते. जे कवी सातत्यपूर्वक लेखन करतात त्यांना एक वर्ष, दोन वर्षे, तीन वर्ष चार वर्षे आणि पाच वर्षांकरीता अनुक्रमे अष्टपैलू काव्यलेखन, काव्यभूषण, साहित्यभूषण, साहित्यरत्न, साहित्य जीवनगौरव आणि अष्टपैलू साहित्य जीवन गौरव पुरस्कार अशा राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरविण्यात येते.

स्पर्धेसाठी कवी अनंत देवघरकर यांनी आतापर्यंत सातत्यपूर्वक ६० स्पर्धांमध्ये सहभाग घेतला असून, सर्व स्पर्धांमध्ये यशस्वी ठरले आहेत. सदर पाचही सन्मान अनंत देवघरकर यांनी संपादन केले आहेत.

या सोहळ्याचे अध्यक्षपद ज्येष्ठ साहित्यिक, कलावंत आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीचे विचारवंत डॉ. मधुकर घाणेकर यांनी भुषविले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून महंत ह.भ.प. रोहिदासधस महाराज आणि सौ. मायाशिंदे, प्रताप पाटील, ह.भ.प. अनुसया खैरे मॅडम इत्यादी मान्यवरांना आमंत्रित करण्यात आले.

अष्टपैलू कला अकादमीच्या कोषाध्यक्षा तसेच आदर्श शिक्षिका ह.भ.प. अनुसुया खैरे यांच्या प्रमुख उपस्थितीत साहित्य जीवनगौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले करण्यात आले. कवी अनंत देवघरकर यांनी आतापर्यंत अनेक संस्थांचे राज्यस्तरीय पुरस्कार संपादन केले आहेत. यासाठी त्यांना शाल, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

## सांस्कृतिक कार्य खात्याचा भोंगळ कारभार

। मुंबई । प्रतिनिधी ।

सांस्कृतिक कार्य विभागाच्या ढिसाळ व असंवेदनशील कारभारामुळे राज्यातील राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलावंत मानधन योजनेचा लाभ घेणाऱ्या लोककलावंतांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अद्याप सहा ते सात जिल्ह्यांत मानधन निवड समित्याच गठीत न झाल्याने तसेच अनेक ठिकाणी सन २०२३ पासूनचे ऑफलाईन अर्ज प्रलंबित असल्याने कलावंतांत तीव्र नाराजी आहे. या संदर्भात सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी यापूर्वी तांत्रिक अडचणी दूर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. मात्र, विभागातील अधिकारी या सूचनांकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे राज्यभर लोककलावंतांमध्ये असंतोष पसरला आहे. या योजनेंतर्गत एप्रिल २०२४ पासून सरसकट दरमहा पाच हजार रुपये मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, सध्या सुमारे ३८ हजार साहित्यिक व कलावंत या योजनेचा लाभ घेत आहेत.

## स्वीकृत नगरसेवक म्हणून गोपाळ भगत यांच्या नावाची चर्चा

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

स्वीकृत नगरसेवक म्हणून माजी नगरसेवक गोपाळ भगत यांच्या नावाची चर्चा असताना पक्ष जी जबाबदारी देईल, ती स्वीकारणार असल्याचे वक्तव्य शेकापचे माजी नगरसेवक गोपाळ भगत यांनी केले आहे. महाविकास आघाडीतर्फे भगत यांना स्वीकृत नगरसेवक म्हणून संधी देण्यात येणार असल्याच्या चर्चेनंतर त्यांच्याशी साधण्यात आलेल्या संपर्कानंतर त्यांनी ही प्रतिक्रिया दिली.



शेकाप नेत्यांनी दिलेल्या आदेशानुसार २०१७ मध्ये प्रभाग क्रमांक ९ मधून शेकापमधून निवडून आलेले माजी नगरसेवक गोपाळ भगत यांनी शेकापतून भाजपात प्रवेश केलेल्या माजी नगरसेवक रवींद्र भगत यांच्या विरोधात प्रभाग क्रमांक १० मध्ये निवडणूक लढली. मात्र, या लढतीत गोपाळ भगत यांचा पराभव झाल्याने पक्ष आदेश पाळणाऱ्या गोपाळ भगत यांना स्वीकृत नगरसेवक म्हणून शेकापकडून संधी दिली जाणार असल्याची चर्चा सध्या पनवेल परिसरात आहे. याबाबत अधिक माहिती घेण्यासाठी माजी नगरसेवक गोपाळ भगत यांच्याशी संपर्क साधला असता पक्ष जो निर्णय घेईल, तो निर्णय आपल्याला मान्य असल्याचे सांगत गोपाळ भगत यांनी आपल्या पक्षा प्रती आपली निष्ठा व्यक्त केली आहे.

नुकत्याच पार पडलेल्या पनवेल पालिकेच्या नगरसेवक पदाच्या निवडणुकीत शेकापचे माजी नगरसेवक गोपाळ भगत यांनी शेकापमधून भाजपात प्रवेश करून प्रभाग १० मध्ये निवडणूक लढवत असलेल्या रवींद्र भगत यांच्या विरोधात निवडणूक लढवली होती. गोपाळ भगत हे शेकापचे अनुभवी नेते आणि माजी नगरसेवक आहेत. पक्षातील त्यांची निष्ठा आणि संघटन कौशल्य पाहता, त्यांना महापालिकेत पुन्हा संधी देण्यासाठी स्वीकृत नगरसेवक म्हणून त्यांचे नाव आघाडीवर आहे.

पान १ वरून

## अलिबागमध्ये दीडशे अर्ज पात्र

यामध्ये अलिबाग तालुक्यात शहापूर, आंबेपूर, आवास, थळ, चेंढरे, चौल आणि कावीर असे सात जिल्हा परिषद गट असून, वैजाळी, शहापूर, आंबेपूर, रुईशेत भोमोली, आवास, किहीम, थळ, वरसोली, चेंढरे, आक्षी, रेवदंडा, चौल, कावीर आणि रामराज असे १४ पंचायत समिती गण आहेत.

या सात जिल्हा परिषद व १४ पंचायत समितीच्या जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीत एकूण २ लाख १ हजार ९२३ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. बुधवार (दि.२१) पर्यंत जिल्हा परिषदेच्या सात जागांसाठी ५६, तर पंचायत समितीच्या १४ जागांसाठी ९६ असे एकूण १५२ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते.
गुरुवारी सकाळी अकरा वाजल्यापासून सुरू झालेल्या छाननीत पंचायत समितीच्या दोन उमेदवारांचे अर्ज अपात्र ठरवण्यात आले. प्रतिज्ञापत्र सादर न केल्यामुळे हे अर्ज अवैध ठरविण्यात आल्याची माहिती उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी दिली.

## शिंदे गट 'अपात्र'

या निवडणुकीसाठी एकूण ३८ हून अधिक उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. १६ ते २१ जानेवारी या कालावधीत अर्ज भरण्याची प्रक्रिया पार पडली. बुधवारपर्यंत दाखल झालेल्या अर्जांची छाननी गुरुवारी करण्यात आली. या छाननीत जिल्हा परिषदेचा एक व पंचायत समितीचे दोन असे एकूण तीन अर्ज अवैध ठरवण्यात आले. यामध्ये बोर्ली पंचतन जिल्हा परिषद मतदारसंघातील शिंदे गटाचे उमेदवार मंगल पाभरेकर, तर दिघी पंचायत समिती मतदारसंघातील प्रथमेश नाकती आणि कल्पेश शेलार यांचे अर्ज अपात्र ठरवून बाद करण्यात आले आहेत. या निर्णयामुळे शिंदे गटाला तालुक्यात मोठा दणका बसला असून, बोर्ली पंचतन जिल्हा परिषद मतदारसंघात आता शेकापच्या उमेदवार शारदा नाईक यांच्यासह दोन उमेदवार रिंगणात राहिले आहेत. तर आराठी जिल्हा परिषद मतदारसंघात सात उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

पंचायत समिती मतदारसंघांमध्ये दिघी येथे दहा, बोर्ली पंचतन येथे सहा, आराठी येथे पाच आणि बागमांडला येथे पाच उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. श्रीवर्धन तालुक्यातील या निवडणुकीसाठी येत्या ५ फ ेब्रुवारी रोजी ८० मतदान केंद्रांवर मतदान होणार असून, ५६ हजार ८२६ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत.
दरम्यान, मंगळवार (दि.२७) रोजी दुपारी तीन वाजल्यानंतर अंतिम उमेदवारांची यादी जाहीर होणार असून, त्यानंतर तालुक्यातील निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.

## महापौरपद ओबीसी प्रवर्गासाठी राखीव

महिलांना महापौरपद भूषवण्याची संधी मिळणार आहे. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचा सहभाग वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

आरक्षणाच्या नियमांनुसार, अनुसूचित जमातीसाठी (एसटी) एकच महापौरपद राखीव ठेवण्यात आले असून, ते कल्याण-डोंबिवली महापालिकेसाठी आहे. अनुसूचित जातीसाठी (एससी) तीन महापौरपदे राखीव असून, त्यामध्ये ठाणे, जालना (अनुसूचित जाती महिला) आणि लातूर (अनुसूचित जाती महिला) यांचा समावेश आहे.इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गासाठी एकूण आठ महापौरपदे राखीव करण्यात आली आहेत. यामध्ये पनवेल, इचलकरंजी, चंद्रपूर, जळगाव, अकोला, अहिल्यानगर, उल्हासनगर आणि कोल्हापूर या महापालिकांचा समावेश आहे. यापैकी जळगाव, चंद्रपूर, अहिल्यानगर आणि अकोला या ठिकाणी ओबीसी महिलांसाठी आरक्षण देण्यात आले आहे.
उर्वरित १७ महापौरपदे ही सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव असून, त्यामध्येही अनेक ठिकाणी महिला उमेदवारांसाठी संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, नवी मुंबईसह अनेक प्रमुख शहरांमध्ये सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी आरक्षण जाहीर करण्यात आले आहे.

या आरक्षणामुळे महापालिकांच्या प्रशासनात वैविध्यता येणार असून, स्थानिक पातळीवर महिलांचे आणि मागासवर्गीयांचे प्रतिनिधित्व वाढण्यास मदत होणार आहे. मात्र, या नव्या आरक्षणामुळे सर्वच राजकीय पक्षांसमोर योग्य उमेदवार निवडीचे आव्हान उभे राहिले असून, आगामी काळात महापालिका राजकारणात मोठे बदल पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

## पालिकेतील भ्रष्टाचारप्रकरणी कारवाई करा : बच्चू कडू

पनवेल पालिकेतील कथित गैरप्रकारांबाबत प्रहार जनशक्ती पक्षाचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुनील शिरीषकर यांनी यापूर्वी सर्व कागदोपत्री पुरावे व संबंधित शासन निर्णयांसह पालिका आयुक्तांची भेट घेऊन कारवाईची मागणी केली होती. तसेच वेळोवेळी आयुक्तांकडे लेखी पत्रव्यवहारही करण्यात आला होता. मात्र, पालिका प्रशासनाकडून या तक्रारींची गंभीर दखल घेतली जात नसल्याचे दिसून आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

त्यानंतर ही बाब माजी मंत्री बच्चू कडू यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. त्यानुसार पालिकेत पदोन्नती प्रक्रियेत झालेला कथित घोटाळा, नियमबाह्य पद्धतीने क व ड संवर्गातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती तसेच कामोठे येथील एल.के. नामक विकासकाने केलेले तीन अतिरिक्त मजल्यांचे अनधिकृत बांधकाम या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी बच्चू कडू यांनी नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव तसेच नगर विकास मंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे.
ही माहिती सुनील शिरीषकर, रायगड जिल्हा उपाध्यक्ष, प्रहार जनशक्ती पक्ष यांनी निवेदनाद्वारे दिली आहे. या प्रकरणामुळे पनवेल पालिकेच्या कारभारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महामार्गावर स्फोट

नाही.मिळालेल्या माहितीनुसार, भारत गॅसच्या वरदान एजन्सीमार्फत सिद्धार्थ ठाकूर हे गॅसने भरलेले ४८ सिलिंडर आणि चार रिकामे सिलिंडर असे एकूण ५२ सिलिंडर घेऊन पेणमधील वाशी नाका येथून वडखळजवळील डोलवीकडे जात होते. मुंबई-गोवा महामार्गावरून जात असताना वाशी नाका परिसरात अचानक टेम्पोच्या इंजिनला आग लागली.
आगीचा भडका वाढताच टेम्पोमधील गॅस सिलिंडरने पेट घेतला आणि त्यातील नऊ सिलिंडर्सचा स्फोट झाला. भरदिवसा महामार्गावर झालेल्या या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, वाहतुकीवरही काही काळ परिणाम झाला.

घटनेची माहिती मिळताच पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल तसेच जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक अभिजीत बागुल यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. सुरक्षेच्या कारणास्तव परिसरात नागरिकांना जाण्यास मज्जाव करण्यात आला. तातडीने अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले.

पेण नगरपरिषद, नागोठणे येथील रिलायन्स कंपनी तसेच डोलवी येथील जेएसडब्ल्यू कंपनीच्या अग्निशमन दलाच्या मदतीने काही तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. स्थानिक नागरिकांनीही आग विझवण्यासाठी सहकार्य केले. या घटनेची पोलीस ठाण्यात आकस्मात आगीची नोंद करण्यात आली असून, आगीत टेम्पो व गॅस सिलिंडरचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. घटनेचा पुढील तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

दिनांक : २३ जानेवारी २०२६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिल यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मौजे - कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

| मालकाचे नाव. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.-आर-पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| ओंमकार किशोर हांडे<br>स्वप्नील रामदास मते | ४० | १२/क/३ | ००-७०-०० | ० | ८७ |
| | या पैकी विक्री केलेले क्षेत्र हे ० आर ३० पॉ ०० मात्र. | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही /-
ॲड.भुपेश तानाजी पेमारे
मो.नं.९१५८२७७७२८
दिनांक :- २३/०१/२०२६

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाच्या कब्जेदार मालक यांचेकडून जमिन मिळकत विकत घेण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन

तुकडी व जिल्हा रायगड, पोटतुकडी व तालुका - पनवेल, जि. परिषद रायगड. पंचायत समिती खालापूर, व मे. दुय्यम निबंधक साहेब, खालापूर यांचे अधिकार कक्षेतील मिळकतीचे वर्णन व कब्जेदारांची नावे मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे. मौजे - कलोते मोकाशी, ता. खालापूर, जि. रायगड

| अ. क्र. | गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. | कब्जदाराचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | २३ | ० | ०-०३-८० | ०.०३ | साहीम हाजी अमीन गाडावाला |
| २. | २५ | ०<br>पो.ख. | ०-१९-००<br>०-०१-०० | ०.३१ | साहीम हाजी अमीन गाडावाला |
| ३. | २३ | ० | ००-०८-०० | ०.१० | साहीम हाजी अमीन गाडावाला |

वरील जमिन मिळकतीवर वा त्यापैकी कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरु पणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, समजोता करार वा तत्सम कोणतेही स्वरुपाचा दावा, वाद वा मालकी किंवा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तिंनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपल्या हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे वा समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न झाल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. सदरहू मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

पनवेल
तारीख : २२/०१/२०२६

ॲड. सरिता रामधरणे शहासने
पत्ता : रुम नं. ०१, कनक सॉलिटेअर, प्लॉट नं.८०, मिडल क्लास सोसायटी, पनवेल, ता. पनवेल, जि.रायगड

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाच्या कब्जेदार मालक यांचेकडून बिनशेती जमिन मिळकत विकत घेण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन

तुकडी व जिल्हा रायगड, पोटतुकडी व तालुका - पनवेल, जि. परिषद रायगड. पंचायत समिती खालापूर, व मे. दुय्यम निबंधक साहेब, खालापूर यांचे अधिकार कक्षेतील मिळकतीचे वर्णन व कब्जेदारांची नावे मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे. मौजे कलोते मोकाशी, ता. खालापूर, जि. रायगड

| अ. क्र | गट नं. | हिस्सा नं | क्षेत्र आर.चौ.मी.से.मी. | आकार रु. पै. | कब्जदाराचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | १० | ३६ | ४६-७०-०० | ४६७=०० | श्री. मुहाफीझ मुजम्मील गाडावाला |
| २. | १० | ३३ | ९-०९-३५ | ९०.९३ | बाईजिद एहसान गाडावाला |
| ३. | १० | ३०<br>पैकी | ३-४०-०० | | बाईजिद एहसान गाडावाला |
| ४. | १० | १/१ | ५-३९-८५ | ५३.९८ | साहीम हाजी अमीन गाडावाला |
| ५. | १० | १/२ | ३-९२-१० | ३९.२१ | साहीम हाजी अमीन गाडावाला |
| ६. | १० | १/३ | ४-७३-६० | ४७.३६ | साहीम हाजी अमीन गाडावाला |
| ७. | १० | १/४ | ५-९५-१० | ५९.५१ | साहीम हाजी अमीन गाडावाला |
| ८. | १० | १/५ | ९-०९-३५ | ९०.९३ | बाईजिद एहसान गाडावाला |
| ९. | १० | ३४ | ४९-०५-०० | ४९०.५० | बाईजिद एहसान गाडावाला<br>साहीम हाजी अमीन गाडावाला<br>मुहाफिज मुजम्मील गाडावाला |

वरील जमिन मिळकतीवर वा त्यापैकी कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरु पणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, समजोता करार वा तत्सम कोणतेही स्वरुपाचा दावा, वाद वा मालकी किंवा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तिंनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपल्या हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे वा समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न झाल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. सदरहू मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

पनवेल
तारीख: २२/०१/२०२६

ॲड. सरिता रामधरणे - शहासने
पत्ता : रुम नं. ०१, कनक सॉलिटेअर, प्लॉट नं.८०, मिडल क्लास सोसायटी, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड

दिनांक : २३ जानेवारी २०२६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मौजे - किकवी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| सुभाष उत्तमराव हिवलेकर | १२२ | २अ | ०-२०-५० | २ | ०० |
| | १२२ | ३ | ०-२९-४० | २ | ९४ |
| | १२२ | ४ ब | ०-१६-२० | १ | ६१ |
| | १२२ | ६ | ०-१५-४० | १ | ५० |
| | १२२ | ७ | ०-९७-०५ | २ | ३७ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे, कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही / -
ॲड.भुपेश तानाजी पेमारे
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- २३/०१/२०२६

राजकीय फेरफटका

# खऱ्या शिवभक्तीचा निर्भेळ चेहरा

## सुरेंद्र म्हात्रेः निष्ठेचा श्वास आणि संघर्षाची ओळख



राजकारणात मोठेपण खुर्चीवरून मोजलं जात नाही; ते मोजलं जातं संकटाच्या वेळी माणूस कुणाच्या बाजूला उभा राहतो यावर. सत्ता जवळ असताना झुकणं सोपं असतं, पण सत्ता दूर असतानाही ताठ मानेनं उभं राहणं हेच खरं नेतृत्व. अशा नेतृत्वाचं जिवंत, चालतं-बोलतं उदाहरण म्हणजे सुरेंद्र म्हात्रे.

सुरेंद्र म्हात्रे म्हणजे केवळ शिवसेनेचे कार्यकर्ते नव्हे, तर बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर अढळ श्रद्धा ठेवणारे अन् निष्ठेला श्वासासारखं जपणारे माणूस आहेत. ही निष्ठा भाषणापुरती मर्यादित नव्हती; ती त्यांच्या प्रत्येक कृतीत, प्रत्येक निर्णयात आणि त्यांच्या संपूर्ण आयुष्यात दिसून आली. मातोश्रीच्या दारात शिवधनुष्याचं तोरण दिसलं, की बाळासाहेब ठाकरे सहज विचारायचे, सुरेंद्र आला होता का? इतकं आपुलकीचं, घट्ट आणि विश्वासाचं नातं फारच विरळा माणसांच्या नशिबी येतं. हे नातं केवळ राजकीय नव्हतं, तर ते भावनिक आणि वैचारिक होतं.

सत्ता गेली, काळ बदलला, राजकारणात वादळं आली; तरीही सुरेंद्र म्हात्रे खऱ्या शिवसेनेसोबत ठाम उभे राहिले. पद, पैसा किंवा आमिष यासाठी त्यांनी कधीही तत्त्वांशी तडजोड केली नाही. रामाचं नाव घेताना ते नेहमी एकवचनीच राहिले; म्हणूनच स्वार्थासाठी पक्ष बदलणं किंवा मतदारांशी गद्दारी करणं त्यांच्या स्वभावातच नाही.

आजच्या राजकारणात कॅमेरे, इव्हेंट्स, रील्स आणि झगमगाटालाच काम समजलं जातं. पण सुरेंद्र म्हात्रेंचं राजकारण 'शो' नाही; ते 'सेवा' आहे. लोकांच्या अडीअडचणींमध्ये खांद्याला खांदा लावून उभं राहणं हेच त्यांचं राजकारण आहे. आजही अनेक रात्री, कुठलाही कॅमेरा नसताना, कुठलीही प्रसिद्धी नको म्हणत, आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना स्वतः हॉस्पिटलमध्ये घेऊन जाणारा माणूस म्हणजे सुरेंद्र म्हात्रे. ते पोस्टसाठी नाही, प्रसिद्धीसाठी नाहीतर माणुसकीसाठी जगतात.

त्यांनी चौल, नागाव, रेवदंडा या परिसराचा विकास करताना केवळ सिमेंटच्या इमारती उभ्या केल्या नाहीत; तर मातीशी नातं, निसर्गाची समृद्धी आणि स्थानिक माणसाचा हक्क जपला. विकास, पर्यटन आणि मूलभूत सुविधांच्या बाबतीत त्यांनी नेहमी जनतेसाठी हक्कानं आवाज उठवला, पण आपल्या मुळांशी कधीही तडजोड केली नाही. म्हणूनच आज त्यांच्या सोबत फक्त कार्यकर्ते नाहीत, तर तळागाळात काम करणारी तरुणांची एक भक्कम फौज उभी आहे. कारण तरुणांना झगमगाट नव्हे, तर संघर्ष ओळखता येतो.

पॉश गाड्या, हाय-फाय आयुष्य आणि निवडणूकीपुरतं काम हा सुरेंद्र म्हात्रेंचा स्वभावच नाही. ते कायम लोकांमध्ये आहेत, लोकांसोबत आहेत आणि लोकांसाठीच आहेत.रामाचं नाव ओठांवर ठेवून राजकारण करणारे अनेक असतात; पण रामाचं नाव मनात ठेवून निष्ठेच्या वाटेवर न डगमगता चालणारा माणूस निराळाच. बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा पताका कुठलाही गोंगाट न करता, कुठलीही तडजोड न करता जो खांद्यावर घेऊन चालतो तो म्हणजे ओरिजिनल शिवभक्त. म्हणजेच सुरेंद्र म्हात्रे.

– ओंकार नागावकर

## निवडक

### ग्राहकावर दुकानदार महिलेचा हल्ला

**पनवेल :** नवीन पनवेलमधील सेक्टर १५ येथील साईप्लाझा इमारतीजवळ ऑनलाईन मागवलेल्या चिकन न्युडल्समध्ये चिकन नसल्याचा जाब विचारल्याने एका महिला ग्राहकावर दुकानदार महिलेने मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी जखमी महिलेने खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे. हरिग्राम केवाळे येथे राहणाऱ्या २५ वर्षीय निकिता मंडल यांनी स्विगीच्या समाजमाध्यमाद्वारे ऑनलाईन चिकन न्युडल्सची ऑर्डर दिली होती. ऑर्डर मिळाल्यानंतर न्युडल्समध्ये चिकन नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. याबाबत तक्रार करण्यासाठी त्या थेट एन्जॉय स्नॅक्स ॲण्ड चायनीज या दुकानात पोहोचल्या. दुकानात त्यावेळी ३७ वर्षीय ललिता प्रसाद उपस्थित होत्या. निकिता यांनी चिकन नसल्याबाबत जाब विचारताच दोघींमध्ये शाब्दिक वाद झाला. हा वाद वाढत जाऊन शिवीगाळ झाली. मिळालेल्या माहितीनुसार, याच दरम्यान ललिता यांनी दुकानातील मोठ्या पळीने निकिता यांच्यावर मारहाण केली. या हल्ल्यात निकिता जखमी झाल्या. मारहाणीनंतर निकिता यांनी तात्काळ खांदेश्वर पोलीस ठाण्यात धाव घेऊन घडलेला प्रकार पोलिसांच्या निदर्शनास आणून दिला. पोलिसांनी तक्रार नोंदवून संबंधित महिलेविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### नवी मुंबई विमानतळ प्रकल्पबाधितांचे प्रलंबित मागण्यांसाठी उपोषण



उरण : नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पबाधितांच्या प्रलंबित मागण्यांसाठी सीबीडी बेलापूर येथील सिडको भवन कार्यालयासमोर सोमवारी दि.१९ जानेवारीपासून आमरण उपोषणाला सुरुवात झाली आहे. या उपोषणाला नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कमिटीचे संघटक किरण केणी व प्रविण मुठ्ठेनवार बसले आहेत. सिडको प्रशासनाने उपोषणकर्ते आंदोलक व त्यांच्या पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा न केल्यास शुक्रवार दि.२३ जानेवारीपासून इतरही प्रकल्पबाधित आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबणार आहेत. हे आमरण उपोषण प्रामुख्याने २०१९ नंतर निष्कातीत झालेल्या घरांच्या घरमालकांना घरभाडे भत्ता व प्रोत्साहन भत्ता ५०० रुपये द्यावा. शून्य पात्रता ठरवून सिडकोने जी घरे नाकारली आहेत त्या घरांना सुद्धा घरे मंजूर करा. २०१३ च्या भूसंपादन कायद्याची अंमलबजावणी करुन मच्छिमारांना नुकसान भरपाई द्यावी. विमानतळ प्रकल्प बाधितांच्या मुलांना नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पात नोकऱ्या उपलब्ध करून देण्यात याव्यात, या मुख्य मागण्यांसाठी सुरू आहे.

### विजयाचा जल्लोष उरणच्या रस्त्यावर

**उरण :** शहराच्या जनतेने दिलेल्या भरघोस पाठिंब्यावर मिळालेल्या विजयाच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी (दि.२३)उरणमध्ये भव्य विजयोत्सव, मिरवणूक आणि विजयी सभेचे आयोजन करण्यात आले आहे. कोटनाका राघोबा मंदिर ते एन.आय. हायस्कूल असा रॅली मार्ग निश्चित करण्यात आला आहे. या रॅलीद्वारे उरण शहरात विजयाचा जल्लोष पाहायला मिळणार आहे. रॅलीनंतर एन. आय. हायस्कूल मैदानावर विजयी सभा होणार आहे. या विजयी रॅलीला राज्याच्या राजकारणातील दिग्गज नेत्यांची उपस्थिती लाभणार असून, खासदार सुरेश म्हात्रे (बाळ्या मामा), खासदार संजय पाटील, आमदार जितेंद्र आव्हाड, आमदार रोहीत पवार, ठाकरे शिवसेनेच्या नेत्या सुषमा अंधारे, तसेच माजी आमदार मनोहर भोईर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या रॅलीत नवनिर्वाचित नगराध्यक्षा भावना घाणेकर यांच्यासह महाविकास आघाडीचे सर्व विजयी नगरसेवक सहभागी होणार आहेत.एकीकडे विजयाचा हा उत्सव साजरा होत असताना, दुसरीकडे उरणकरांच्या मनात विकासाबाबतचे जळजळीत प्रश्न अधिक तीव्र होत चालले आहेत. विजय मिळाला, पण उरणच्या प्रश्नांचे पुढे काय? असा थेट सवाल आता जनतेकडून सत्ताधाऱ्यांना विचारला जात आहे.

### खोटे सांगून २ लाख ३४ हजार रुपयांची फसवणूक

**नवीन पनवेल :** जुन्या मशीन पावडर कोटिंग करून देतो असे सांगून २ लाख ३४ हजार रुपये किमतीची फसवणूक झाल्याची घटना कळंबोली येथे घडली आहे. याप्रकरणी प्रशोध पाणीकर आणि यामिनी पाणीकर यांच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. खारघर सेक्टर ४० येथील अल्ताफ पठाण हे नवीन जिमच्या साहित्याच्या शोधात होते. यादरम्यान त्यांनी प्रशोध पाणीकर यांच्यावर फोनवर बोलणे केले. यावेळी जुन्या १५ मशीनपैकी ७ मशीन बदलून नवीन देणार आणि उर्वरित ८ मशीन पावडर कोटिंग करून देणार असल्याचे ठरले. यावेळी बिग बॉय फिटनेस नावाची कंपनी असल्याचे खोटे सांगून त्यांचा विश्वास संपादन केला आणि २ लाख ३४ हजार ४०० रुपये रोखीने आणि ऑनलाईन स्वीकारले. मात्र, नवीन मशीन तसेच पावडर कोटिंग केलेल्या मशीन न देता फसवणूक केली.

# क्लायमेट लीडरशिपमध्ये जिल्हा आघाडीवर

## ।। वातावरणीय बदलाचा रोडमॅप तयार ।। जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे स्पष्टीकरण



**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

वातावरणीय बदलाला रोखणे, जनसमुदायांच्या कृतिशील सहकार्याने शाश्वत व संतुलित पर्यावरण राखणे शक्य आहे. या करीता संपूर्ण रायगड जिल्हा प्रशासन प्राधान्याने पुढाकार घेणार आहे. वाढते प्रदूषण, निसर्गाची होत चाललेली हानी आणि त्यामुळे मानवी समुदायाचे होणारे नुकसान रोखण्याकरिता रायगड जिल्ह्याचा क्लायमेट ऍक्शन प्लान तयार करणार असल्याचे जिल्हाधिकारी तथा वातावरणातील बदल कृती आराखडा कक्ष अध्यक्ष किशन जावळे यांनी स्पष्ट केले.

वातावरणीय बदलाचे संकट २१ व्या शतकातील मानव जातीसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. या शतकाखेरीस पृथ्वीचे सर्वसाधारण तापमान मर्यादित ठेवण्यासाठी जगातील १९५ देशांनी मान्य केलेल्या २०१५ च्या पॅरिस आंतरराष्ट्रीय कराराशी भारत वचनबद्ध आहे. भारताने सादर केलेल्या राष्ट्रीय निर्धारीत योगदानानुसा, देशाने २०७० पर्यंत कार्बन उत्सर्जन निव्वळ शून्यापर्यंत आणण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यात महाराष्ट्र अग्रेसर आहे. केंद्र शासन तसेच महाराष्ट्र शासनाद्वारे निर्धारित करण्यात आलेले वातावरणीय बदलाचे ध्येय गाठण्यासाठी महाराष्ट्रात सर्वप्रथमच रायगड जिल्हा क्लायमेट ॲक्शन प्लॅन तयार करणार असल्याची औपचारिक घोषणा जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी यांनी केली आहे. ते टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, युनिव्हर्सिटी ऑफ टोरांटो, असर सोशल इंपॅक्ट ॲडवायसर व वातावरण फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई येथे दि.१९ व २० जानेवारी रोजी 'नॅशनल सेमिनार ऑन लोकलायझिंग जेंडर क्लायमेट एक्शन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते व्हीडिओद्वारे बोलत होते.

त्यानंतर याकार्यक्रमाचे मुख्य उद्घाटक वातावरणातीला बदल कृती कक्षाचे संचालक अभिजीत घोरपडे यांनी, सध्या होत असणारी पर्यावरणाची हाणी किंवा वातावरणात बदल ही केवळ वातावरणाशी निगडित बाब नसून तिचा पर्यावरणा सोबतच सामाजिक व आर्थिक बाबींवरही गंभीर दुष्परिणाम होणार आहे. त्याचा ताण वाढणार असल्याची वास्तविक परिस्थिती समजून घेणे व त्यावर वेळीच उपाय योजना करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. तसेच, रायगड जिल्हा प्रशासनाने जिल्हा क्लायमेट ॲक्शन प्लॅन तयार करण्याआठी घेतलेला पुढाकार महत्वाचा आहे. त्याकरिता आवश्यक ती तयारी सुरू केली आहे. त्यामुळे संपूर्ण रायगड जिल्हा प्रशासनाचे अभिनंदन करणे महत्वाचे असल्याचेही मत घोरपडे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाला स्कूल ऑफ हॅबिटॅट स्टडीजच्या डिन डॉ. गीतांजोय साहू, रोहा वन विभागाचे उप वनसंरक्षक शैलेंद्रकुमार जाधव, यशदाचे उप संचालक मल्लिनाथ कळशेट्टी, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या गौरी दोंड, असर संस्थेच्या संस्थापक विनुता गोपाल, आईआईएचएस सिनीयर रिसर्च असोशिएट तनुश्री दत्ता, आपटवण सरपंच अस्मिता बायकर, सामूहिक वनव्यवस्थापन समिती मजरे जांभूळपाडा सचिव सुभाष जाधव व सामूहिक वनव्यवस्थापन समितीचे सदस्य रमेश वाघमारे आदी उपस्थित होते.

### जिल्हा बनवणार रोल मॉडेल

हवामान बदलाच्या परिणामांना तोंड देण्यासाठी आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी तयार केलेली एक सुनियोजित कृती योजना म्हणजे क्लायमेट ॲक्शन प्लॅन होय. त्यामध्ये महाराष्ट्र सरकारने मुंबईसह अनेक शहरांमध्ये यासाठी आराखडे तयार केले आहेत. राज्यामध्ये पहिल्यांदाच रायगड जिल्ह्यात जिल्हा वातावरणीय बदल कृती आराखडा होणार आहे. त्यामध्ये हवामान प्रोफाइल तयार करणे, उत्सर्जन कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवणे, अक्षय ऊर्जा वापरणे, सार्वजनिक वाहतूक सुधारणे आणि कचरा व्यवस्थापनासारख्या उपायांचा समावेश आहे. त्यामुळे शहरे तसेच जिल्हे आणि पर्यायाने सबंध महाराष्ट्र हवामान लवचिक बनणार असल्याचे व महाराष्ट्राला वातावरणीय बलदलासाठी मार्गदर्शक ठरेल. असा रोल मॉडेल आराखडा रायगड जिल्हा बनवणार असल्याचे आश्वासित मत रायगड जिल्हाधिकारी यांनी व्यक्त केले.



● देशाच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त पनवेल शहरात देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, पनवेलच्या विविध शॉपिंग इमारतींमध्ये खादीचे राष्ट्रीय ध्वज विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत. तिरंग्याच्या सन्मानासाठी नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळताना दिसत आहे. (छायाचित्र : राजेश डांगळे)

### गळ्यातील सोन्याचे पान चोरीला

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

पाच वर्षीय मुलगा खेळत असताना त्याच्या गळ्यातील धागा कापून सोन्याचे पान चोरून नेल्याची घटना घडली आहे. याबाबत चोरट्याच्याविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. कळंबोली सेक्टर १ मधील सुनील डोंबाळे यांचा पाच वर्षीय मुलगा घरासमोर गल्लीत खेळत होता. यावेळी एका व्यक्तीने त्याच्या गळ्यातील धागा कापला आणि त्यातील साडेचार हजार रुपयांचे सोन्याचे पान चोरून नेले.

### रोह्यातील निवडणुकीसाठी निवडणूक यंत्रणा सज्ज



**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रोह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्या अनुषंगाने संपूर्ण निवडणूक यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे, अशी माहिती तालुक्याचे मुख्य निवडणूक अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांनी दिली. निवडणूक कार्यक्रमानुसार २१ जानेवारी ही उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख होती. त्यानंतर २२ जानेवारी रोजी अर्जांची छाननी, तर २७ जानेवारी ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख आहे. ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे.

खुटवड यांनी सांगितले की, रोहा तालुक्यातील ४ जिल्हा परिषद मतदारसंघ व ८ पंचायत समिती मतदारसंघांसाठी अर्ज छाननी नंतर एकूण ९९ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. सर्व उमेदवारांना निवडणूक खर्चाबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या असून, खर्चाची मर्यादा ६ लाख व ४ लाख ५० हजार रुपये निश्चित करण्यात आली आहे. उमेदवारांनी दैनंदिन खर्चाचा तपशील नियमितपणे सादर करणे बंधनकारक आहे. आचारसंहितेच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यावर भर देण्यात आला असून, मतदारांना कोणतेही प्रलोभन देऊ नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. यासाठी तालुक्यात ३ ठिकाणी स्थिर पथके तसेच फिरती पथके नेमण्यात आली आहेत. प्रचार सुरू झाल्यानंतर व्हिडिओ सर्व्हेलन्स पथके कार्यरत करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. आचारसंहितेचे उल्लंघन कुठे झाल्याचे जनतेच्या निदर्शनास आल्यास तात्काळ प्रशासनाशी संपर्क साधावा. संबंधित ठिकाणी पथक पाठवून तत्काळ कारवाई करण्यात येईल, असे खुटवड यांनी स्पष्ट केले.

### एटीएमची अदलाबदल करून फसवणूक

**नवीन पनवेल :** तैक्का गावातील साधना बोहरा या बुधवारी पैसे काढण्यासाठी रेल्वे स्टेशन जवळील एटीएममध्ये गेल्या. त्या ठिकाणी आलेल्या दोन व्यक्तींनी एटीएम खराब आहे असे बोलून कार्ड बोहरा यांच्या हातातून घेतले. त्याचवेळी त्यांनी एटीएम कार्डची अदलाबदली केली आणि तेथून निघून गेले. त्यानंतर साधना बोहरा यांनी पैसे काढण्याचा प्रयत्न केला असता ते निघाले नाहीत. यावेळी त्यांना पैसे विड्रॉल झाल्याचे मेसेज आले. त्यानंतर बँकेत जाऊन पाहिले असता ५२ हजार २२ रुपये विथड्रॉल झाल्याचे दिसून आले.

## निवडणुकीत उमेदवार खरेदीचा प्रयत्न?

**। उरण । प्रतिनिधी ।**

नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिका निवडणुकीत पैसे देऊन विरोधी उमेदवार खरेदी करण्यात आल्याने अनेक जागा बिनविरोध काबीज केल्या गेल्याचा आरोप जिल्हाभर करण्यात आला होता. हा आरोप ताजा असतानाच, आता उरण जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीतही हाच घाणेरडा खेळ सुरू असल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिका निवडणुकीत कोट्यवधी रुपयांचे खोके उघडून उमेदवारांना विकत घेण्यात आले होते. पक्षाशी गद्दारी करून अनेक उमेदवारांनी ऐनवेळी माघार घेतली आणि समोरील उमेदवार बिनविरोध निवडून आल्याच्या घटना घडली. या घटना अजूनही जनतेच्या स्मरणात ताज्या आहेत. त्याच 'खोके संस्कृतीच्या' धर्तीवर आता जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीतही घोडेबाजार सुरू असल्याचा आरोप केला जात आहे. यावेळी उरण जिल्हा परिषदेच्या ४ जागांसाठी तब्बल २९ उमेदवार, तर पंचायत समितीच्या ८ जागांसाठी ४६ उमेदवार, असे एकूण १२ जागांसाठी ७५ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले होते. मात्र, छाननीअंती पंचायत समितीच्या २ उमेदवारांचे अर्ज बाद झाल्याने आता ७३ उमेदवार रिंगणात शिल्लक राहिले आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत मंगळवारी (दि.२७) असल्याने, पुढील पाच दिवसांत 'मतांच्या लढाईऐवजी खोके वाटपाची लढाई' जोरात रंगणार असल्याची चर्चा आहे.

**बेलकडे ग्रामस्थांसाठी अभिमानाचा क्षण** | **अपार मेहनतीच्या जोरावर यश संपादन**

# प्रथमेश पाटीलची बीएसएफमध्ये नियुक्ती



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील बेलकडे गावचा सुपुत्र प्रथमेश विकास पाटील याची भारतीय सीमा सुरक्षा दलात (बीएसएफ) कॉन्स्टेबल पदावर नियुक्ती झाली आहे. ही बाब संपूर्ण बेलकडे गावासाठी तसेच तालुक्यासाठी अभिमानास्पद ठरली आहे.

प्रथमेशला लहानपणापासूनच देशसेवेची ओढ होती. जिद्द, चिकाटी आणि अपार मेहनतीच्या जोरावर त्याने हे यश संपादन केले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्याने आपले बी.एससी. पदवीचे शिक्षण पूर्ण केले. कोणतेही विशेष मार्गदर्शन नसताना स्वतःच्या कष्टावर त्याने सैन्यदलात भरती होण्याचे स्वप्न उराशी बाळगले आणि ते सत्यात उतरवले. त्याच्या या यशामागे कुटुंबियांचा मोठा पाठिंबा लाभला. विशेषतः आई-वडिलांनी त्याच्या विचारांना नेहमीच प्रोत्साहन दिले.

प्रथमेश पाटील हा बेलकडे गावातील सैन्यदलात सामील होणारा दुसरा युवक ठरला. यापूर्वी ऋषिकांत पाटील यांनी १७ वर्षे प्रदीर्घ सेवा सैन्य दलात केली होती. आज ते निवृत्त असले तरी त्यांचा आदर्श प्रथमेशसाठी प्रेरणादायी ठरला आहे. आपल्या गावातील तरुण भारतमातेच्या सेवेसाठी जाणार याचा समस्त बेलकडे ग्रामस्थांना आनंद झाला असून, त्यांनी प्रथमेशचा जाहीर सत्कार केला. दरम्यान, ग्रामस्थांकडून ऋषिकेश पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन प्रथमेशचा सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामस्थ, युवक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तरुणांसाठी प्रेरणादायी

प्रदीर्घ तयारीनंतर बेलकडे गावातून देशसेवेची उमेद घेऊन प्रथमेश पाटील पुढे आला आहे. सुरुवातीपासूनच सैन्यात जाण्याची त्याची इच्छा होती. ही जिद्द केवळ गावापुरती मर्यादित न राहता तालुक्यातील तरुणांसाठीही प्रेरणास्थान ठरत आहे. आपल्याला मोठे होऊन काय करायचे आहे, याचा विचार शालेय जीवनातच केला पाहिजे, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

> **देशसेवा करण्याचे स्वप्न मी लहानपणापासून पाहत होतो. जिद्द, मेहनत आणि सातत्य ठेवल्यास कोणतेही ध्येय अशक्य नाही, यावर माझा ठाम विश्वास आहे. या प्रवासात आई-वडील, कुटुंबीय, शिक्षक, मित्र आणि बेलकडे गावातील सर्व ग्रामस्थांनी मला वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन व पाठबळ दिले. त्यांच्या आशीर्वादामुळेच आज मला भारतीय सीमा सुरक्षा दलात सेवा करण्याची संधी मिळाली आहे. देशासाठी प्रामाणिकपणे व निष्ठेने सेवा करण्याचा माझा संकल्प आहे.**
> **– प्रथमेश विकास पाटील**

# एक थंड फसवाफसवी

मुख्यमंत्री सध्या दावोसमध्ये आहेत. दावोस हे स्वित्झर्लंडमध्ये आल्प्स पर्वताच्या सानिध्यात आहे. अशा या बर्फाळ वातावरणातून गेले दोन दिवस गरमागरम घोषणा येत आहेत. २०-२५-३५ लाख कोटींचे आकडे फेकले जात आहेत. महाराष्ट्रात जिकडेतिकडे उद्योग सुरू होणार, नोकऱ्यांची चंगळ, विकासाची रेलचेल होणार याची खात्री फडणवीस देत आहेत. दर दिवशी होणाऱ्या या घोषणांनी महाराष्ट्रातील जनता गार पडली असेल यात अजिबात शंका नाही. तोच तर या घोषणांचा हेतू आहे. रायगड जिल्ह्यातील पेणला तिसऱ्या मुंबईतले पहिले शहर म्हणून विकसित करण्याचे फडणवीस यांनी बुधवारी जाहीर केले. एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक इथे येईल, नवी मुंबई विमानतळापासून १५-२० किलोमीटरवर ग्रोथ सेंटर उभारले जाईल, प्लग अँड प्ले या रीतीने रेडी टू स्टार्ट पद्धतीने लगेच कामकाज सुरू होईल असे याबाबतच्या सरकारी पत्रकात म्हटले आहे. साध्या भाषेत याचा असा अर्थ होतो की, बड्या कंपन्यांना आपली कार्यालये किंवा डेटा सेंटर्स वगैरे आयटीचे कामकाज तात्काळ सुरू करता येईल अशा मोठमोठ्या इमारती इथे उभारल्या जातील. हे किती वर्षात होणार याचा खुलासा नंतर होईलच. पण या सगळ्यासाठी प्रचंड जमीन आणि पाणी लागेल. त्याची काय व्यवस्था सरकार करणार आहे हेही स्पष्ट व्हायला हवे. या विकासातून स्थानिक जनतेला रोजगार मिळणार असेल तर त्याचे स्वागत करता येईल. पण यामुळे या परिसरातील सर्व गोष्टी प्रचंड महाग होणार असतील, लोकांच्या वाट्याचे पाणी पळवले जाणार असेल, प्रदूषण वाढणार असेल, शेतीवर परिणाम होणार असेल तर त्याला विरोध होणार. या संदर्भात सरकारने स्थानिक जनता, लोकप्रतिनिधी, नेते यांच्याशी पूर्वी कधी चर्चा केल्याचे तपशील उपलब्ध नाहीत. आता घोषणा झालीच आहे तर, निदान प्रकल्प आकाराला येण्यापूर्वी तरी अशा चर्चा व बैठका व्हाव्यात. सरकार काय करणार आहे याचा स्पष्ट व पारदर्शक आराखडा जनतेसमोर यायला हवा. अन्यथा, सरकारचे दलाल म्हणून काम करणारे ठराविक लोक या सर्वांचा फायदा उचलतील व जनता आहे तिथेच राहील.

## नागरिक बेदखल

सध्या पेण किंवा आसपासचा परिसरात बाहेरून आलेल्यांच्या वाट्टेल तशा वस्त्या झाल्याने बकाल आहे. रस्ते, सांडपाणी, पाणीपुरवठा यांची दुर्दशा आहे. बाजारपेठेत चकचकीत दुकाने आणि तुफान माल भरलेला दिसत असला तरी जरा पाच किलोमीटर दूर गेले की भकास आयुष्ये दिसू लागतात. भारतात विकास म्हणून जे काही होते त्याचे दृश्य रुप सर्वत्र असेच असते. खुद्द मुंबई जगातले सर्वात श्रीमंत अदानी आणि अंबानी राहतात. त्यांच्याच बाजूला दिवसाला ५० रुपये मिळाले तरी खूप असे कंगाल जगणारे लाखो लोक राहतात. पुण्यात हिंजवडी वगैरे परिसरात आयटी उद्योग उभे राहिले. पण तिथले रस्ते, पाणी यांची अवस्था भीषण आहे. आयटीमध्ये लाखोंचे पगार मिळवणारे चकचकीत इमारतींमध्ये राहतात आणि पाण्याचे टँकर विकत घेऊन कसलेही अशुद्ध पाणी पितात. मूळच्या गावठाणांची स्थिती तर भयंकर आहे. या परिसराचा आखीव रेखीव विकास करण्याची संधी पूर्वापारच्या महाराष्ट्र सरकारांना होती. त्यांनी ती गमावली. सध्याचे सरकारही त्याच दिशेने चालले आहे. दुसरी, तिसरी, चौथी मुंबई अशा रोज घोषणा चालू आहेत. विकासाच्या नावाखाली येणारी बकाली व स्थानिकांची हद्दपारी आणि बेरोजगारी यांचा विचार होत नाही. परवा पालघरमध्ये वाढवण बंदराला विरोध करण्यासाठी स्थानिकांनी मोठे मोर्चे काढले. वाढवण बंदर अदानीकडे आहे. याचा अर्थ सरकार काय वाट्टेल ते करून ते तडीला नेणारच अशी अवस्था आहे. यामध्ये स्थानिक मच्छिमार मेले, शेतकऱ्यांची शेती बुडाली तरी सरकार पर्वा करणार नाही. वृत्तपत्रांमधून वाढवणच्या चकचकीत जाहिराती दिल्या आणि थातूरमातूर खुलासे दिले की आपली जबाबदारी संपली असे सरकारला वाटते. नवी मुंबईत विमानतळ उभारताना त्याचा पुढे कसकसा उपयोग होणार आहे, त्यात स्थानिकांचा सहभाग कसा असू शकेल याचा काहीही विचार झालेला नाही. पेणच्या ग्रोथ सेंटरची गेल्या चार वर्षांपासून तयारी सुरू होती, आता केंद्राने त्याला मंजुरी दिल्याचे फडणवीसांनी म्हटले आहे. पण या काळात नागरिकांना कितपत विश्वासात घेण्यात आले हा खरा प्रश्न आहे.

## पाण्यावर धाड

या काळात इथे येणारे संभाव्य आयटी उद्योग कोणत्या प्रकारचे असतील हे नागरिकांना सांगून त्यांच्या मुलांना त्या पद्धतीचे शिक्षण मिळेल अशी सोय सरकारला इथे करता आली असती. त्यासाठी स्थानिक शिक्षणसंस्थांना विशिष्ट अभ्यासक्रम सुरू करता आले असते. पण तसे काहीही घडलेले नाही. आता हे ग्रोथ सेंटर चालवण्यासाठी बाहेरून लोक येणार. त्यांना भरमसाठ पगार देऊन ठेवले जाणार. त्यांच्यासाठी बिल्डर मंडळी वाट्टेल त्या ठिकाणी टॉवर नावाची खुराडी उभी करणार. मग इथे राहणारे लोक जे पैसे खर्चणार त्यातले थोडे स्थानिक दुकानदार किंवा भाजीवाले इत्यादींच्या वाट्याला येणार. सगळ्यांनी याला मोठा विकास म्हणून साजरा करावा अशी सरकारची इच्छा आहे. रायगडमध्ये खोपोली, पनवेलचा विकास याच रीतीने झाला आहे. आता उरणच्या परिसरात रेल्वे आल्यानंतर हालचाल वाढली आहे. एकीकडे वडखळ नाका ते अलिबागचा रस्ता वर्षानुवर्षे तितकाच अरुंद आणि वाईट अवस्थेत राहतो. आणि दुसरीकडे ही छोट्या बेटांमधली सूज वाढत जाते. मध्यंतरी रायगडमध्ये बल्क ड्रग्ज प्रकल्प किंवा लेदरसंदर्भातील एक प्रकल्प येणार याचा गाजावाजा झाला. त्याचे पुढे काय झाले हे नागरिकांना कळत नाही. अचानक कधीतरी बातमी येते की आता जमिनी अधिग्रहित करायला सुरुवात होणार आहे. मग धावपळ उडते. लोक आंदोलने करतात. त्यांना दडपले जाते. सत्तेच्या बळावर गोष्टी रेटून नेल्या जातात. हा विकास नव्हे. दावोसमध्ये फडणवीसांनी इतर अनेक करार केले आहेत. पण त्यातले बहुतेक उद्योगपती लोढा, रहेजा असे स्थानिकच आहेत. या उद्योगपतींशी करार करण्यासाठी दावोसला जाण्याचा खर्च करण्याची काय गरज आहे हा काँग्रेसचा सवाल अत्यंत रास्त आहे. यातही सर्वाधिक मेहरबानी पुन्हा एकदा अदानीवर आहे. नवीन विमानतळाच्या जवळ त्याचे डेटा सेंटर येणार आहे. डेटा सेंटर म्हणजे आपल्या तमाम बँका, उद्योगधंदे, सरकारे इत्यादींकडच्या डेटाचे गोडाऊन. हा डेटा साठवून ठेवण्यासाठी प्रचंड क्षमतेचे सर्व्हर्स लागतात. त्यासाठी अखंड व प्रचंड वीज तसेच यांना थंड ठेवण्यासाठी तितकेच प्रचंड पाणी लागते. अमेरिकेत अशा डेटा सेंटर्सच्या पाणीवापरामुळे स्थानिक लोकांचे पाणी पळवले गेले व टंचाई निर्माण झाली. शिवाय या सेंटर्सचा वीजवापर वाढल्याने विजेचे दरही गगनाला भिडले. त्यामुळे आता ही डेटा सेंटर्स आपल्यासारख्या गरीब देशांच्या वाट्याला येत आहेत. यातून थोडा विकास होणार असला तरी त्याची किंमत काय हा प्रश्न तितकाच महत्वाचा आहे. पेणच्या ग्रोथ सेंटरच्या निमित्ताने आपल्या अंगणातच हे सर्व घडणार आहे.

**विचार**

# रस्तेबांधणीचा नवा विक्रम

***उच्च क्षमतेचे राष्ट्रीय जाळे उभारण्याच्या प्रयत्नांमुळे २०२५ मध्ये भारताच्या रस्ते पायाभूत सुविधांमध्ये सातत्यपूर्ण विस्तार नोंदवला गेला. पूर्वीच्या काळात, कनेक्टिव्हिटीसाठी ग्रामीण रस्ते, राज्य महामार्ग आणि दुपदरी मार्गांवर अवलंबून राहावे लागत होते. त्यांच्यावर वाढत्या वाहतुकीच्या प्रमाणामुळे सतत ताण येत होता. गेल्या दशकातील दीर्घकालीन गुंतवणूक आणि प्रकल्प अंमलबजावणीमुळे मात्र या रचनेत बदल झाला आहे.***

प्रा. सुखदेव बखळे

भारताचे रस्ते जाळे आता ६३ लाख किलोमीटरपेक्षा जास्त पसरले आहे. त्यामुळे ते जागतिक स्तरावर सर्वात मोठ्या जाळ्यांपैकी एक बनले आहे. यामध्ये राष्ट्रीय महामार्ग प्रणाली २०१३-१४ मधील सुमारे ९१ हजार २८७ किलोमीटरवरून मार्च २०२५ पर्यंत अंदाजे एक लाख ४६ हजार २०४ किलोमीटरपर्यंत विस्तारली आहे. ही वाढ सुमारे ६० टक्के आहे. या टप्प्यातील विकास केवळ जाळ्याच्या लांबीवरच नव्हे, तर लांब पल्ल्याचा प्रवास आणि मालवाहतुकीला आधार देण्यासाठी वेगवान कॉरिडॉर आणि द्रुतगती मार्गांवरही केंद्रित होता. २०२५ पर्यंत मोठ्या, बहुवर्षीय महामार्ग कार्यक्रमांनी जाळ्याच्या वाढीला आधार दिला. भारतमाला टप्पा-१ अंतर्गत, २६ हजार किलोमीटरपेक्षा जास्त अंतराच्या प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी जवळपास १९ हजार आठशे किलोमीटरचे बांधकाम आतापर्यंत पूर्ण झाले आहे. हे प्रकल्प आर्थिक कॉरिडॉर, बंदरे आणि सीमा जोडणारे मार्ग तसेच औद्योगिक क्षेत्रांना जोडणाऱ्या मार्गांपर्यंत पसरले आहेत. या कार्यक्रमांतर्गत ४.९ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च झाला आहे. तो विस्ताराच्या या टप्प्यातील भांडवली गुंतवणुकीची व्याप्ती अधोरेखित करतो. यासोबतच प्रवेश-नियंत्रित 'ग्रीनफिल्ड कॉरिडॉरचा'ही वेगाने विस्तार झाला आहे. एक दशकापूर्वी १०० किलोमीटरपेक्षा कमी द्रुतगती मार्ग होते, त्याऐवजी आता भारतात प्रमुख शहरे आणि औद्योगिक केंद्रांना जोडणारे हजारो किलोमीटरचे वेगवान कॉरिडॉर आहेत. ते लांब पल्ल्याच्या रस्तेप्रवासात एक संरचनात्मक बदल दर्शवतात.

अलिकडच्या वर्षांमध्ये महामार्ग विकासाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे अंमलबजावणीचा वेग. २०१० च्या दशकाच्या सुरुवातीपासून बांधकामाचा सरासरी वेग दुप्पट झाला आहे. तो दररोज सुमारे ११-१२ किलोमीटरवरून अलिकडच्या वर्षांमध्ये ३० किलोमीटरपेक्षा जास्त झाला आहे. सुधारित निविदा प्रक्रिया, जलद मंजुरी, डिजिटल देखरेख आणि सातत्यपूर्ण भांडवली पाठिंब्याने या बदलाला हातभार लावला आहे. राज्यांनीही स्वतःचे महामार्ग आणि द्रुतगती मार्गांचे प्रकल्प हाती घेतले आहेत. ते राष्ट्रीय कॉरिडॉरला पूरक ठरत आहेत. वाहतुकीचा वेळ आणि लॉजिस्टिक्स खर्च कमी करण्यासाठी बंदरे, विमानतळ, लॉजिस्टिक्स पार्क आणि औद्योगिक क्लस्टरना जोडणाऱ्या मार्गांना वाढते प्राधान्य दिले जात आहे. महामार्ग आणि द्रुतगती मार्गांच्या विस्तारामुळे रस्ते वापरकर्ते आणि व्यवसायांना प्रत्यक्ष फायदे झाले आहेत. रुंद रस्ते आणि प्रवेश-नियंत्रित मार्गांमुळे प्रवासाचा वेळ कमी झाला आहे. इंधनाची कार्यक्षमता सुधारली आहे आणि वाहनांचा परिचालन खर्च कमी झाला आहे. जुन्या, अरुंद महामार्गांच्या तुलनेत सुरक्षिततेच्या बाबतीतही सुधारणा झाली आहे. देशभरातील वाहतुकीवर रस्ते वाहतुकीचे वर्चस्व कायम आहे. ती ६४ टक्क्यांहून अधिक मालवाहतूक आणि सुमारे ९० टक्के प्रवासी वाहतूक करते. त्यामुळे अलिकडच्या वर्षांमधील महामार्ग विकासाच्या व्याप्तीने व्यापार, पर्यटन, आपत्कालीन सेवा आणि ग्रामीण-शहरी कनेक्टिव्हिटीला पाठिंबा देण्यात थेट भूमिका बजावली आहे.

२०२५ हे वर्ष रस्ते पायाभूत सुविधांचा वापर आणि वित्तपुरवठा करण्याच्या पद्धतीतील बदलाचेही साक्षीदार ठरले. फास्टॅगद्वारे इलेक्ट्रॉनिक टोलिंगने मॅन्युअल टोलवसुलीची जागा घेतली आहे. त्यामुळे टोल प्लाझावरील गर्दी कमी झाली असून वाहतूक सुरळीत झाली आहे. डिजिटल टोलिंगमुळे महसूल संकलन आणि पारदर्शकता आली आहे. त्यामुळे देखभाल आणि भविष्यातील विस्ताराला मदत झाली आहे. अडथळामुक्त टोलिंग प्रणालीच्या दिशेने कामाला गती मिळाली. त्यात वाहनांना न थांबता किंवा वेग कमी न करता टोल नाक्यांवरून जाण्याची परवानगी देणाऱ्या 'मल्टी-लेन फ्री-फ्लो मॉडेल्स'चा समावेश आहे. या वर्षातील महामार्ग विस्तारामध्ये अधिक व्यापक भौगोलिक विस्तार दिसून आला. ईशान्येकडील प्रदेशातील प्रकल्पांमुळे दुर्गम भागांना राष्ट्रीय जाळ्याशी जोडून, कठीण भूभागात कनेक्टिव्हिटी वाढवली गेली. त्याच वेळी, ग्रामीण रस्ते योजनांनी शेवटच्या टप्प्यापर्यंतची कनेक्टिव्हिटी वाढवणे सुरू ठेवले. त्यामुळे लहान शहरे आणि गावांमध्ये बाजारपेठा, आरोग्यसेवा आणि शिक्षणापर्यंतची पोहोच सुधारली. पुढील वाटचाल प्रगतीच्या मोठ्या प्रमाणावर असूनही २०२५ मध्ये आव्हाने कायम होती. भूसंपादन विलंब, पर्यावरणीय मंजुरी आणि विविध संस्थांमधील समन्वयाच्या अभावामुळे काही प्रदेशांमध्ये प्रकल्पांच्या वेळापत्रकावर परिणाम होत राहिला. या मर्यादांवर मात करण्यासाठी रस्ते विकास, लॉजिस्टिक्स, रेल्वे आणि शहरी पायाभूत सुविधा एकत्रित करणाऱ्या नियोजन साधनांचा वापर वाढवला जात आहे.

२०२५ हे वर्ष संपले असताना, रस्ते आणि महामार्ग विकास भारताच्या पायाभूत सुविधांच्या विकासाचा एक मुख्य आधारस्तंभ म्हणून उभा आहे. विखुरलेल्या मार्गांवरून एका समन्वित, उच्च-क्षमतेच्या जाळ्याकडे होणारे संक्रमण हे आर्थिक वाढीला चालना देण्यासाठी, लॉजिस्टिक्स खर्च कमी करण्यासाठी आणि देशभरातील दैनंदिन गतिशीलता सुधारण्यासाठी केलेल्या दीर्घकालीन प्रयत्नांचे प्रतिबिंब आहे. २०२५ हे वर्ष महामार्ग क्षेत्रासाठी एक पुनर्रचनेचे वर्ष ठरले. चालू आर्थिक वर्षात कंत्राट वाटप आणि बांधकामाच्या उद्दिष्टांवर थोडा परिणाम झाला. आणखी एक बदल म्हणजे व्यापक विचार-विनिमयानंतर मालमत्ता मुद्रीकरण धोरणाला अंतिम रूप देण्यात आले. त्यामुळे प्रक्रिया सुलभ होईल आणि किरकोळ गुंतवणूकदारांना या कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळेल. आतापर्यंत एकूण १४१० किलोमीटर लांबीच्या महामार्गांची कंत्राटे देण्यात आली आहेत, जी गेल्या आर्थिक वर्षातील एप्रिल-डिसेंबरमधील ३१०० किलोमीटरच्या तुलनेत लक्षणीयरीत्या कमी आहेत. गेल्या दोन वर्षांपासून कंत्राट वाटपाचा वेग कमी होत आहे आणि या वर्षी ही घट अधिक तीव्र झाली आहे, कारण एप्रिलमध्ये रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने आपल्या रस्ते बांधकाम संस्थांना कामाला सुरुवात करण्यापूर्वी ९० टक्के 'राईट ऑफ वे' (आरओडब्ल्यू) ची उपलब्धता काटेकोरपणे सुनिश्चित करणे पूर्णपणे बंधनकारक केले आहे.

या मंत्रालयाने कंत्राटवाटप करण्यापूर्वी वन आणि वन्यजीव मंजुरी तसेच रोड अंडर ब्रिज आणि रेल अंडर ब्रिजसाठी मंजूर 'जनरल अरेंजमेंट ऑफ ड्रॉइंग' (जीएडी) यांची अधिक कठोर तपासणी अनिवार्य केली आहे. पूर्वी तयारी पूर्ण होण्यापूर्वीच कंत्राट वाटप केल्यामुळे विलंब होत असे. सध्या ६४३ बांधकाम सुरू असलेले राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प हाती घेण्यात आली असून, त्यांची एकत्रित प्रकल्प किंमत सुमारे चार लाख कोटी रुपये आहे आणि २०१५-१६ पासून मंजूर झालेले प्रकल्प मूळ पूर्णत्वाच्या वेळापत्रकापेक्षा पुढे गेले आहेत. यापैकी ७९ प्रकल्पांना तीन वर्षांपेक्षा जास्त विलंब झाला आहे. २६३ प्रकल्पांना एक ते तीन वर्षांचा विलंब झाला असून ३०१ प्रकल्पांना एका वर्षापेक्षा जास्त विलंब होत आहे. विश्लेषकांच्या मते, कंत्राट वाटपापूर्वी सर्व मंजुरी घ्यावी लागत असल्याने वाटपाचा वेग मंदावू शकतो; परंतु एकदा कंत्राट दिल्यानंतर प्रकल्पांची अंमलबजावणी वेगाने होईल. गेल्या आर्थिक वर्षात ७५३८ किलोमीटर लांबीच्या महामार्ग प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली होती आणि या वर्षीही हा आकडा गाठला जाऊ शकतो, असे तज्ज्ञांचे मत आहे. एप्रिल-नोव्हेंबर या कालावधीत एकूण सुमारे ४०७३ किलोमीटर लांबीच्या राष्ट्रीय महामार्गांचे बांधकाम झाले आहे. गेल्या वर्षी एप्रिल-डिसेंबर या कालावधीत हा आकडा ५८५३ किलोमीटर होता. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाचा भांडवली खर्च एप्रिल-ऑक्टोबरमध्ये १.७४ लाख कोटी रुपये होता. तो २०२४-२५ च्या याच कालावधीतील १.४४ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे.

२०२४ मधील सार्वत्रिक निवडणुकांमुळे मागील आर्थिक वर्षात भांडवली खर्च कमी राहिला होता. या वर्षासाठी महामार्ग बांधणीचे लक्ष्य दहा हजार किलोमीटर ठेवण्यात आले आहे, तर गेल्या आर्थिक वर्षात दहा हजार ६६० किलोमीटरचे लक्ष्य साध्य झाले होते. साधारणपणे आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीमध्ये बांधकाम आणि मंजुरीचा वेग वाढतो. आर्थिक वर्ष २०२६ मध्ये रस्ते बांधणीचा वेग कमी होऊन ९,०००-९,५०० किलोमीटर (सुमारे २५-२६ किमी/दिवस) होईल, जो आर्थिक वर्ष २०२५ मधील १०,६६० किलोमीटरच्या बांधकामापेक्षा कमी आहे. मंत्रालयाने भूसंपादन आणि पर्यावरण मंजुरीच्या समस्यांवर लक्ष केंद्रित केल्यामुळे आर्थिक वर्ष २०२६ च्या दुसऱ्या सहामाहीत मंजुरीच्या कामात वाढ होण्याची शक्यता आहे, असे 'आयसीआरए'चे म्हणणे आहे.

नोव्हेंबर २०२३ मध्ये सरकारने भारतमाला प्रकल्पांतर्गत नवीन प्रकल्पांना मंजुरी देणे थांबवून 'ग्रीनफिल्ड एक्सप्रेस वे'वर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला. सध्या देशभरात दहा हजार किलोमीटर लांबीच्या २५ ग्रीनफिल्ड एक्सप्रेसवेवर ६ लाख कोटी रुपये खर्चाचे काम सुरू आहे. तिसऱ्या कार्यकाळात सरकारने १.९७ लाख कोटी रुपयांच्या रस्ते प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. त्यात ग्रामीण रस्ते आणि ९३६ किलोमीटर लांबीच्या आठ हाय-स्पीड रस्ते प्रकल्पांचा समावेश आहे. उच्च-गती द्रुतगती मार्ग भांडवल-केंद्रित असतात आणि त्यापैकी बहुतेक प्रकल्प खासगी क्षेत्राद्वारे 'बिल्ड ऑपरेट ट्रान्सफर' (बीओटी) पद्धतीने कार्यान्वित केले जातील. प्रकल्प अधिक आकर्षक बनवण्यासाठी सवलत करारामध्ये आणखी बदल करण्यावर काम सुरू आहे. गेल्या आर्थिक वर्षात 'बोट' पद्धतीने ३०० किलोमीटर महामार्गांची कामे मंजूर करण्यात आली होती; परंतु या वर्षी या पद्धतीद्वारे महामार्गांच्या विकासासाठी कोणतेही प्रकल्प देण्यात आलेले नाहीत.

**(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

# रायगडच्या विकासाचे शिल्पकार

श्री. राजाराम भगत



वडील नारायण नागू पाटील व आई लक्ष्मीबाई यांच्या पोटी २३ जानेवारी १९२८ रोजी पनवेल येथील इतिहासप्रसिद्ध गुलवेवाड्यात 'प्रभाकर' या पुत्ररत्नाचा जन्म झाला. आई-वडील दोघेही शिक्षकी पेशात असल्याने प्रभाकर यांना बालपणापासूनच विविध ठिकाणी भटकंती करावी लागली. त्यांचे शिक्षण इंग्रजी सातवी, म्हणजे मॅट्रिकपर्यंत झाले.

प्रभाकर मॅट्रिकच्या वर्गात असताना त्यांचे मोठे बंधू दत्ता पाटील यांनी एल.एल.बी.साठी प्रवेश घेतला होता. वडिलांची इच्छा दत्तांनी वकील व्हावे अशी होती. मात्र, संसाराची जबाबदारी, दोन मुलांच्या शिक्षणाचा खर्च आणि घरची परिस्थिती यामुळे वडिलांची होणारी ओढाताण प्रभाकर यांच्या लक्षात आली. त्यामुळे त्यांनी स्वतःचा शिक्षणमार्ग थांबवण्याचा मोठा निर्णय घेतला. मॅट्रिकच्या वर्गात असतानाच त्यांनी शाळा सोडली आणि वडिलांच्या प्रेसच्या कामात मदत करण्यास सुरुवात केली. पुढे त्यांनी प्रेससंदर्भातील आवश्यक प्रशिक्षणही घेतले. वडील नारायण नागू पाटील हे सामान्य जनता व शेतकऱ्यांचे नेते होते. त्यांनी जगप्रसिद्ध शेतकरी आंदोलन उभे केले. तब्बल सात वर्षे चाललेला 'खोतीविरुद्ध शेतकरी संप' हा जगातील एकमेव इतका दीर्घकाळ चाललेला संप ठरला. त्या काळात शेतकऱ्यांवर प्रचंड अन्याय व पिळवणूक झाली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही शेतकरी डगमगले नाहीत. अखेरीस आंदोलन यशस्वी झाले आणि 'कसेल त्याची जमीन' हा कुळ कायदा अंमलात आला.

इतिहासाने नारायण नागू पाटील यांची 'कुळकायद्याचे जनक' म्हणून नोंद घेतली, मात्र दुर्दैवाने शासन पातळीवर तशी नोंद झाली नाही. पाठ्यपुस्तक मंडळ व सांस्कृतिक संस्थांनी ही ऐतिहासिक नोंद घ्यावी, तसेच चरी येथे त्यांचे भव्य स्मारक उभे राहावे, ही माफक अपेक्षा आहे. बालपणापासूनच प्रभाकर पाटील यांना घरात समाजकारण व राजकारणाचे संस्कार लाभले. वडिलांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा आणि वक्तृत्वाचा खोल ठसा त्यांच्या मनावर उमटला. त्यातूनच ते राजकारणात सक्रिय झाले. शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून त्यांनी जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडली. सन १९६२ मध्ये ते पोयनाड ग्रामपंचायतीचे सरपंच झाले. १९७५ ते १९९० या दीर्घ काळात त्यांनी रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद भूषविले. त्या काळात रायगड जिल्हा अत्यंत मागासलेला होता. जिल्ह्याचा सर्वांगीण विकास हेच ध्येय डोळ्यांसमोर ठेवून त्यांनी विकासकामांचा धडाका सुरू केला. लोकोपयोगी योजनांना त्यांनी प्राधान्य दिले. ''जिल्ह्यातील प्रत्येक विद्यार्थी शिकला पाहिजे'' या भूमिकेतून बंधू दत्ता पाटील यांच्या सहकार्याने ग्रामीण व दुर्गम भागात शाळा, महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये व अध्यापक विद्यालये सुरू केली. त्यामुळे रायगड जिल्ह्यात शिक्षणाची गंगोत्रीच अवतरली. अनेक सुशिक्षित तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी त्यांनी जोडधंद्यांवर भर दिला. दूध डेअरी, भातगिरण्या सुरू केल्या. शहरात श्रीबाग सहकारी संस्था स्थापन करून व्यापाऱ्यांच्या मनमानी दरांना आळा घातला. रायगड बाजारातून सामान्य जनतेला रास्त दरात वस्तू मिळू लागल्या. त्यामुळे रोजगारनिर्मितीलाही चालना मिळाली. बँकेचे संचालक असताना शेतकऱ्यांना केवळ ४ टक्के दराने कर्जपुरवठा सुरू केला. इतक्या अल्प दरात कर्ज देणारी ही केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर, देशातील पहिलीच बँक ठरली. रायगडकरांसाठी ते खऱ्या अर्थाने 'सोन्याचे दिवस' होते.

संत तुकाराम महाराजांच्या–

**''जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले।**
**तोचि साधु ओळखा । देव तेथेच जाणावा।''**

या अभंगातील भावार्थाप्रमाणे प्रभाकर पाटील यांनी असंख्य गरजू लोकांना आर्थिक मदत करून त्यांचे संसार वाचवले. सर्वसामान्यांची सेवा हाच त्यांच्या जीवनाचा अंतिम उद्देश होता. त्यामुळेच जनतेला त्यांच्या ठायी देवत्वाचा अनुभव येत असे. तरुणांमध्ये खेळाविषयी उत्साह निर्माण करण्यासाठी त्यांनी कबड्डी, खो-खो, कॅरम यांसाठी जिल्हाभर क्रीडामंडळे स्थापन केली. रायगड जिल्ह्यातून अनेक नामवंत कबड्डीपटू घडले. त्यांनी लावलेले छोटे रोपटे आज वटवृक्षात रूपांतरित झाले असून, त्याचे सर्व श्रेय भाऊंनाच जाते.

''बोले तसा चाले त्याची वंदावी पाऊले'' ही म्हण प्रभाकर पाटील यांच्याबाबतीत अक्षरशः खरी ठरते. राजकारणात आश्वासने देणारे अनेक असतात; मात्र शब्द पाळणारे नेते फार थोडे असतात. भाऊंनी कुटुंब नियोजन कार्यक्रम सभेत शासनाला जिल्ह्यात काम करण्याविषयी दिलेला शब्द त्यांनी कृतीतून सिद्ध केला. रायगड जिल्हा या बाबतीत महाराष्ट्रात अग्रस्थानी राहिला. शासनाने जिल्ह्यातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचाही गौरव केला. शब्दपालन हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष गुण होता.

रायगड जिल्हा परिषदेचे कार्यालय पेण येथून अलिबाग येथे हलविण्याचा धाडसी निर्णय त्यांनी तीव्र विरोध असूनही घेतला. पुढे तो निर्णय दूरदृष्टीचा ठरला. अलिबाग येथे 'शीवतीर्थ' ही भव्य जिल्हा परिषद इमारत उभी राहिली. स्वतः जातीने ते बांधकामावर लक्ष ठेवत असत. एकाच छताखाली सर्व कार्यालये आणून जनतेचा वेळ व श्रम वाचवले. प्रवेशद्वारावरील 'सेवेशी तत्पर पाटील प्रभाकर' हे ब्रीदवाक्य त्यांच्या सेवाभावी वृत्तीचे प्रतीक होते. शेतकऱ्यांचे दुःख समजून घेणारा, जनतेचे प्रश्न तात्काळ सोडवणारा नेता म्हणून त्यांची ख्याती होती. प्रशासनावर त्यांची मजबूत पकड होती. सर्वपक्षीय नेते त्यांचा आदर करत. त्यांनी कधीही कोणावर अन्याय केला नाही. पक्षभेद न करता सर्वांचे प्रश्न सोडवले, त्यामुळे जनतेचे त्यांना भरभरून सहकार्य लाभले. शेतकरी, गरीब व कष्टकऱ्यांचे कैवारी, अन्यायाविरुद्ध पेटून उठणारे रायगड जिल्ह्याचे भाग्यविधाते स्वर्गीय प्रभाकर पाटील (भाऊ) यांच्या स्मृतीस नम्र अभिवादन.

**लोकसंसद**

## वाहतूक कोंडीत भारतातील दहा शहरे

जागतिक पातळीवर वाहतूक कोंडीचा अभ्यास करणाऱ्या हॉलंडमधील ॲमस्टरडॅमस्थित 'टॉम टॉम' या कंपनीच्या ट्रॅफिक इंडेक्सनुसार (टॉमटॉम रहदारी निर्देशांक) पुणे हे जगातील सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या शहरांमध्ये पाचव्या स्थानावर पोहोचले आहे. जगातील सहा खंडातील ६२ देशांमधील ४९२ शहरांमधील वाहतूक व्यवस्थेचा अभ्यास करून वाहतूक कोंडीचा 'टॉम टॉम रहदारी निर्देशांक-२०२५' नुकताच जाहीर करण्यात आला आहे. जगातील सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या पहिल्या पाच शहरांमध्ये भारतातील बंगळुरू (दुसरा क्रमांक) आणि पुणे (पाचवा क्रमांक) ही दोन शहरे असून पहिल्या स्थानावर मेक्सिकोचे मेक्सिको सिटी हे शहर आहे तर तिसऱ्या आणि चौथ्या स्थानावर अनुक्रमे आयर्लंडचे डब्लिन आणि पोलंडचे लॉड्झ ही दोन शहरे आहेत. या वेळी १० किलोमीटरचे अंतर कापण्यासाठी लागणारा सरासरी प्रवास वेळ हा निकष ठरविण्यात आला होता. आशियातील सर्वाधिक वाहतूक कोंडी होत असलेल्या ७५ शहरांपैकी दहा शहरे भारतातील असून बंगळूरु पहिल्या क्रमांकावर, पुणे दुसऱ्या, मुंबई सहाव्या, नवी दिल्ली सातव्या, कोलकाता नवव्या, जयपूर दहाव्या, चेन्नई अकराव्या, हैदराबाद पंधराव्या, एर्नाकुलम सतराव्या आणि अहमदाबाद अठ्ठाविसाव्या क्रमांकावर आहे. प्रचंड वाहतूक कोंडीमुळे वाहनांचा वेग मंदावतोच शिवाय वायूप्रदूषणही होते.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

**दिनविशेष**

# हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे



शिवसेनेचे प्रमुख हृदयहिन्दू सम्राट श्री बाळ केशव ठाकरे (बाळासाहेब ठाकरे ) यांचा जन्म २३ जानेवारी १९२६ रोजी पुणे येथे झाला. त्यांचे वडील केशव सीताराम ठाकरे हे समाजसुधारक आणि लेखक होते. ह्यांचा आईचे नाव रमाबाई केशव ठाकरे असे होते.

महाराष्ट्रामधील सर्व मराठी लोकांना एकत्र करण्यासाठी संयुक्त मराठी आंदोलनात त्यांची मुख्य भूमिका होती. त्यांनी १९५० च्या काळात मुंबईला महाराष्ट्राची राजधानी बनविण्यासाठी अनेक कार्य केले. बाळासाहेबांचे लग्न मीना ठाकरे यांच्याशी झाले होते. ह्यांना ३ अपत्ये झाली. बिंदूमाधव, जयदेव आणि उद्धव ठाकरे. बाळासाहेबांनी उपजीविकेसाठी बॉम्बे फ्री प्रेस जर्नल मध्ये व्यंगचित्रकार म्हणून नोकरी केली. काही काळापश्चात त्यानी नोकरीतून राजीनामा देऊन भावांसोबत स्वतःचे व्यंगचित्र साप्ताहिक 'मार्मिक' सुरू केले.

२३ जानेवारी, १९८९ रोजी मध्यरात्री शिवसेनेचे मुखपत्र 'सामना' सुरू झाले. दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारकात, मोठ्या थाटामाटात शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते 'सामना'चे प्रकाशन केले गेले. सामना मुंबईतून प्रसिद्ध झाले. सुरुवातीच्या काळात सामनामध्ये फक्त व्यंगचित्र प्रकाशित होत होते. काळानंतर हे शिवसेनेचे मुखपत्र बनले. प्रकाशनाच्या प्रसंगी बोलताना बाळासाहेबांचे वक्तव्य होते 'हिंदुत्वाचा प्रभावीपणे प्रचारासाठी आणि दररोजच्या होणाऱ्या आरोपांना सडेतोड उत्तर देण्यासाठी सामना हे शस्त्राचे काम करेल. सामना हे राज्यकर्त्यांसाठी त्यांना दाखवणारा आरसा आहे. त्यात आपल्याला बघून सुधारण्याचा प्रयत्न करावा. सामना वृत्तपत्राची भाषा असभ्य असल्याने लोकांना टोचेल, तिखट असेल, पण लोकांनी वाचताना त्यातील दिलेल्या विषयाचे गांभीर्य समजावे. त्या काळात दैनिक 'सामना' वृत्तपत्र निघाल्यावर सर्व वृत्तपत्राच्या सृष्टीत हादरा बसून एकाएकी खळबळ आणि धांदल उडाली. आज देखील शिवसेनेचे निर्भीड मुखपत्र अशी 'सामना'ची ओळख आहे.

बाळासाहेबांचे व्यक्तिमत्त्व वाघासारखे होते. ते आपल्या चांदीच्या सिंहासनावर बसून आपल्या विरोधकांना उघडपणे धमक्या देत होते. त्यांना लोकं भेटावयास त्यांचा निवासस्थानी मातोश्री ला जायचे. त्यांचे म्हणणे होते की ज्यांना मला भेटावयाचे आहे ते घरी येऊ शकतात.

हिंदुत्व या मुद्याबाबतही बाळासाहेबांनी आपले विचार रोखठोकपणे मांडले. बाँबस्फोट, देशविघातक कृत्ये घडवणाऱ्या धर्मांधांना या देशात राहण्याचा अधिकार नाही. मतपेटीचे राजकारण करत अशा मुस्लिमांचे लांगुलचालन कोणी करू नये. या स्पष्ट व रोखठोक भूमिकेमुळेच हिंदुहृदयसम्राट ही त्यांना प्राप्त झालेली उपाधी सार्थ ठरते. 'गर्व से कहो हम हिंदू है' या घोषणेला खरा अर्थ महाराष्ट्रात प्राप्त झाला तो शिवसेनाप्रमुखांमुळेच.

बाळासाहेबांना २५ जुलै २०१२ रोजी श्वासोच्छावासाचा त्रासासाठी मुंबईतील लीलावती हॉस्पिटल दाखल करण्यात आले. १४ नोव्हेंबर २०१२ रोजी त्यांची तब्येत खालावली. डॉक्टरांनी त्यांचा घरी मातोश्री वरचं त्यांना औषधोपचार द्यायला सुरू केले. पण त्यांच्या हाती यश आले नाही. १७ नोव्हेंबर २०१२ रोजी त्यांचे निधन झाले. शिवाजी मैदान येथे राजकीय सन्मानाने त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा अंत्य यात्रेत अफाट जन समुदाय आपल्या लाडक्या नेत्याला निरोप देण्यासाठी एकत्रित झाला होता. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना मानाचा मुजरा.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**वि. ह तेंडुलकर, स्मृतीदिन, अलिबाग**

**स्व. उत्तम ह. ओसवाल, स्मरणार्थ अलिबाग**

**स्व. मुरजी गांगजी शाह, स्मरणार्थ, सातघर, अलिबाग**

# धान्य वितरणात अडथळा

## नेटवर्क अभावामुळे ई-पॉस मशीन डाऊन

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

धान्य वितरण करण्यासाठी कोणतीही अडचण येऊ नये, म्हणून पुरवठा विभागाच्या वतीने राज्यासह जिल्ह्यात नवीन पॉस मशीन देण्यात आले. त्यामुळे धान्य वितरण सुरळीत सुरू होते. मात्र आता पॉस मशीनला कधी नेटवर्क, सर्व्हर डाऊन, साईटबंदची समस्या भेडसावत आहे. ही समस्या केवळ रत्नागिरी जिल्ह्यातच नाही तर राज्यभरात सुरू आहे. त्यामुळे धान्य वाटपास ब्रेक लागला आहे. नेटवर्क आल्यानंतर धान्य दिले जात आहे. मागील पंधरा दिवसांपासून पॉसमशीन बंद-चालू होत आहे. त्यामुळे रेशनदुकानदारांसह रेशनकार्डधारकही वैतागले आहेत.

जिल्ह्यात अन्न, धान्य वाटप करत असताना पॉस मशीनमध्ये बिघाड, नेटवर्क नसणे यामुळे अन्नधान्य वाटपास उशीर होत होता. मात्र मागील वर्षापासून नवीन फोरजी पॉसमशीन वाटप करण्यात आले होते. त्यामुळे धान्य वाटप सुरळीत होत होते. धान्य वाटपासंदर्भात तक्रारी कमी झाल्या होत्या. परंतु, मागील काही महिन्यांपासून तसेच गेल्या पंधरा दिवसापासून पॉस मशिनला सव्हर नेटवर्क, साईटची समस्या येत आहे. त्यामुळे जिल्ह्यात धान्य वितरणास अडचण येत आहे.

सर्व्हर, नेटवर्कची समस्या काही ठिकाणी येत आहे. ती समस्या कमी करण्यासाठी पुरवठा विभागाकडे यंत्रणा कमी आहे. सर्व्हरची समस्या आली की सर्वच ठिकाणी येते, नेटवर्कची समस्या काही प्रमाणात तालुक्यात आहेत. जर ऑफलाईन धान्य दिले, तर दुकानदारांना कमिशनची समस्या येते. त्यामुळे ऑनलाईन पद्धतीनेच धान्य वितरण होते. सर्व्हरची समस्या असेल तर राज्य पुरवठा विभागाकडून ती समस्या दूर होणे गरजेचे आहे, असे रास्त दुकानदार संघटना जिल्हाध्यक्ष अशोक कदम यांनी सांगितले.



### लाभार्थ्यांसह रेशनदुकानदार हताश

काही दुकानदार तक्रारी येऊ नये म्हणून लाभार्थ्यांचे रेशनकार्ड ठेवून धान्य देतात, त्यानंतर ओटीपीसाठी संपर्क करून त्यांची माहिती भरली जात आहे. तर काही ठिकाणी नेटवर्क, साईट समस्या असल्याचे सांगून नंतर येण्यास सांगण्यात येत आहे. त्यामुळे लाभार्थी ही अक्षरशः वैतागले आहेत. नव्या वर्षात पॉसमशीनची समस्या येत असल्यामुळे रेशनदुकानदारही हताश झाले आहेत. जिल्हापुरवठा विभागाकडून यांसदर्भात राज्य पुरवठा विभागास तक्रारीही देण्यात आल्या आहेत.

> **साइट प्रॉब्लेम, नेटवर्क समस्येमुळे पॉसमशिन बंद पडत आहे. त्यामुळे धान्य देताना दुकानदारांना अडचणी होत आहे. रत्नागिरी जिल्ह्यात नाही तर राज्यभरात पॉस मशीनच्या तक्रारी आहेत. साईट सुरू झाल्यानंतर धान्य वाटप होत आहे.**
> **– रोहिणी रजपूत, जिल्हा पुरवठा अधिकारी, रत्नागिरी**

## शिक्षकाचे अल्पवयीन विद्यार्थिनीशी गैरवर्तन

**चिपळूण :** चिपळूण तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेत कार्यरत असलेल्या एका शिक्षकाने दोन महिलांचे फोटो मॉर्फ करून ते अश्लील स्वरूपात तयार केल्याचा तसेच एका अल्पवयीन विद्यार्थिनीशी गैरवर्तन केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. संबंधित शिक्षकाला पोलिसांनी अटक केली असून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पांडुरंग गोविंद डाकरे (वय ५७, रा. कोल्हापूर) असे गुन्हा दाखल झालेल्या शिक्षकाचे नाव आहे. विशेष म्हणजे हा शिक्षक अवघ्या दोन महिन्यांत सेवानिवृत्त होणार होता. याबाबत पीडित महिलांनी चिपळूण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, २० जानेवारी रोजी डाकरे याने वाईट उद्देशाने दोन महिलांचे फोटो मॉर्फ करून त्यांना अश्लील स्वरूप दिले. यामध्ये एका पालक महिलेचाही समावेश आहे. यासोबतच त्याने एका अल्पवयीन विद्यार्थिनीशीही गैरवतन केल्याचे निष्पन्न झाले आहे. हा प्रकार पालकांसह ग्रामस्थांच्या लक्षात आल्यानंतर त्या शिक्षकाला त्यांनी जाब विचारला. याप्रकरणी त्या महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार चिपळूण पोलीस ठाण्यात त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## वयाल येथील स्वयंभू गणपती

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

पाताळगंगेच्या किनाऱ्यावर बारा वर्षपासून माघी गणपती उत्सव मोठ्या आनंदाने साजरा करण्यात येत आहे. या स्वयंभू गणपतीची आख्यायिका येथील ग्रामस्थ सांगताना म्हणाले की, वयाल येथे स्वयंभू गणपतीची मूर्ती, शनीची मूर्ती तसेच शिवलिंग अशा काही मूर्ती येथे सापडल्या. मात्र या मूर्ती येथे कशा आल्या हे अजूनही न उमगलेले कोडे आहे. पूर्वी या ठिकाणी मोठे जंगल असल्यामुळे येथे कोणीही येत नसे. मात्र गेल्या पन्नास-साठ वर्षांपूर्वी येथे काही मूर्ती असल्याचे येथील ग्रामस्थ यांच्या निदर्शनास आले. तसेच काही मूर्तींचे अवशेष विसर्जित करण्यात आल्याचे येथील ग्रामस्थांनी प्रतिनिधीशी बोलतांना सांगितले.



या मूर्तींची मनोभावे पूजा केल्यामुळे आलेले संकट दूर होते, आपल्याला सुख शांती लाभते, अशी येथील ग्रामस्थांची श्रद्धा आहे. पावसाळ्यात पावसाचे पाणी पाताळगंगेला खूप येते. मात्र गाभाऱ्याला पुराच्या पाण्याचा स्पर्श होत नसल्यांचे ग्रामस्थांनी सांगितले.

## बेस्टची बस खड्ड्यात अडकली

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

घाटकोपर-पंतनगर येथील आंबेडकर सर्कल येथे बेस्टच्या एका बसला रस्त्यातील खोदकामाचा फटका बसला आणि ती बस खड्ड्यात अडकली. ही घटना बुधवारी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली. सुदैवाने कुणालाही दुखापत झाली नाही. पंतनगर येथील आंबेडकर सर्पल परिसरातील रस्त्याचे काम मुंबई महापालिकेमार्फत केले जात आहे. हे काम करताना रस्त्याच्या अर्ध्या भागातून बसची वाहतूक सुरू ठेवली आहे. याच रस्त्यावरून बेस्टची ए-३२९ क्रमांकाची शिवाजीनगर आगार ते अंधेरी आगरकर चौक मार्गावर धावणारी बस जात होती. ही बस रस्त्यासाठी खोदलेल्या खड्ड्यात अडकली. रस्ता चुकीच्या पद्धतीने खोदल्यामुळे बस खड्ड्यात अपघात अडकल्याचे तेथील प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.



## लोकल ट्रेनवरही सीसीटीव्हीची नजर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**



लोकल ट्रेनच्या मोटरमन केबिनसमोर होणाऱ्या अपघातांचे नेमके कारण काय, हे शोधण्यासाठी आणि चौकशी अधिक पारदर्शक करण्यासाठी केबिनच्या बाहेर उच्च दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यास सुरुवात करण्यात आली आहे. लोकल ट्रेनच्या सुरक्षेच्या दृष्टीने मध्य रेल्वेने घेतलेल्या या निर्णयामुळे प्रवाशांसह मोटरमनलाही मोठा दिलासा मिळणार आहे. रेल्वे रुळांवर आत्महत्या, अचानक समोर येणारे अडथळे, सिग्नल बिघाड किंवा लोकलच्या समोरून होणारे अपघात याबाबत आतापर्यंत केवळ मोटरमनचा जबाब आणि प्रत्यक्षदर्शींच्या माहितीवर अवलंबून राहावे लागत होते. मात्र अनेकदा या जबाबांमध्ये तफावत आढळत असल्याने अपघाताचे खरे कारण स्पष्ट होत नव्हते. यामुळे काही वेळा मोटरमनवर चुकीचे आरोपही होत होते. ही बाब लक्षात घेऊन रेल्वे माहिती अधिकार कार्यकर्ते समीर झवेरी यांनी या प्रकल्पाबाबत माहिती मागवली असता, मध्य रेल्वेच्या ताफ्यातील मोठ्या प्रमाणावर लोकल ट्रेनमध्ये मोटरमन केबिनबाहेर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आल्याचे समोर आले आहे.

मध्य रेल्वेकडे एकूण १६४ लोकल गाड्या असून त्यापैकी १६१ लोकलमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित झाले आहेत. उर्वरित लोकलमध्ये कॅमेरे बसवण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. या सीसीटीव्ही फुटेजमुळे अपघातानंतर चौकशी अधिक पारदर्शक आणि अचूक होणार आहे.

## महाराष्ट्रातील सौर कृषी क्रांतीचा गौरव

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

शेतीसाठी वीजपुरवठा करणाऱ्या कृषी वीजवाहिन्यांच्या सौर ऊर्जीकरणात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल महावितरणचा ऑल इंडिया डिस्कॉम्स असोसिएशनच्या 'एडिकॉन-२०२६' या राष्ट्रीय परिषदेत बुधवारी (दि.२१) पुरस्काराने गौरव करण्यात आला. केंद्रीय ऊर्जामंत्री ना. मनोहर लाल यांच्याहस्ते महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली देशातील वीज वितरण क्षेत्रातील विविध संस्थांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ऑल इंडिया डिस्कॉम्स असोसिएशनच्या 'एडिकॉन-२०२६' राष्ट्रीय परिषदेचे नवी दिल्ली येथे दि.२१ व २२ ला आयोजन करण्यात आले होते. या परिषदेचे उद्घाटन केंद्रीय ऊर्जामंत्री ना. मनोहर लाल यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर केंद्रीय ऊर्जा सचिव पंकज अग्रवाल, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक आणि ऑल इंडिया डिस्कॉम्स असोसिएशनचे अध्यक्ष लोकेश चंद्र, सरचिटणीस डॉ. आशिष कुमार गोयल, महासंचालक आलोक




कुमार उपस्थिती होते. या परिषदेत देशभरातील वीज वितरण कंपन्यांचे पदाधिकारी व ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञ प्रतिनिधी उपस्थित होते.

आशियातील सर्वांत मोठा विक्रेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्प असलेल्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० चा 'एडिकॉन-२०२६' परिषदेत गौरव करण्यात आला. या योजनेत आतापर्यंत १९८५ कृषीवाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण करण्यात आले असून राज्यातील तब्बल ८ लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीजपुरवठा उपलब्ध झाला आहे. या योजनेमुळे ६५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह ७० हजारांवर ग्रामीण रोजगार निर्मिती सुरू आहे. तसेच, महावितरणच्या वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे.

## पैशांच्या वादातून मुलीला मारहाण

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

दारुला पैसे न दिल्याच्या रागातून मुलगी आणि साक्षीदाराला दगडी लादीच्या तुकड्याने मारहाण केली. ही घटना झारणीरोड येथे बुधवारी (दि.२१) दुपारच्या सुमारास घडली. सागर सुरेश गुरव (४५, रा. झारणीरोड, रत्नागिरी) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे. तर ऐश्वर्या सागर गुरव (२१) असे मुलीचे नाव असून तिने आपल्या वडिलांविरोधात शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार, बुधवारी दुपारी संशयित सागर गुरवने मुलगी ऐश्वर्या आणि साक्षीदाराकडे दारु पिण्यासाठी पैसे मागितले. त्यावर त्यांनी आमच्याकडे पैसे नाहित, असे सागरला सांगितले. या गोष्टीचा राग आल्याने सागर याने घरातील बाथरुमच्या बाजुला ठेवलेला दगडी लादीचा तुकडा उचलून तो ऐश्वर्याच्या डोक्यात मारला. यात पाटील गंभीर दुखापत झाली. त्यावेळी साक्षिदाराने त्यांची भांडणे सोडवण्याचा प्रयत्न केला असता सागरने दोघांनाही ठार मारुन टाकण्याची धमकी दिली.

## गुहागरमध्ये समुद्रकिनारी स्वच्छता मोहीम

**। गुहागर । प्रतिनिधी ।**

गुहागर समुद्रकिनारी ब्लू फ्लॅग पायलट दर्जा मिळणार आहे. यासाठी समुद्रकिनारी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून गुहागर बाजारपेठ ते दुर्गादेवी देवस्थानपर्यंत समुद्रकिनारा स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. गुरुवारी (दि.२२) सकाळी ७.३० वाजल्यापासून नगरपंचायत, बोरोसिल कंपनी, महाविद्यालये व नागरिक यांच्यावतीने समुद्रकिनारा स्वच्छ करण्यात आला.

## निवडक

### घाणेकर नाट्यगृहाचे नूतनीकरण होणार

**ठाणे :** घोडबंदर येथील मानपाडा परिसरातील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहाचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. नाट्यगृहाच्या नूतनीकरणासाठी राज्य शासनाकडून निधी प्राप्त झाला आहे. लवकरच निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. पालिका प्रशासनाच्या माहितीनुसार नाट्यगृहाचे नूतनीकरण येत्या फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात सुरू होईल आणि सुमारे तीन महिने चालेल. त्यामुळे घाणेकर नाट्यगृहाची तिसरी घंटा तब्बल तीन महिने बंद राहणार आहे. नाट्यगृहाच्या सुधारण्यासाठी मंजूर झालेल्या निधीचा उपयोग विविध कामांसाठी केला जाणार आहे. मंगळवारी आयुक्त सौरभ राव यांनी या कामांचा आढावा घेण्यासाठी बैठक घेतली. बैठक दरम्यान जलरोधक उपाययोजना, जलवाहिन्यांचे काम, विद्युत उपकरणांची दुरुस्ती, प्रेक्षागृहातील प्रकाश आणि ध्वनी यंत्रणा, वातानुकूलन व्यवस्था आणि रंगमंचाची दुरुस्ती यावर चर्चा करण्यात आली. तसेच, नाट्यगृहाच्या नूतनीकरणाचे काम करताना कलाकार व रसिकांच्या सुविधांना प्राधान्य देण्यात यावे, असे निर्देश महापालिका आयुक्त सौरभराव यांनी दिले आहेत.




### जिल्हाधिकाऱ्यांचे युवकांना मार्गदर्शन

**अलिबाग :** स्पर्धा विश्व अकॅडमी या ठिकाणी स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या रायगड जिल्ह्यातील युवक-युवतींसाठी प्रोत्साहनपर मार्गदर्शन व मतदार जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्वयंसिध्दा संस्था संचलित स्पर्धा विश्व अकॅडमी व प्रिझम सामाजिक विकास संस्था, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हाधिकारी किशन जावळे हे उपस्थित होते. तसेच महाराष्ट्राच्या गायिका ॲड. कलाताई पाटील, किरण करंदीकर, प्रिझम संस्थेच्या अध्यक्षा तथा राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी भारत सरकार तपस्वी नंदकुमार गोंधळी, स्पर्धा विश्व अकॅडमीच्या संचालिका तथा स्वयंसिद्धा संस्थेच्या अध्यक्षा सुचिता साळवी आदी मान्यवर व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तपस्वी गोंधळी करीत असताना त्यांनी स्पर्धा परीक्षांची तयारी करण्याकरिता आपल्या परिसरामध्ये कशाप्रकारे अकॅडमीची स्थापना केली, या संदर्भात माहिती दिली. यावेळी प्रमुख मार्गदर्शक जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी किशन जावळे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी करताना वेळेचे उत्तम नियोजन केले पाहिजे, असे सांगितले. तसेच, सकारात्मक असणे गरजेचे आहे, चांगली संगत महत्त्वाची आहे, स्पर्धा परीक्षांबरोबर इतरही रोजगाराभिमुख व कौशल्यावर आधारित उपक्रम शिकून घेतले पाहिजेत. स्वप्न मोठी पहा, स्वप्न पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत त्यांचा पाठपुरावा करणे याच्यातूनच यश प्राप्त होते, असे देखील सांगितले. डिटर्मिनेशन, कन्सिस्टन्सी ध्येय साध्य करताना फार महत्त्वाचे ठरतात, असे त्यांनी सांगितले. स्पर्धा परीक्षांबरोबरच आपला प्लॅन बीदेखील तयार ठेवा. जेणेकरून अपयश आले, तर खचून न जाता आपण दुसऱ्या प्लॅनवर काम करून यशस्वी होऊ शकतो.

### कुत्र्यांच्या हल्ल्यात पाच जण जखमी



**सिंधुदुर्ग :** वैभववाडी तालुक्यात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढत चालला आहे. सोमवारी सकाळी वेगवेगळ्या ठिकाणी कुत्र्यांच्या हल्ल्यात पाच नागरिक गंभीर जखमी झाले. जयवंती दत्ताराम पांचाळ (रा. ऐणारी), रघुनाथ भिकाजी मोहिते (रा. ऐणारी), संतोष बापू शेळके (रा. भुईबावडा), राजेंद्र रमेश पाथरे (रा. तिरवडे) आणि परशुराम राठोड (रा. भुईबावडा) अशी जखमींची नावे असून, यामध्ये दोन वयोवृद्धांचा समावेश आहे. या घटनेनंतर सर्व जखमींना तातडीने ग्रामीण रुग्णालय, वैभववाडी येथे दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, तालुक्यात भटक्या कुत्र्यांची संख्या वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच, भटक्या कुत्र्यांमुळे रस्त्यावर अचानक कुत्री आडवी येऊन अनेक दुचाकीस्वार अपघातग्रस्त होऊन जखमी होत असल्याच्या घटनाही वाढल्या आहेत. तसेच पाळीव जनावरांनाही या कुत्र्यांकडून त्रास दिला जात असल्याचे नागरिकांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर संबंधित प्रशासनाने तातडीने भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. वारंवार होणाऱ्या घटनांमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

### सोशल मीडियाचा वापर मर्यादित ठेवा



#### पोलीस निरीक्षक सचिन पवार यांचे आवाहन

**रसायनी :** सोशल मीडियाचा मानसिक आरोग्यावर ताण, व्यसन, अभ्यासात लक्ष न लागणे, झोप कमी होणे आणि सायबर बुलिंग यामुळे वास्तविक जीवनातील संबंधांवरही नकारात्मक परिणाम होतो. गोपनीयतेचा धोका वाढून वाईट प्रसंगाला सामोरे जावे लागते. त्याने एखाद्याचे आयुष बरबाद होते, असे संबोधन खालापूर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी केले. जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या निवडणूका लागल्या असल्याने खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी ग्रुप ॲडमिन, वॉट्स ॲप ग्रुप, इंस्टाग्राम, फेसबुक ॲडमिन व गाव पोलीस पाटील यांची बैठक आयोजित केली होती. त्याप्रसंगी ते उदाहरण देऊन मार्गदर्शन करीत होते. यावेळी ते म्हणाले की, मानसिक आणि भावनिक परिणाम, ऑनलाइन जास्त वेळ घालवल्याने प्रत्यक्ष सामाजिक संबंध कमी होतात आणि एकाकीपणाची भावना निर्माण होते. ऑनलाइन नकारात्मक टिप्पण्या किंवा लाइक्स न मिळाल्यास आत्मसन्मान कमी होऊ शकतो. यामुळे आपले वर्तन आणि जीवनशैलीतील बदल होतो. सोशल मीडियावर जास्त गुंतल्याने वास्तविक जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे सुरक्षा आणि सामाजिक धोके निर्माण होतात. चुकीची किंवा भडकाऊ माहिती पसरते. ज्यामुळे समाजात गैरसमज निर्माण होतात. यासाठी सोशल मीडियाचा वापर मर्यादित ठेवा, असे आवाहन करण्यात आले. तसेच, सोशल मीडिया चांगल्या पद्धतीने वापरा, असे आवाहन उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल यांनी केले.

**तीन कोटी रुपयांचा निधी मंजूर** | **पायाभूत सुविधा उभारल्या जाणार**

# केळवे समुद्रकिनाऱ्यावरील पर्यटनाला चालना

**। पालघर । प्रतिनिधी ।**

पालघर जिल्ह्यातील केळवे पर्यटन केंद्राच्या विकासासाठी जिल्हा नियोजन समितीने तीन कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. समुद्रकिनारी पायवाटा, उद्यान, स्वच्छता सुविधा व सेल्फी पॉईंटसह पायाभूत सुविधा उभारल्या जाणार आहेत. या कामांचे भूमिपूजन केळवा महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर लवकरच करण्यात येणार आहे. त्यामुळे लोकप्रिय पर्यटनस्थळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या केळवे समुद्रकिनाऱ्याच्या विकासाला चालना मिळणार आहे.

केळवे समुद्रकिनारा हा निसर्गसौंदर्याने नटलेला असून पर्यटकांच्या पसंतीचा परिसर समजला जातो. या समुद्रकिनाऱ्यावर आता पर्यटनाला चालना मिळणार आहे. या सर्व कामांसाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत निधीची तरतूद करण्यात आली असून जिल्हाधिकाऱ्यांनी या कामांना प्रशासकीय मान्यतादेखील दिली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तांत्रिक मान्यता घेऊन ही सर्व कामे मे महिन्यापूर्वी पूर्ण करण्याचा मानस प्रशासनाचा आहे. केळवा महोत्सवाचे आयोजन या आठवड्यात करण्यात येणार असून या महोत्सवाच्या उद्घाटनादरम्यान पायाभूत विकासकामांचे भूमिपूजन करण्यात येणार असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून देण्यात आली आहे.



### स्वच्छता, सुव्यवस्थेवर विशेष भर

समुद्रकिनाऱ्यालगत असलेल्या सुरूच्या झाडांच्या बागेतील पायवाटा विकसित करण्यात येणार आहेत. वाहनांसाठी स्वतंत्र वाहतूक बेटाची उभारणी, लहान मुलांसाठी खेळाच्या साहित्यासह उद्यानाची निर्मिती, आधुनिक स्नानगृहाची उभारणी, आकर्षक सेल्फी पॉईंट यांचा या योजनेत समावेश करण्यात येणार आहे. पर्यटकांच्या सोयीसाठी समुद्रकिनारी पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करण्यासाठी पाण्याचे स्रोत विकसित करण्यात येणार आहे. तसेच स्वच्छतागृहांचे नूतनीकरण केले जाणार असून खाद्यपदार्थ विक्रीसाठी असलेल्या स्टॉलना आकर्षक स्वरूप देत स्वच्छता आणि सुव्यवस्थेवर विशेष भर देण्यात येणार आहे.

### दाभोसा येथे काचेचा तरंगता पूल

जव्हार तालुक्यातील दाभोसा धबधबा पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पर्यटकांना आकर्षित करतो. मात्र धबधब्याचे प्रचंड आकारमान आणि खोल दरीमुळे धबधब्याच्या तळाशी जाणे धोकादायक ठरते. त्यामुळे पर्यटकांना सुरक्षित पद्धतीने धबधब्याचा अनुभव घेता यावा यासाठी आंतरराष्ट्रीय धर्तीवर काचेचा तरंगता पूल उभारण्याचा प्रस्ताव तयार करण्यात येणार आहे.

# जिल्ह्यात मंगलमूर्ती मोरयाचा गजर



**रायगड**
**जिल्ह्यात गुरुवारी (दि.२२) रोजी माघी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रामीण तसेच शहरी भागात धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यात ठिक-ठिकाणी मुर्तींची स्थापना करण्यात आली होती. अलिबागमधील कुलाबा किल्ल्यांतील सिध्दीविनायक मंदिरासह, पाली येथील बल्लाळेश्वर तसेच खालापूरमधील महड येथील गणरायाच्या मंदिरात तसेच जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणी मंदिरात गणेशमुर्तींची स्थापना करून धार्मिक विधी करण्यात आले. सकाळपासून भाविकांसाठी मंदिर खुले केले होती. काही ठिकाणी भजनांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तर काही ठिकाणी पालखी मिरवणूक काढण्यात आली होती. जिल्ह्यात माघी गणेशोत्सव उत्साहात साजरा करण्यासाठी रायगड पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मिरवणुकांच्यावेळी कोणताही गैरप्रकार घडू नये यासाठी प्रत्येकाच्या संशयीत हालचालीवर लक्ष ठेवण्याचे काम केले होते.**

## सिद्धिविनायक मंदिरात भाविकांची गर्दी

**| कोर्लई | प्रतिनिधी |**

मुरुड तालुक्यातील प्रसिद्ध असलेल्या नांदगावच्या श्रीसिद्धिविनायक मंदिरात माघी उत्सवाला प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही भाविकांनी मोठी गर्दी केली होती. पहाटे मंदिराचे पुजारी महेश जोशी, शैलेश जोशी व त्यांचे सहकाऱ्यांनी श्रींची शोडषोपचारे पूजा केली त्यानंतर चिटणीस गुप्ते कौटुंबिक ट्रस्टतर्फे पूजा करण्यात आली तर पूजेनंतर मंदिर भक्तांसाठी खुले करण्यात आले होते.

यावेळी पुजेचा मान दिपाली व चेतन देशपांडे यांना मिळाला.



पहाटे भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. यावेळी गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी मुरुड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी मोठे सहकार्य केले. नांदगावमधील मुख्य रस्त्यांवर सतत जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांमुळे यात्रेमुळे वाहतुकीत अडथळा निर्माण झाला होता.

श्रेयस बडवे यांनी जन्मोत्सवाचा सोहळा पार पाडला. चिटणीस गुप्ते कौटुंबिक ट्रस्टच्या भगिनींनी पाळणा गीत सादर केले. त्यानंतर श्रींच्या मुर्तीचे दर्शन भक्तांना घडविण्यात आले. सकाळी, सायंकाळी स्थानिक भजनी मंडळींची सुस्वर भजने व रात्री आठ वाजता पालखी मिरवणूक काढण्यात आली.

## चिरनेरमध्ये महागणपतीच्या दर्शनासाठी रांगा

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर शब्द उच्चारला की, श्री महागणपती व चिरनेर जंगल सत्याग्रह ही दोन नावे पुढे येतात. याच उरण तालुक्यातील चिरनेर महागणपती क्षेत्रात माघी गणेश जयंतीनिमित्ताने गुरुवारी लाखो भाविकांनी प्राचीन जागृत महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला. रात्री साडेतीन वाजताच मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले. यावेळी प्रथम महागणपतीचा अभिषेक व महापूजा करण्यात आली.



त्यानंतर श्रींच्या दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले. दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाचा जयघोष करीत भक्तीमय वातावरणात श्रींचे दर्शन घेतले. यावेळी हजारो गणेश भक्तांनी श्रींच्या जन्मोत्सवाच्या कीर्तनातून, श्रवण सुखाचा लाभ घेतला. दुपारी महाप्रसादाला सुरुवात झाली. आणि या महाप्रसादाचा समस्त चिरनेर गावकऱ्यांनीच नव्हे तर आजूबाजूच्या गावातील गावकऱ्यांनी लाभ घेतला.

महागणपतीचे देवस्थान अत्यंत पुरातन व जागृत असून, येथील श्रींच्या दर्शनासाठी मुंबई, नवी मुंबई, पुणे, ठाणे, डोंबिवली, कल्याण, उरण, पनवेल, पेण तसेच राज्याच्या अनेक भागातून, आलेल्या लाखो भाविकांनी पहाटेपासूनच गर्दी केली होती. चिरनेर गावातील माघी गणेशोत्सव हा प्रचंड मोठ्या प्रमाणावर होत असल्याने, संपूर्ण चिरनेर गाव भाविक भक्तांनी फुलून निघाले होते. भक्तगणांची गैरसोय होऊ नये, सर्वांना सुखकर सोयी सुविधा मिळून, रांगेत दर्शन घेता यावे, वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी देवस्थान प्रशासनाकडून कडक बंदोबस्त आणि आवश्यक सुसज्ज नियोजन करण्यात आले होते. उत्सवानिमित्त चिरनेरच्या नागरिकांनी भक्तांच्या स्वागतासाठी जागोजागी स्वागत फलक उभे केले होते. तसेच विविध महत्त्वाच्या ठिकाणी स्वागत कमानी देखील उभारल्या होत्या. श्रींच्या दर्शनासाठी आलेल्या गणेश भक्तांच्या अफाट गर्दीमुळे चिरनेरच्या पावन तीर्थात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.



## म्हसळ्यात कीर्तनाचे आयोजन

**| म्हसळा | प्रतिनिधी |**

दैवज्ञ समाज गणेश मंदिर ट्रस्ट म्हसळा यांच्या विद्यमाने म्हसळा येथील श्री गणेश मंदिरात सालाबाद प्रमाणे याही वर्षी माघी गणेश जयंती उत्सव मोठ्या आनंदात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. गुरुवारी पहाटे सहा वाजता श्रींची अभिषेक पूजाविधी, दैवज्ञ समाज महिला मंडळ यांचे संगीत भजन, सिद्धीकला भजन मंडळाचे संगीत भजन, विविध धार्मिक कार्यक्रमासाह महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

गणेशोत्सवानिमित्त कीर्तनकार मंदार भावे यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. भावे यांनी आपल्या कीर्तनात संत तुकाराम महाराज, दत्तगुरु महाराज यांच्या बद्दल अनेक उदाहरणे देऊन सर्व भाविकांना नामस्मरणाचे महत्व पटवून दिले.

कार्यक्रमास दैवज्ञ समाज अध्यक्ष सुनील उमरोठकर, अनिल पोतदार, नंदकुमार गोविलकर, समीर बनकर, गौरव पोतदार, मनोज पोतदार, मच्छिन्द्र पोतदार, दिलीप घोसाळकर, शरद घोसाळकर, सुमित वेदक, सुनील गणपत पोतदार, महादेव पाटील, सुनील केरू पोतदार, सार्थक घोसाळकर, दिलीप करंबे, महेंद्र पोतदार, गौरी प्रसाद पोतदार, संपदा पोतदार, दादा पानसरे, मीना पोतदार, समिधा वेदक, आदी मान्यवर उपस्थित होते.

## दर्गेंच्या निवासस्थानी गणेशोत्सव

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरूड-कुभांरवाड्यातील संतोष रामचंद्र दर्गे आपल्या निवासस्थानी गेली २६ वर्ष उत्सव साजरा करीत आहेत. दर्ग यांना त्यांच्या जागेत श्रीगणेशाची मूर्ती आढळुन आली होती. त्यांनी त्या मुर्तीची स्थापना माघी गणेश जयंती दिवशी केली. गुरुवारी (दि.२२) रोजी दर्शनासाठी अनेक श्रीगणेशभक्त आले होते. याप्रसंगी भजन कीर्तन प्रवचन असे धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सकाळी गणेशाची पूजन, अभिषेक, होम हवनकरण्यात आली. त्यानंतर श्री गणेशाच्या दर्शना करिता रांगा लावण्यात आल्या होत्या. पुजेचे मानकरी विशाल विरकूड व त्यांच्या पत्नी ज्योत्स्ना विरुकुड यांना मिळाला. हा उत्सव संपन्न करण्याकरिता सत्यम युवक क्रिडा मंडळ महिला मंडळ अध्यक्ष व सर्व सभासद मेहनत घेतली.




**● पाली येथील श्री बल्लाळेश्वर मंदिरात गेली ११ वर्ष बाप्पाच्या सेवेत दर गणेश जयंतीला पालीतील अर्चना शेडगे ही २४ तास कष्ट घेऊन आकर्षक व मनमोहन रांगोळी काढते. तिच्या या कृतीचे सर्वत्र कौतुक होत आहे. (छाया: धम्मशील सावंत, पाली बेणसे)**

## गणेशभक्तांचा विनामूल्य प्रवास

**चिरनेर :** पनवेल, उरण तालुक्यातील ग्रामीण भागात माघी गणेशोत्सव अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. महेंद्र घरत गणरायाच्या प्रेमापोटी त्यांनी मोरावे गावातील तरुणांनी समुद्रात बांधलेल्या मंदिरात भक्तांना



सुलभ दर्शन व्हावे म्हणून लाँच सेवा भेट दिली होती. त्याद्वारे गणेशभक्तांना विनामूल्य प्रवास घडविला. गुरुवारी (दि.२२) माघी गणेशोत्सवानिमित्त त्यांनी मोरावे, मुर्बा गणपती, गव्हाण, न्हावाखाडी, उरण, चिरनेर, विंधणे, बेलपाडा, मोठीजुई, ओवळे, धुतूम यागावासह अन्य गावांत जाऊन गणरायाचे दर्शन घेतले.



**● पनवेलच्या प्रभू आळीमध्ये माघी गणेशोत्सव मंडळची श्री गणेश मूर्ती प्रतिष्ठान करण्यात आली. (छायाचित्र : राजेश डांगळे)**



**● पनवेलच्या ज्येष्ठराज सिद्धीविनायक श्रीगणेश मंदिरात माघी गणेशोत्सवनिमित्त बाल गणेशचा पाळणा सजवण्यात आला.**



**● मुरूड नांदगावच्या श्री सिद्धीविनायक माघी उत्सवात भजनासाठी मोठा भक्तसागर जमला होता. (छायाचित्र : सुधीर नाझरे)**



**● माघी गणेशोत्सवानिमित्त अलिबाग एसटी बस आगारात गणेशजयंती साजरी करण्यात आली. आगारातील अधिकारी, कर्मचारी यांच्यासह प्रवाशांनी गणरायाचे दर्शन घेतले.**

### बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांच्या रांगा | यात्रेत कोट्यवधींची उलाढाल

## पालीत उसळला गणेशभक्तांचा महासागर

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

**महाराष्ट्रातील अष्टविनायकांपैकी एक प्रख्यात धार्मिक स्थळ असलेल्या श्री बल्लाळेश्वर विनायकाचा माघ मासोत्सव व जन्मोत्सव गुरुवारी (दि.२२) रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी धार्मिक कार्यक्रम व विधी करण्यात आले. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच भक्तांच्या रांगा लागल्या होत्या. राज्याबाहेरून व राज्यभरातून आलेल्या हजारो भाविकांनी बल्लाळेश्वरचे दर्शन घेतले. यानिमित्त पालीत मोठी यात्रा देखील भरली होती.**



जन्मोत्सवाला बाळ गणेशाच्या मूर्तीला पाळण्यात टाकून भक्तीभावाने पाळणा हलविण्यात आला. यावेळी बल्लाळेश्वर देवस्थानचे अध्यक्ष जितेंद्र गद्रे, वैभव आपटे, प्रमोद पावगी, अरुण गद्रे, विश्वास गद्रे, अमोल साठे व डॉ. पिनाकीन कुंटे, गणेश कोणकर, गुरव, मान्यवर उपस्थित होते.

गणेश जयंतीच्या दिवशी आलेल्या भाविकांना चहा व अल्पोपहार देवस्थानकडून विनामूल्य देण्यात आला. महोत्सवानिमित्त प्रशासन व देवस्थान यांच्या समन्वयातून योग्य नियोजन करण्यात आले होते. बल्लाळेश्वर मंदिर गाभारा, सभामंडप व परिसरात आकर्षक रोषणाई आणि सजावट करण्यात आली आहे. मंदिराच्या बाहेर काढलेल्या विविध सुबक रांगोळी आलेल्या भाविकांचे लक्ष वेधत होते. अनेकजण त्या रांगोळ्या कॅमेऱ्यामध्ये कैद करत होते. अनेक जणांनी आपल्या व्हाट्सअप व फेसबुक स्टेटसवर संपूर्ण पालीतील आणि गणपती, मंदिर व यात्रेचा ड्रोनद्वारे काढलेला व्हिडिओ तसेच फोटो ठेवले होते. यंदा मंदिराच्या समोरील तळ्याच्या भिंतीवर ऑपरेशन सिंदूरचे बॅनर लावण्यात आले होते.

वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी वाहतूक पोलीस, तसेच देवस्थानचे सुरक्षारक्षक देखील तैनात करण्यात आले आहेत. अनेक भाविक बल्लााळेश्वराच्या दर्शनासाठी पायी दिंडी काढत चालत आले होते. यामध्ये प्रामुख्याने उरण, पेण, पनवेल व अलिबाग आदी ठिकाणचे भाविक होते. पालखीच्या वेळी वीर गर्जना ढोल पथकाने वादन केले.

या उत्सवासाठी तहसील कार्यालय, पोलीस प्रशासन, स्थानिक नगरपंचायत आणि ग्रामस्थांचे मोठे सहकार्य लाभत आहे. हा उत्सव शांततेत आणि आनंदात साजरा व्हावा, असे आवाहन देवस्थान प्रशासनामार्फत करण्यात आले होते.

### पार्किंगचे नियोजन

शहरातील वाढती गर्दी आणि अरुंद रस्ते लक्षात घेता, तहसीलदार उत्तम कुंभार व पोलीस पोलीस प्रशासनाने पार्किंगचे स्वतंत्र नियोजन केले आहे. खासगी व मोठ्या बसेस: खोपोली आणि वाकण रोडवरील नियुक्त जागेवर उभ्या केल्या गेल्या. बाहेरगावाहून येणाऱ्या वाहनांसाठी पाली गावाच्या बाहेर तीन विविध दिशांना स्वतंत्र वाहनतळ उभारण्यात आले आहेत. मोफत शटल सेवा देण्यात आली आहे. पार्किंग स्थळापासून मंदिरापर्यंत भाविकांना आणण्यासाठी मोफत विक्रम रिक्षांची सोय करण्यात आली होती.

# पी.एल.गायकवाड यांना डॉक्टरेट प्रदान

**पनवेल :** महात्मा फुले छ. शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्याचे अभ्यासक माजी प्राचार्य पी. एल गायकवाड यांना भारत मंच ट्रस्ट, संविधान हॉल, दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात सिक्कीम राज्याचे माजी राज्यपाल वाल्मीकी प्रसाद सिंग यांच्या शुभ हस्ते अमेरिका इंटरनॅशनल युनिर्व्हसिटीच्या वतीने सामाजिक कार्याबद्दल डॉक्टरेट ही पदवी प्रदान करण्यात आली.

या प्रसंगी नॅशनल युथ अवार्डी डॉ. मनीष गवई, पद्मश्री बी. आर. इदाते, सुरेखा लामतुरे आदी मान्यवर कार्यक्रमासाठी उपस्थित होते. पी. एल. गायकवाड हे सु. ए. सो. चे ज्ञानवर्धिनी माध्यमिक विद्यालय सावळे येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. ते सध्या सेवानिवृत झाले आहेत. शाळा सांभाळत त्यांनी अनेक सेवाभावी संस्था व पदाधिकारी म्हणून काम पाहिले. यापुर्वी पी. एल. गायकवाड यांना राज्यस्तरीय व राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **बागायती वाडी विक्री** -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २७ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव- थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३
- **नागाव मधील हॉटेलमध्ये काम** करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे . रिसेप्शनिस्ट, कॉन्टिनेंटल, मेन्टेनन्स १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल – ७५५९१८४६१२
- **सिव्हील इंजिनियरींग ऑफिसमध्ये कामाकरीता ड्राफ्टसमन** (Autocad) पाहिजे. फोन नं. ८३०८२००७७७/७७५८०६४७७३/९६६५०६७९१७
- **जन्नावार हॉस्पिटल अलिबागमध्ये कामासाठी मावशी** व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No 7798034509
- **आवश्यक : सहाय्यक कर्मचारी खाजगी बंगल्याच्या** साफसफाईसाठी आणि देखभालीसाठी जबाबदार आणि विश्वासू व्यक्तींची आवश्यकता आहे. दैनंदिन घरकाम, सामान्य देखभाल आणि पाहुण्यांच्या व्यवस्थेत मदत करणे या कर्तव्यांमध्ये समाविष्ट आहे. पूर्णवेळ/राहणे पसंत. पूर्वीचा अनुभव इष्ट. स्थान: नागाव, संपर्क : ९८२०४१४८११ बैठकीची तारीख २४ ते ३१ जानेवारी २०२६ सकाळी ११ वाजल्यापासून सुरू.

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**


### उरण नगरपरिषद, उरण
**ता. उरण, जिल्हा रायगड**
**ई-निविदा सुचना क्र. ०१/२०२६**

उरण नगरपरिषद, उरण ता. उरण, जि. रायगड यांचेकडून उरण नगरपरिषदेच्या कर वसुली विभागाअंतर्गत उरण नगरपरिषद क्षेत्रातील जुन्या व नवीन मिळकत व खुले भूखंड यांचे भौगोलिक माहिती प्रणालीद्वारे/प्रत्यक्ष सर्वेक्षण करून चतुर्थ वार्षिक कर आकारणी करणे कामी नोंदणीकृत अनुभवी कंत्राटदारांकडून गुणवत्ता निकषद्वारे ई-निविदा मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशिल www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. २४/०१/२०२६ पासून उपलब्ध होईल.

सही/-
**(समीर जाधव)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद, उरण**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी दिलेल्या सुचनेवरून आम्ही मौजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील विद्यमान मालक १) माधव अनंत गोखले, २) श्रीकांत भास्कर गोखले, ३) अविनाश सखाराम गोखले, ४) वैजयंती मुकुंद गोखले, ५) शशांक रघुनाथ गोखले, ६) अनिल प्रभाकर गोखले, ७) पुर्वा पुरूषोत्तम देवधर, ८) शिरिष रघुनाथ गोखले, ९) अनुराधा धनंजय केळकर, १०) चंद्रशेखर भास्कर गोखले, ११) नंदकुमार भास्कर गोखले, १२) अंजली अशोक गोखले, १३) चैत्राली अशोक गोखले, १४) समिर मुकुंद गोखले, १५) वृषाली किशोर देशमुख, १६) मिलिंद रामचंद्र गोखले व १७) किशोर रामचंद्र गोखले यांच्या नावे असलेल्या खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीच्या मालकी हक्कांच्या निर्वेधतेची पडताळणी करीत आहोत. मिळकतीचे मालकांनी असे निवेदीत केले आहे की, खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये त्यांस पुर्णपणे व निर्वेध मालकीहक्क आहेत व ती विकणेचा त्यांस पुर्ण हक्क अधिकार आहे.

तरी ज्या इसमांचा त्या मिळकतीमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असेल, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट अे.डी. द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतीमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायम स्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व मिळकतीचे विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहेत असे गृहित धरून आमचे अशिल नियोजित खरेदी-विक्री व्यवहार पुर्ण करतील. नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**परिशिष्ट**

**मौजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. ८३५/२/३ एकूण क्षेत्र १ हे. १६.४० आर, आकार २ रूपये ३५ पैसे पैकी ० हे. ९७.४० आर, आकार १ रूपये ९७ पैसे एवढे क्षेत्र.**

**पैकी रस्त्यालगत असलेले पुर्वेकडील क्षेत्र ० हे. ५८ आर.**

सदरचे ० हे. ५८ आर मिळकतीस चतुःसीमा :-
पूर्वेस :- मौजे धोकवडे गट नं.७९४ या मिळकतीची हद्द.
पश्चिमेस :- मौजे धोकवडे गट नं.८३५/२/३ ची उर्वरित मिळकत
दक्षिणेस :- मौजे आवासची शिव.
उत्तरेस :- मौजे धोकवडे गट नं. ७९५ या मिळकतीची हद्द.

अलिबाग
तारीख : २३/०१/२०२६

सही/-
**अॅड. गणेश गोविंद पाटील.**
अे/ १,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

### महावितरण — जाहीर निवेदन

**अलिबाग विभागातील वीजबिल थकीत ग्राहकांसाठी जाहीर सूचना**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. अलिबाग विभागाअंतर्गत अलिबाग उपविभाग–१, अलिबाग उपविभाग–२ व उपविभाग पेण अंतर्गत सर्व वीजग्राहकांमध्ये रू. १०००/–पेक्षा जास्त व ४५ दिवसांपासून थकीत वीजबिल असलेल्या ग्राहकांविरूद्ध महावितरण तर्फे वीजपुरवठा खंडीत करण्याबाबत कडक कार्यवाही करण्यात येत आहे. याबाबतची पुर्व सूचना ग्राहकांच्या नोंदणीकृत भ्रमणध्वनी, ई–मेल U/s 56 Of EA2003 वारंवार देऊनही वीजबिल न भरलेल्या ग्राहकांचा वीजपुरवठा दिनांक २३.०१.२०२६ रोजी पासून पुढे सकाळी ०८ वाजल्यानंतर कोणतीही पूर्व सूचना न देता खंडीत करण्यात येणार आहे. वीज पुरवठा खंडीत झाल्या नंतर पुन्हा सूरू करण्यासाठी पुर्ण थकबाकी भरणे आवश्यक असून त्यासोबतच सिंगल फेजसाठी रु. ३१०/– व थ्री फेजसाठी रू. ५२०/– पुनर्जोडणी शुल्क आकारण्यात येईल. सर्व थकबाकीदार ग्राहकांनी याची नोंद घ्यावी. सर्व सन्माननीय वीजग्राहकांनी वीज बिल भरून सहकार्य करावे अन्यथा वीजपुरवठा खंडीत करण्यात येणार आहे, असे आवाहन महावितरण अलिबाग विभागाने केले आहे. कृपया संबंधित वीज ग्राहकांनी याची नोंद घ्यावी व म.रा.वि.वि. कंपनीस सहकार्य करावे.

PRO No. 009 — **कार्यकारी अभियंता, महावितरण, अलिबाग विभाग.**

### सिडको — शहरांचे शिल्पकार

## शुद्धीपत्रक

**विषय: साडेबारा टक्के योजनेनुसार वाटप करण्यात आलेला मौजे द्रोणागिरी येथील सेक्टर–५५ मधील भुखंड क्र. ७६A क्षेत्र–३०० चौ.मी. या भूखंडाचे सोडत यादीतील नावामध्ये झालेली चुक दुरुस्तीबाबतचे शुद्धीपत्रक.**

या जाहिर सूचनेद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, साडेबारा टक्के योजनेअंतर्गत दिनांक २५.०९.२०२५ रोजीच्या संगणकीय सोडतीमध्ये इरादित करण्यात आलेला मौजे द्रोणागिरी येथील सेक्टर–५५ मधील भूखंड क्र. ७६A, क्षेत्र–३०० चौ.मी. या भूखंडाचे भूखंडधारकांचे नांव **मे. मिडलॅण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. शरणदीप सिंग मुखविंदर सिंग गिल व श्री. शमशेर सिंग धिमान** असे चुकीचे टंकलेखित करण्यात आले आहे.

सबब नावामध्ये झालेली चुक दुरुस्ती करण्याबाबत शुद्धीपत्रक देण्यात येत आहे. यापुढे साडेबारा टक्के योजनेअंतर्गत भूखंड वाटपासाठी दिनांक २५.०९.२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या द्रोणागिरी नोड मधील संगणकीय सोडत यादीतील नाव हे मे. मिडलॅण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. शरणदीप सिंग मुखविंदर सिंग गिल व श्री. शमशेर सिंग धिमान ऐवजी **मे. मिडलॅण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. शरणदीप सिंग मुखविंदर सिंग गिल व श्री. विजयकुमार मदनलाल शर्मा** असे वाचण्यांत यावे, याची कृपया नोंद घ्यावी.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (उरण)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/४७१/२०२५-२६

### महाराष्ट्र शासन
**सहकार विभाग**
**सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग कार्यालय**
**कॉंग्रेस भवन ट्रस्ट इमारत, पहिला मजला, महर्षी कर्वे रोड, पो. ता.अलिबाग जि.रायगड पिन कोड ४०२२०१**
Email ID : arcsalibag@gmail.com

**सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग यांचे समोर**

अर्ज क्रमांक १७३/२०२५

दि.रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग — अर्जदार
तर्फे श्री.वैभव पांडुरंग पाटील पाटील व्यवस्थापक

विरूद्ध

१.श्री.धर्मेंद्र रामचंद्र म्हात्रे
मु.शहाबाज, पो.शहाबाज
ता.अलिबाग जि.रायगड
२.श्री.रामचंद्र शंकर म्हात्रे
मु.शहाबाज, पो.हाशिवरे — प्रतिवादी
ता.अलिबाग जि.रायगड
३.श्री.संकेत धर्मराज जुईकर
मु.रांजणखार डावली पो.सारळ
ता.अलिबाग जि.रायगड
४.अजय दिनानाथ पाटील
मु.धामणपाडा, पो.शहाबाज
ता.अलिबाग जि.रायगड

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम चे कलम १०१ आणि नियम ८६ अन्वये वसुलीस प्राप्त रक्कम रू.५,९३,००५/-साठीचा अर्ज.

ज्या अर्थी दि.रायगड जिल्हा मध्यवर्ती सह बँक लि.अलिबाग तर्फे श्री.वैभव पांडुरंग पाटील व्यवस्थापक अलिबाग, यांनी दिनांक १३/११/२०२५ रोजी तुमचे विरूद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रितसर अर्ज या प्राधिकरणासमोर केलेला आहे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरून अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी सदर अर्जामध्ये तुम्हा जाब देणार यांचे विरूद्ध रक्कम रूपये ५,९३,००५/-(अक्षरी रूपये पाच लाख त्र्यान्नव हजार पाच मात्र) चे वसुली प्रमाणपत्र मिळावे म्हणुन विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी नियमाचे नियम ८६ ब नुसार सर्व प्रतिवादीना नोटीस दिनांक २१/११/२०२५ रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने नोटीस निर्गमित करणेत आली होती. २१/११/२०२५ रोजी नोटीस देऊन दि.११/१२/२०२५ सुनावणी ठेवण्यात आली तसेच दि.१८/१२/२०२५ रोजी नोटीस देऊन दि.२९/१२/२०२५ रोजी सुनावणी ठेवण्यात आली परंतु आपण सुनावणीस गैरहजर राहिले. अर्जदाराने जाहीर नोटीस देणेची विनंती केली. त्यानुसार प्रतिवादी यांना जाहीर नोटीस देणेत येते की, दिनांक ०२/०२/२०२६ रोजी दिवसाचे दुपारी १२.०० वा सहायक निबंधक, सहकारी संस्था अलिबाग यांचे कार्यालय कॉंग्रेस भवन ट्रस्ट इमारत, पहिला मजला, महर्षी कर्वे रोड, पो.ता.अलिबाग जि.रायगड पिन कोड ४०२२०१ या कार्यालयात तुम्ही स्वतः हजर राहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासुन १० दिवसाच्या आत या प्राधिकरणासमोर सादर करावे.

या कामी तुम्ही गैरहजर राहिलेस किंवा बचाव करणेचा अर्ज/शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस, अर्जदाराचे अर्जात केलेली अभिकथने आपण स्विकारली आहेत असे गृहीत धरून, अर्जाची चौकशी करून, अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल यांची नोंद घ्यावी.

दिनांक : २०/०१/२०२६

**(अनिल पवार)**
**सहायक निबंधक**
**सहकारी संस्था अलिबाग**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली मिळकत माझ्या अशिलांनी सदरच्या मिळकतीचे कब्जेदार मालक श्री. राजन रामनाथ डेरे व गीता जयंत गद्रे यांच्याकडून व त्यांच्या इतर नातेवाईकांकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे मान्य व कबुल केलेले असून त्याविषयीचा लेखी साठेकरार झालेला असून त्याचे पैसे सदरच्या व्यक्तींनी चेकने स्विकारलेले आहेत व सदरचा साठेकरार आजही अस्तित्वात आहे व सदरच्या साठेकराराप्रमाणे ठरलेला व्यवहार पूर्ण करण्यास माझे अशिल आजही तयार आहेत.

**मिळकतीचे वर्णन:-**

| गावाचे नाव | सर्व्हे नं/हिंनं | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| झिराड, ता.अलिबाग, जि. रायगड | गट नं-५२३ नवीन गट नं.३८३ जुना सर्व्हे नं. २०९/१ | १.०३.०० ०.२४.०० १.२७.०० | २.१५ |

असे असतानाही माझ्या अशिलांच्या असे लक्षात आले आहे की, श्री. राजन डेरे, गीता गद्रे वगैरे हे सदरच्या मिळकतीचा व्यवहार अन्य इसमांसोबत करण्याच्या तयारीत आहेत व तसा करार करणेचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे माझे अशिल त्यांच्यावर लवकरच फौजदारी व दिवाणी स्वरुपाची कारवाई करणार आहेत. प्रत्यक्षात माझ्या अशिलांचा याआगोदरच संपूर्ण मिळकतीचा साठेकरार झालेला आहे व तो अस्तित्वात आहे. व माझे अशिल सदरचा व्यवहार साठेकरारात ठरल्याप्रमाणे पूर्ण करण्यास तयार आहेत. त्यामुळे असे असताना माझ्या अशिलांच्या साठेकरारानंतर कुणीही कसलाही करार केला असल्यास अथवा करण्याचा प्रयत्न केल्यास माझे अशिल त्यांच्यावर देखील कायदेशीर कारवाई करतील व तसा केलेला कोणताही करार माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक -२१/०१/२०२६

सही/-
**(अॅड. सुरेंद्र वामन ढवळे)**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल यांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही सदर मिळकतीचे मालक श्री. विश्वनाथ अर्जुन साळवी यांच्याकडून कायमस्वरुपी खरेदीकराराने घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-तिवरे, ता.कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्र. उपविभाग | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ३९/१२/ब | ६-७५-०० | ६७.५० |

वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापुर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा खरेदी/विक्री करार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दिनांक : :-२३/०१/२०२६

सही/-
**अॅड.ज्ञानेश्वर श्री. कुळकर्णी**
कार्यालयीन पत्ता :- शॉप नं. १२५, पहिला मजला,
महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स,
वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह जवळ,
पनवेल,ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६

### कृषी उत्पन्न बाजार समिती, पनवेल
**सहकार नगर, मार्केट यार्ड, पनवेल- रायगड.**
Email : am_panvel@msamb.com

**जाहिर सुचना**

पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सर्व अडते, व्यापारी, दलाल, प्रक्रिया करणारे, हमाल, तोलणार, वखारवाले या पनवेल तालुक्यांचे कार्यक्षेत्रातील अनुज्ञप्ती धारकांस कळविणेत येते की, महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (प्रचलन व सुविधा) अधिनियम १९६३ व नियम १९६७ मधील तरतुदीनुसार बाजार समितीचे नविन वर्ष १ एप्रिल २०२६ पासून सुरु होत आहे. म्हणून आपणांस बाजार समितीने दिलेली अनुज्ञप्ती दिनांक (१/४/२०२५ ते ३१/३/२०२६) ती दिनांक १/४/२०२५ ते ३१/३/२०२६ या वर्षाकरीता नुतनीकरण करुन दिली जाईल याची नोंद घ्यावी. बाजार समितीने नियमन केलेल्या भात, तांदुळ, गुरेढोरे, शेळ्यामेंढया वगैरे, सर्व प्रकारच्या पालेभाज्या, भाजीपाला, कांदा-बटाटा सुरण, याम, कोचरा, रताळी, सर्व प्रकारची धान्ये, कडधान्ये, तेलबिया सर्व प्रकारची फळे, फुले, अंडी-कोंबड्या, मत्स्यव्यवसाय, वनउपज वस्तू,मसाल्याचे पदार्थ, बांबू व जळावू लाकुड, चटण्या, इत्यादींचे खरेदी-विक्रीचा व्यवसाय करणे करीता दिलेल्या अनुज्ञप्तीच्या नुतनीकरणासाठी संबंधीत अनुज्ञप्तीधारकांनी दिनांक १/२/२०२५ ते २८/२/२०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत. दिनांक २८/२/२०२६ नंतर दिनांक ३१/३/२०२६ पर्यंत आलेले अर्ज विलंब आकारासहीत स्विकारले जातील याची नोंद घ्यावी. अडते, व्यापारी दलाल यांना अनुज्ञप्तीच्या फी च्या शेकडा १० टक्के दराने जादा विलंब आकार जितके दिवस अर्ज विलंबाने सादर केला जाईल तितके दिवसाकरीता भरावे लागेल.

नुतनीकरणासाठी करावयाच्या अर्जाचे नमुने बाजार समितीच्या मुख्य कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व वेळेत मिळतील. विहीत माहितीसह भरलेले अर्ज कार्यालयीन वेळेत तेथेच स्विकारले जातील याची नोंद घ्यावी.

पनवेल
दिनांक :- १७/१/२०२६

**(प्रकाश द. नाईक)** — **सचिव**
**(श्री. नारायण गो. घरत)** — **सभापती**
**कृषी उत्पन्न बाजार समिती, पनवेल ता. पनवेल, जि.रायगड**

### जाहीर नोटीस

माझे आशील श्री.पांडुरंग तुकाराम दळी, मु. रूतुजा-रूपाली को.ऑप हौसिंग सोसायटी, रामनाथ रोड, चेंढरे, पो.ता. अलिबाग, जि. रायगड यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितले वरून त्यांचेतर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे.

माझे आशील यांनी मौजे वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नं. १४०/अ/७, क्षेत्र ०.७१.२ हे.आर., आकार रू. ७१२.०० पैसे या मिळकती संदर्भात ०१) श्री.घनश्याम केरू बाटे, मु.फ्लॅट नं. १६०२, अमृत आंगण, १६ वा मजला, जुना मुंबई-पुणे हायवे, कळवा-ठाणे, जि.ठाणे ०२) सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित, पुणे तर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य कार्यालय:- मंडई पुणे, श्रीमंत दगडुशेठ हलवाई गणपती मंदिराजवळ, जि.पुणे आणि सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित, पुणे तर्फे शाखाधिकारी, शाखा कर्वेनगर, पुणे, जि.पुणे, ०३) मे.सत्यजित इंन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड तर्फे संचालक श्री. रणजित शिवाजीराव शितोळे, मु.सी/२, शेफाली,भोसलेनगर, पुणे यांचे विरूद्ध मा.दिवाणी न्यायालय, अलिबाग येथे खरेदीखत रद्द करून मिळणेसह व रक्कम वसुली करीता स्पेशल मुकदमा क्र. ३८/२०१६ चा दावा दाखल केला आहे. सदरचा दावा सध्या प्रलंबित आहे. सदरची मिळकत माझे आशिल यांचे मालकी हक्काची व कब्जे वहीवाटीत आहे. सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित, पुणे तर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि प्राधिकृत अधिकारी हे माझे आशील यांचा हक्क डावलून संदर्भीत मिळकतीची जाहीर लिलावा अन्वये विक्री करण्याचे प्रयत्नात आहेत. त्यास माझे आशिल यांची हरकत आहे.

सबब, या जाहीर नोटीशी अन्वये सर्व लोकांस कळविण्यांत येते की, (०१) सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित, पुणे तर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य कार्यालय मंडई पुणे, श्रीमंत दगडुशेठ हलवाई गणपती मंदिरा जवळ, जि. पुणे ४११००९, (०२) सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित, पुणे तर्फे प्राधिकृत अधिकारी, मु. ११०२ /१०/११, मारणे हाईट्स, बुधवारपेठ, टिळक पुतळ्यासमोर, पुणे ४११००२ यांचेशी संदर्भात मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही स्वरूपाचा खरेदी, विक्री, साठेकरार व अन्य व्यवहार करू नये. तसेच सदरहु मिळकतीचे लिलाव प्रक्रियेत सहभाग घेवु नये. त्यास माझे आशील यांची सक्त हरकत आहे. याउपरही कोणीही बेकायदेशीरपणे व्यवहार केल्यास तो माझे आशील यांजवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. कळावे.

अलिबाग
तारीख २३.०१.२०२६

**अॅड.एस.वाय.बारटके**
मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### महाराष्ट्र शासन
**सहकार विभाग**
**सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग कार्यालय**
**कॉंग्रेस भवन ट्रस्ट इमारत, पहिला मजला, महर्षी कर्वे रोड, पो.ता. अलिबाग, जि. रायगड. पिन कोड ४०२ २०१**
Email ID :arcsalibag@gmail.com

**सहायक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग यांचेसमोर**

अर्ज क्रमांक १६८/२०२५

दि. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग — अर्जदार
तर्फे श्री. वैभव पांडुरंग पाटील, व्यवस्थापक

विरुद्ध

१. श्री. गणेश देवीदास कोळी
मु. रेवसगाव, पो. सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड
२. श्री. सुर्यकांत सदानंद पाटील
मु.कावाडे, पो. हाशिवरे — ... प्रतिवादी
ता. अलिबाग,जि. रायगड
३. श्री. सागर बाळाराम पाटील,
मु. रांजणखार डावली, पो. सारळ ता. अलिबाग, जि. रायगड
४. सौ. प्रगती गणेश कोळी
मु. रेवसगाव, पो. सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमचे कलम १०१ आणि नियम ८६ अन्वये वसुलीस प्राप्त रक्कम रु. ३,७७,५६९/- साठीचा अर्ज.

ज्या अर्थी दि. रायगड जिल्हा मध्यवर्ती सह बँक लि. अलिबाग तर्फे श्री. वैभव पांडुरंग पाटील व्यवस्थापक अलिबाग, यांनी दिनांक १३-११-२०२५ रोजी तुमचे विरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रितसर अर्ज या प्राधिकरणासमोर केलेला आहे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरुन अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी सदर अर्जामध्ये तुम्हा जाब देणार यांचे विरुद्ध रक्कम रुपये ३,७७,५६९/- (अक्षरी रुपये तीन लाख सत्यात्तर हजार पाचशे एकोणसत्तर मात्र) चे वसुली प्रमाणपत्र मिळावे म्हणून विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी नियमाचे नियम ८६ ब नुसार सर्व प्रतिवादीना नोटीस दिनांक २१-११-२०२५ रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने नोटीस देऊन निर्गमित करणेत आली होती. जाब देणार ३ व ४ यांना नोटीस बजावल्याची पोहोच प्राप्त झाली. ०१-११-२०२५ रोजी नोटीस देऊन दि. दि.११-१२-२०२५ सुनावणी ठेवण्यात आली तसेच दि. १८-१२-२०२५ रोजी नोटीस देऊन दि. २९-१२-२०२५ रोजी सुनावणी ठेवण्यात आली परंतु आपण सुनावणीस गैरहजर राहिले. अर्जदाराने जाहीर नोटीस देणेची विनंती केली. त्यानुसार प्रतिवादी यांना जाहीर नोटीस देणेत येते की, दिनांक ०२-०२-२०२६ रोजी दिवसाचे दुपारी १२.३० वा. सहायक निबंधक, सहकारी संस्था अलिबाग यांचे कार्यालय, कॉंग्रेस भवन ट्रस्ट इमारत, पहिला मजला, महर्षी कर्वे रोड, पो. ता. अलिबाग, जि. रायगड पिन कोड ४०२२०१ या कार्यालयात तुम्ही स्वत: हजर राहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासून १० दिवसाच्या आत या प्राधिकरणासमोर सादर करावे.

याकामी तुम्ही गैरहजर राहिलेस किंवा बचाव करणेचा अर्ज/शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस, अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्वीकारली आहेत असे गृहीत धरुन, अर्जाची चौकशी करुन, अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २०-०१-२०२६

**(अनिल पवार)**
**सहायक निबंधक**
**सहकारी संस्था अलिबाग**

### महाराष्ट्र शासन
**सहकार विभाग**
**सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग कार्यालय**
**कॉंग्रेस भवन ट्रस्ट इमारत, पहिल मजला, महर्षी कर्वे रोड, पो.ता. अलिबाग, जि. रायगड. पिन कोड ४०२ २०१**
Email ID :arcsalibag@gmail.com

**सहायक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग यांचेसमोर**

अर्ज क्रमांक १७५/२०२५

दि. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग — अर्जदार
तर्फे श्री. वैभव पांडुरंग पाटील, व्यवस्थापक

विरुद्ध

१) श्री. अजिंक्य विजय खाडे
मु. साखर, पो. आक्षी
ता. अलिबाग, जि. रायगड
२) श्री. विजय नरोत्तम खाडे
मु.साखर, पो. आक्षी — .. प्रतिवादी
ता. अलिबाग, जि. रायगड
३) श्री. मंदार किशोर म्हात्रे
मु. बामणोली पो. थळ
ता. अलिबाग, जि. रायगड
४) श्री. निलेश सुभाष जैसवाल
मु.साखर, पो. आक्षी ता. अलिबाग, जि. रायगड

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमचे कलम १०१ आणि नियम ८६ अन्वये वसुलीस प्राप्त रक्कम रु. ३,१३,०२१/- साठीचा अर्ज.

ज्या अर्थी दि. रायगड जिल्हा मध्यवर्ती सह बँक लि. अलिबाग तर्फे श्री. वैभव पांडुरंग पाटील व्यवस्थापक अलिबाग, यांनी दिनांक १३-११-२०२५ रोजी तुमचे विरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रितसर अर्ज या प्राधिकरणासमोर केलेला आहे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरुन अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी सदर अर्जामध्ये तुम्हा जाब देणार यांचे विरुद्ध रक्कम रुपये ३,१३,०२१/- (अक्षरी रुपये तीन लाख तेरा हजार एकवीस मात्र) चे वसुली प्रमाणपत्र मिळावे म्हणून विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी नियमाचे नियम ८६ ब नुसार सर्व प्रतिवादीना नोटीस दिनांक २१-११-२०२५ रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने नोटीस देऊन दि. ११-१२-२०२५ सुनावणी ठेवण्यात आली तसेच दि. १८-१२-२०२५ रोजी नोटीस देऊन दि. २९-१२-२०२५ रोजी सुनावणी ठेवण्यात आली परंतु आपण सुनावणीस गैरहजर राहिले. अर्जदाराने जाहीर नोटीस देणेची विनंती केली. त्यानुसार प्रतिवादी यांना जाहीर नोटीस देणेत येते की, दिनांक ०२-०२-२०२६ रोजी दिवसाचे दुपारी १२.०० वा. सहायक निबंधक, सहकारी संस्था अलिबाग यांचे कार्यालय, कॉंग्रेस भवन ट्रस्ट इमारत, पहिला मजला, महर्षी कर्वे रोड, पो. ता. अलिबाग, जि. रायगड पिन कोड ४०२२०१ या कार्यालयात तुम्ही स्वत: हजर राहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासून १० दिवसाच्या आत या प्राधिकरणासमोर सादर करावे.

याकामी तुम्ही गैरहजर राहिलेस किंवा बचाव करणेचा अर्ज/शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्वीकारली आहेत असे गृहीत धरुन, अर्जाची चौकशी करुन, अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २०-०१-२०२६

**(अनिल पवार)**
**सहायक निबंधक**
**सहकारी संस्था अलिबाग**

# रासळ ग्रामस्थांच्या लढ्याला यश

## २८ जानेवारीपर्यंत माहिती देण्याचे आश्वासन

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यातील रासळ ग्रुप ग्रामपंचायतमध्ये माहिती अधिकारांतर्गत माहिती देण्यास टाळाटाळ केल्याप्रकरणी अखेर प्रशासनाला नमते घ्यावे लागले आहे. पंचायत समिती स्तरावर मंगळवारी (दि.२०) झालेल्या प्रथम अपिलीय सुनावणीत, येत्या २८ जानेवारीपर्यंत सर्व संबंधित माहिती उपलब्ध करून देण्याचे आश्वासन ग्रामविकास अधिकाऱ्यांनी दिले आहेत. त्यामुळे माहिती अधिकार कार्यकर्ते आणि ग्रामस्थांच्या लढ्याला यश मिळाले आहे.




या सुनावणीसाठी सहाय्यक गटविकास अधिकारी अविनाश घरत उपस्थित होते. माहिती अधिकार कार्यकर्ते व ग्रामस्थ केतन म्हसके यांनी दि.२९ सप्टेंबर २०२५ रोजी ग्रामसभा, मासिक सभांचे इतिवृत्त, बँक स्टेटमेंट आणि कॅश बुकची माहिती मागवली होती. नियमानुसार ३० दिवसांत माहिती मिळणे अपेक्षित असताना ४ महिने उलटूनही माहिती न मिळाल्याने त्यांच्याकडून संताप व्यक्त होत होता. या प्रकरणी प्रशासकीय पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याने मंगळवारी सुनावणी पार पडली. सुनावणी दरम्यान ग्रामविकास अधिकाऱ्यांनी आपली बाजू मांडताना सांगितले की, दोन ठिकाणचा अतिरिक्त कार्यभार असल्याने कामाच्या धावपळीत माहिती देण्यास विलंब झाला. मात्र, अपिलीय अधिकाऱ्यांसमोर त्यांनी २८ जानेवारीपर्यंत माहिती देण्याचे लेखी आश्वासित केले आहे.

> “माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने तसेच त्यासाठी सरपंचांनी ग्रामविकास अधिकाऱ्यावर दबाव आणल्याने रासळ ग्रामपंचायत कारभारात मोठ्या भ्रष्टाचाराचा संशय येत आहे. आता दि.२८ जानेवारीची मुदत देण्यात आली आहे. जर माहिती मिळाली नाही किंवा ती अपूर्ण असल्यास आम्ही हा लढा अधिक तीव्र करू आणि जिल्हा परिषद प्रशासनाकडे दाद मागू.”
> – केतन म्हसके, ग्रामस्थ

### जिल्हा परिषदेकडे दाद मागणार

माहिती देण्याचे आश्वासन मिळाले असले, तरी झालेल्या विलंबाबाबत आणि नियमांच्या उल्लंघनाबाबत ग्रामस्थ समाधानी नाहीत. माहिती मिळाल्यानंतर त्यात काही गैरप्रकार आढळल्यास जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांची भेट घेऊन सरपंच व ग्रामसेवकांवर कारवाईची मागणी करणार असल्याचे केतन म्हसके यांनी सांगितले.

# रवींद्र मांडे यांची बिनविरोध निवड

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

भात गिरण सहकारी प्रक्रिया संस्था लिमिटेड दहिवली या संस्थेच्या अध्यक्षपदाची निवडणूक नुकतीच पार पडली. सहकारी अधिकारी (श्रेणी २) सुनील दागट यांची अध्याशी अधिकारी म्हणून त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत रवींद्र मांडे यांची संस्थेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.



अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारताना रवींद्र मांडे यांनी उपस्थितांना संबोधित केले. यावेळी त्यांनी सांगितले की, संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी आणि संस्थेच्या फायद्यासाठी जे-जे निर्णय घ्यावे लागतील, ते सर्व सहकाऱ्यांच्या विश्वासात घेऊन व संमतीने घेतले जातील. संस्थेचे कामकाज अधिक सक्षम व पारदर्शक करण्यासाठी आपण प्रामाणिक प्रयत्न करू, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सुधाकर घारे तसेच माजी आमदार सुरेश लाड यांचे विशेष आभार मानले. यासह उपस्थित सर्व सहकारी, संचालक मंडळ व संस्थेच्या कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त करत त्यांनी अधिकृतपणे अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला. यावेळी शरद लाड, परशुराम घारे, अनिल रोकडे, बाळू थोरवे, नामदेव मोडक, गोविंद जाधव, महादेव लोंगले, भगवान चव्हाण, नंदकुमार मोरे, प्रविण देशमुख, वंदना देशमुख, छाया वेखंडे आदींसह दीपक धुळे, रुपेश मांडे, रितेश मांडे, सुजल मांडे तसेच सहकार क्षेत्रातील अध्यक्ष सीताराम मंडावले, भरत भासे, हेमंत ठाकरे व भात गिरणीचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निवडक

## हरजीवन शेट यांचे निधन

**माणगाव :** माणगावचे प्रसिद्ध व्यापारी व अपना मेडिकलचे मालक जयवंत उर्फ बच्चूभाई शेट यांचे वडील हरजीवन शेट यांचे बुधवारी (दि.२१) निधन झाले. मृत्यूसमई त्यांचे वय ८७ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, जावई, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने शेट कुटुंबियांबरोबरच मित्रपरिवार यांच्यावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिवावर माणगाव येथील स्मशानभूमीत गुरुवारी (दि.२२) सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा उत्तरकार्य विधी तेरावे रविवार दि.१ फेब्रुवारी रोजी निजामपूर रोड-उतेखोल येथील राहत्या घरी होणार असल्याचे बच्चूभाई शेट यांनी सांगितले.



## मारुती खरडे यांचे निधन

**नागोठणे :** नागोठण्यातील मारुती खरडे (७५) यांचे गुरुवारी (दि.१५) निधन झाले. नागोठण्यातील बांधकाम व्यावसायिक दत्ता खरडे यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात एक मुलगी, दोन मुलगे, जावई, सुना व नातवंडे यांच्यासह मोठा खरडे परिवार आहे. मारुती खरडे यांच्या पार्थिवावर नागोठण्यातील अंबा घाटावरील वैंकुठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे दशक्रिया विधी शनिवारी (दि.२४) सुधागड तालुक्यातील उद्धर येथे, तर उत्तरकार्य मंगळवारी (दि.२७) नागोठण्यातील त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याची माहिती खरडे कुटुंबियांकडून देण्यात आली आहे.



## दहावी-बारावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ



**रसायनी :** नविन शेवा येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयात शिकणाऱ्या इ. १०वी व १२वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ बुधवारी (दि.२१) संस्थेचे संस्थापक माजी आ. मनोहर भोईर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भोईर म्हणाले की, १०वी व १२वी ही आपल्या जीवनाची पहिली व दुसरी पायरी आहे. येथे आपण यशस्वी झालात तर जीवनात पुढे यशस्वी होत जाल. म्हणुन थोडे दिवस टीव्ही, मोबाइलपासून दूर राहा व खुप अभ्यास करून गुणवंत होऊन आपले, गुरुजनांचे, आईवडिलांचे व आपल्या शाळेचे नाव मोठे करा, अशा शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बी.एन. डाकी, गणेश म्हात्रे, सरपंच सोनल घरत, केंद्रप्रमुख म्हात्रे, गावंड, अमृत ठाकूर, मुख्याध्यापक संतोष म्हात्रे यांनी मार्गदर्शन केले. तर, विद्यार्थ्यांनी आपले निरोपाचे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत म्हात्रे यांनी केले. या कार्यक्रमाला नवीन शेवा ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष कमलाकर पाटील, शैलेश भोईर, पोलीस पाटील मनोहर सुतार, शिक्षक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अध्यापकांकडून आठवणींना उजाळा



**कोर्लई :** अलिबाग तालुक्यातील सासवणे येथील डिएड. महाविद्यालयाच्या सन.१९८५ अध्यापकांनी नुकताच सलग सातव्यांदा दोन दिवसीय स्नेहमेळावा साजरा करुन आठवणींना उजाळा दिला. सुरुवातीला उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर सर्व १९८५च्या ग्रुप मधील दिवंगताना श्रद्धांजली वाहण्यांत आली. तसेच, ग्रुपमधील सेवा निवृत्त शिक्षिक रमेश म्हात्रे, प्रतिभा पाटील, विजया गुंजाळ यांना भेट वस्तुदेऊन सन्मानित करण्यात आले. त्यानंतर खोकरी येथील प्रसिद्ध असलेल्या घुमटाला व मुरूड मधील डोंगर माथ्यावर असलेले प्रसिद्ध श्रीदत्तमंदिराला भेट दिली. यादरम्यान, मुरूड-जंजिरा नगरपरिषदेत निवडून आलेले नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रतिभा पाटील, अलका फोंडे, मिनाक्षी महाडिक, प्रियवंदा पाटील, विजया गुंजाळ, माधुरी झेमसे, सुजाता दांडेकर, सुमिता तेलंगे, सुलोचना जामकर, प्रतिभा पाटील, निर्मला शेरमकर, निलवंती पिंगळे, राजेंद्र साखरकर, दत्ताराम म्हात्रे, प्रदिप म्हात्रे, प्रभाकर पाटील, सुनिल राऊत, विश्वजीत म्हात्रे, रमेश म्हात्रे, राजेंद्र म्हात्रे, पांडुरंग आरेकर यांनी विशेष परिश्रम घेतले. तर, सुनिल पाटील यांनी आभार मानले.

# जिंदल रुग्णालयातर्फे तपासणी

**। सुकेळी । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील सुकेळी येथिल बी.सी. जिंदल रुग्णालयाच्यावतीने कोंडगाव येथे शनिवारी (दि.१७) मोफत हृदय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकुण १०८ नागरीकांची जिंदाल रुग्णालयातील डॉ. मनिष रायकवार यांनी मोफत हृदय तपासणी केली. तसेच, विविध आजारांवर तपासणी करून औषधोपचार करण्यात आले.




या शिबिरामध्ये नागरीकांची ईसीजी, रक्तदाब तपासणी, शरीरातील साखरेचे प्रमाण तपासून मोफत औषधे देण्यात आली. तसेच ताप, सर्दी, खोकळा, सांधेदुखी, गुडघेदुखी अशा विविंध आजारांची तपासणी करून औषधे देण्यात आली. त्याचबरोबर पुढील उपचारासाठी डॉ. मनिष रायकवार यांनी नागरीकांना मोलाचे मार्गदर्शन केले. या शिबिराला जिंदल रुग्णालयाचे व्यवस्थापक सर्वेश पांचोली, कमलेश अस्थांना, डॉ. मनिष रायकवार, कोंडगावचे माजी सरपंच अनंत वाघ, सामाजिक कार्यकर्ते अरविंद बुरुमकर, ग्रामसेविका जावळे, शिक्षिका भाटकर, मधुकर मालुसरे, सुधाकर धामणे, वसंत हंबीर, वंदना बुरुमकर, सुनिता साजेकर, किरण सुटे, शरन्या श्रीजीत, मोहीनी जांबेकर, अदिती जंगम, स्नेहल ढाणे, रामदुल्हारे, संदिप चाळके आदी उपस्थित होते.

# वसंत पंचमीवतीने सरस्वती महापूजा

**। उरण । प्रतिनिधी ।**

सालाबाद प्रमाणे या वर्षी वसंत पंचमी उत्सव मंडळ उरणच्या वतीने शुक्रवारी (दि.२३) शहरातील देऊळवाडी येथे धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी सरस्वती महापूजा पार पडणार असल्याचे मंडळाचे अध्यक्ष दिनेश जयसवाल यांनी दिली. शुक्रवारी सकाळी ९ वाजता सरस्वती देवी पूजा, दुपारी २ वाजता कीर्तन व भजन, सायंकाळी ५ वाजता सुंदर कांड पाठ, सायंकाळी ७.३० वाजता महाप्रसाद असे नियोजन करण्यात आले आहे.

# ‘शिवतेज व्यापारी असोसिएशन’ची स्थापना

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण शहरातील व्यापाऱ्यांच्या हक्कांसाठी, एकजुटीसाठी आणि स्वाभिमानासाठी ‘शिवतेज व्यापारी असोसिएशन’ची अधिकृत स्थापना करण्यात आली आहे. या नव्या संघटनेचा नामफलक अनावरण सोहळा शुक्रवारी (दि.२३) सायंकाळी साडेपाच वाजता राजपालनाका येथील राम मंदिरात पार पडणार आहे. या नामफलक अनावरण सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांच्या हस्ते अधिकृतपणे अनावरण करण्यात येणार आहे. त्यामुळे या कार्यक्रमाला विशेष राजकीय आणि सामाजिक महत्त्व प्राप्त झाले आहे. तसेच, ही असोसिएशन माजी आमदार मनोहर भोईर आणि माजी नगराध्यक्ष गणेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत राहणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन शिवतेज व्यापारी असोसिएशन यांच्यावतीने करण्यात आले असून, अरुण पाठारे, फते खान, विनोद कोठारी आणि जयेश मेहता हे संयोजक म्हणून कार्यक्रमाची जबाबदारी सांभाळत आहेत.

# गोखले महाविद्यालयाचे स्नेहसंम्मेलन पार

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

दरवर्षीप्रमाणे गोखले एज्युकेशन सोसायटीचे वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी मंगळागौर, भजन, लघु नाटिका, वैयक्तिक गीत, समूहगीत, वैयक्तिक नृत्य, समूह नृत्य, वाद्य वादन, मुकाभिनय, एकपात्री इत्यादी सांस्कृतिक प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. आपल्या संस्कृतीचे जतन आणि संवर्धन हा यामागील हेतू होता. कार्यक्रमादरम्यान प्रास्ताविकात सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. कल्याणी नाझरे यांनी सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच, प्राचार्य डॉ. विवेक खरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या स्नेहसंम्मेलनात परीक्षक म्हणून समीर सुर्वे आणि डॉ. निलेश चव्हाण यांनी काम पाहिले. तर, सूत्रसंचालनाचे काम अलमास आणि सारा पाटील या विद्यार्थिनींनी केले. कार्यक्रमाच्या शेवठी नवज्योत जावळेकर यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. स्नेहसंमेलन पार पाडण्यामधे सर्व प्राध्यापक व उपप्राचार्य, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परीश्रम घेतले.

# ठेका रद्द करुन निविदा काढा

## नगरसेवक रूपेश पाटील यांची मागणी

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरूड तालुक्यातील रस्त्यांना निधी मिळालेला आहे. असे असतानाही ठेकेदाराकडून नविन रस्ता बनवला जात नसेल तर त्याचा ठेका रद्द करुन नव्याने निविदा काढावी, अशी मागणी ठाकरे गटाचे नगरसेवक रूपेश पाटील यांनी केली आहे. त्यांनी मुरूडच्या सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे कनिष्ठ अभियंता सांगळे यांच्याकडे निवेदन देऊन मागणी केली.



या निवेदनात, मुरुड शहरातील परेश नाका-दरबार रोड ते एकदरा पुलापर्यंतच्या मुख्य रस्त्याला कित्येक ठिकाणी खड्डे पडले आहेत. त्यामुळे या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागते. या रस्त्याचे नुतनीकरण करण्यासाठी २०२३ मध्ये निविदा काढली होती व ती संबंधित ठेकेदाराला मंजुरही झालेली आहे; परंतु, त्याचे काम संबंधीतांकडुन अद्याप सुरू केलेले नाही. तसेच, सार्वजनिक बांधकाम विभाग देखील स्वतः लक्ष घालत नाही. ठेकेदार मुदत वाढ मागत असून आपण देत असल्याने ठेकेदार बिंधास्त आहे. आता मुदत वाढ न देता हा ठेका रद्द करून नव्याने निविदा काढावी. तसेच, आपल्या बांधकाम विभागा मार्फत रस्त्यावर पडलेले खड्डे बुजावेत आणि चांगल्या दर्जाचा रस्ता बनवून नागरिकांना दिलासा द्या, असे म्हटले आहे.

रूपेश पाटील यांनी कृषीवलच्या प्रतिनिधीशी बोलताना, परेश नाक ते एकदरा पुलापर्यंतचा रस्ताला निधी येऊन तीन वर्ष झाली, तरी ठेकेदाराकडुन रस्ता बनविण्यासाठी कोणतीही हालचाल दिसत नाही. अनेक जणांनी निवेदन देऊन सुद्धा काहीही होत नाही. आता तरी सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्यासाठी जागे व्हावे, यासाठी निवदेन दिल्याचे त्यांनी सांगितले.

# प्रतीक्षा बर्डेचे ‘टीईटी’ यश

**सुतारवाडी :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे आयोजित शिक्षक पात्रता परीक्षा महाटीईटी परीक्षा दि.२३ नोव्हेंबर रोजी पार पडली. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने अंतरिम निकाल शुक्रवारी जाहीर केला. त्यात रायगड जिल्हा परिषद शाळा गोवे येथे कार्यरत असलेल्या प्रतीक्षा बडे यांनी घवघवीत यश संपादन केले. त्यांनी इयत्ता १ली ते ५वी साठीचा पेपर १ व इयत्ता ६वी ते ८वीसाठी असलेला पेपर २ या दोन्ही परीक्षा पहिल्याच प्रयत्नात पात्र केल्या आहेत. बडे या ज्ञानार्जनाबरोबर अनेक शैक्षणिक उपक्रम, सातत्याने राबवत असून आपला विद्यार्थी शैक्षणिक व अन्य स्पर्धात्मक परीक्षांमध्ये कसा हिरिरीने भाग घेऊन जास्तीत जास्त गुणांनी कसा यशस्वी होईल, याकडे त्यांचे सातत्याने लक्ष असते. त्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती रोहा, केंद्रातील सर्व शिक्षक शिक्षिका, तसेच ग्रामस्थांनी विशेष अभिनंदन केले आहे.

# नागावमध्ये मतदान जनजागृती कार्यक्रम

**। उरण । प्रतिनिधी ।**

पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणूक जाहीर झाल्यानंतर उरण तालुक्यातील नागाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये बुधवारी (दि.२१) मतदान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला नागाव गावातील बहुसंख्य महिला उपस्थित होत्या.



सुरुवातीला नागाव शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना पाटील यांच्या हस्ते सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बबन पाटील यांनी केले. तर, मार्गदर्शन उरण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी निर्मला घरत यांनी केले.

यावेळी, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक लागली असून ५ फेब्रुवारीला सर्व जनतेने आपापल्या घरामध्ये आजूबाजूला शेजारी, काका, मामा, मावशी, दादा, ताई यांना आपल्या मतदानाचा हक्क बजावण्यासाठी प्रवृत्त करण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता मेहेत्रे यांनी, तर आभार प्रदर्शन संजय होळकर यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गटशिक्षणाधिकारी निर्मला घरत यांच्या नेतृत्वाखाली बबन पाटील, प्रशांत कोळी, संजय होळकर, अजित जोशी, अनिल म्हात्रे, संगीता गावंड, रुपेश पाटील, संगीता मेहेत्रे यांनी मेहनत घेतली.

# ‘विचारांचा वर्ग’ उपक्रम

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

गतवर्षी दि.७ नोव्हेंबर रोजी वंदे मातरम् गीताची १५० वर्ष पूर्ण झाली असून देश ‘वंदे मातरम्’ उत्सव साजरा करत आहे. वंदे मातरम् हे केवळ एक गीत नाही तर आत्मबल जागृत करणारा स्वातंत्र्याचा मंत्र आहे. आपण ब्रिटिशांपासून स्वतंत्र झालो तरी मानसिक गुलामगिरीतून मुक्त होणे अजून बाकीच आहे. स्वतंत्र संग्रामात अखंड भारताचा हा मंत्र समर्पण भावना, जागृती आणि देशप्रेमाची एक दिशा आहे. याच निमित्ताने येत्या २६ जानेवारीला ‘विचारांचा वर्ग’ या संवेदनच्या उपक्रमात राष्ट्रप्रेमाच्या इतिहासाला नव संजीवनी देत, विकसित भारताचे स्वप्न पाहणाऱ्या, विकसित होऊ पाहणाऱ्या नागरिकांसाठी एक खास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. हा कार्यक्रम विनामूल्य असून अलिबाग तालुक्यातील बेलकडे फाट्याजवळील नेहा मीलन बंगलो येथे होणार असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले आहे.

## बोकडविरा येथे कार्यक्रमाची सांगता | भावना घाणेकर यांचे मार्गदर्शन

# एनएसएस शिबिरातून शिक्षणाचे धडे

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून कृतीशील समाज शिक्षणाचे धडे मिळतात, असे प्रतिपादन उरणच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी केले. रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कॉलेज फुंडे महालण विभागातील एन.एस.एस. आयोजित विशेष निवासी शिबिराचा समारोप बोकडविरा येथे पार पडला. त्यावेळी त्या बोलत होत्या.




दि.१३ ते १९ जानेवारी या सात दिवसीय शिबिरात विद्यार्थ्यांनी सामाजिक सेवा, नेतृत्व विकास आणि पर्यावरण जागृतीसह विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. तसेच ग्रामसेवा, आरोग्य जागृती, वृक्षारोपण, सांस्कृतिक कार्यक्रम आणि नेतृत्व कार्यशाळा इत्यादी उपक्रमांचा समावेश शिबिरात दिसून आला. या शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची भावना जोपासली असून, त्यांच्यातील छुप्या क्षमतांना दिशा मिळाली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर होते.

यावेळी आमोद ठक्कर यांनी, एनएसएस सारख्या उपक्रमामुळे तरुण पिढी सामाजिक बदलांचे दूत बनते. विद्यार्थी जीवनात आशा शिबिरांची गरज प्रतिपादित केली हे एक मोठे काम आहे, असे स्पष्ट केले. तसेच, सरपंच अपर्णा पाटील, यशवंत ठाकूर व सूर्यकांत पाटील यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

शिबिराचे अहवालवाचन प्रा. बळीराम पवार यांनी केले. शिबिरातील काही सहभागी स्वयंसेवेकांनी आपली यथोचित मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी एनएसएस प्रमुख प्रा. राम गोसावी यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. योगेश कुलकर्णी यांनी केले. यावेळी ध्रुव पाटील, किशोर नलावडे यांच्यासह ग्रामस्थ व कार्यक्रम अधिकारी डॉ. रत्नमाला जावळे उपस्थित होत्या. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी सरपंच अपर्णा पाटील, उपसरपंच ध्रुव पाटील, ग्राम सुधार मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत पाटील, सचिव श्रीकांत पाटील, सल्लागार यशवंत ठाकूर, मयुरेश पाटील यांचे विशेष मोलाचे सहकार्य लाभले.

# मुलीला सोडून पालकाचे पलायन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

एका ३ वर्षीय लहान अपंग मुलीला तिच्या पालकाने पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात सोडून पलायन केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पनवेल रेल्वे स्टेशन फलाट क्र. ३वर कर्तव्यावर असणाऱ्या पुरुष होमगार्डला एका लहान मुलीच्या रडण्याचा आवाज आला. त्याने तात्काळ जाऊन पाहणी केली असता अंदाजे ३ ते ४ वर्षीय गहूवर्ण रंगीय तसेच अंगात निळ्या रंगाचा टी-शर्ट व ब्राऊन रंगाची फुल नाईट पॅन्ट घातलेली लहान मुलगी विनापालक रडत असताना मिळून आली. या मुलीच्या पालकांचा शोध घेतला असता ते मिळून आले नाही. या मुलीला विचारपूस केली असता तिने फक्त तिचे नाव शिवानी एवढेच सांगितले. त्यानंतर त्या होमगार्डने मुलीला रेल्वे पोलिसांच्या ताब्यात दिले.



रेल्वे पोलिसांनी सिसिटीव्हीद्वारे या घटनेची पाहणी केली असता, त्या लहान मुलीचा संपुर्णतः परित्याग करून तिला उघड्यावर टाकून सोडून निघून गेल्याचे दिसून आले. याप्रकरणी पनवेल रेल्वे पोलिसांनी पालकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या आरोपी व्यक्तीबाबत कोणास काही माहीती मिळताच पनवेल रेल्वे पोलीस ठाणे किंवा महिला पोलीस हवालदार एस. एस. बोराटे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)





## राशीभविष्य

- **मेष** : व्यवसायात उत्तम लाभ होईल. नोकरीत बदलासाठी अनुकूलता राहील. जुने विकार पुन्हा उद्भवतील.
- **वृषभ** : अपेक्षित वार्ता कानी येईल. छोट्या-मोठ्या प्रवासाचे योग आहेत. उपजत गुणांचा विकास होईल.
- **मिथुन** : महत्त्वाची कामं रखडतील. नव्या योजनांना प्रतिकूलता राहील. उधार व्यवहार टाळायला हवेत.
- **कर्क** : अकारण गैरसमज निर्माण होतील. पित्ताच्या विकाराबाबत काळजी घ्यावी. प्रवास शक्यतो टाळावा.
- **सिंह** : अर्थार्जनाचे नवे मार्ग दृष्टीपथात येतील. स्थावर बाबतीत अनुकूलता राहील. कौटुंबिक सौख्य लाभेल.
- **कन्या** : यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात संधी लाभतील. आश्वासनं विचारपूर्वक द्यावीत. प्रकृतीस त्रास संभवतो.
- **तूळ** : व्यवसायात आत्मपरिक्षण गरजेचं ठरेल. धार्मिक कार्याकडे ओढा राहील. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **वृश्चिक** : महत्त्वाच्या कामांकडे दुर्लक्ष करू नका. आर्थिक ओढाताण तात्पुरती राहील. चिंता करू नये.
- **धनु** : ठरलेलं उद्दिष्ट साध्य करू शकाल. वरिष्ठांकडून कामाचं कौतुक होईल. सरकारी कामं नीट होतील.
- **मकर** : घराच्या प्रश्नांबाबत मार्ग निघेल. प्रियजनांचा सहवास लाभेल. ज्येष्ठांनी प्रकृतीकडे लक्ष द्यावं.
- **कुंभ** : प्रतिकूलतेमुळे निराश होऊ नका. पुढील उत्तम संधींसाठी तयार रहा. जोडीदाराची काळजी घ्या.
- **मीन** : महत्त्वाच्या निर्णयात धरसोडपणा टाळावा. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल. प्रकृती उत्तम राहील.

रसगंधा

## खमंग पापड पराठा

आपण वेगवेगळ्या भाज्या घालून पराठा करतो. पण कधी पापड पराठा करुन बघितला आहे का? नसेल तर नक्की करुन बघा. वेगळ्या चवीचा हा पराठा सगळ्यांना वेगळ्या चवीचा आनंद देऊन जाईल.

**सामग्री:** भिजवलेली कणिक, मिरीयुक्त उडदाचे पापड (भाजलेले), तेल, तिखट, ओवा, धणे-जिरे पूड, चवीप्रमाणे मीठ इत्यादी.

**कृती:** सर्वप्रथम कणकेची मोठी पोळी लाटून घ्या. या पोळीवर तेलाचा हात फिरवा आणि नंतर थोडं तिखट, ओवा, धणे-जिरे पूड मीठ पसरवून घ्या. हाताने थोडं दाबून एकसारखं करा. आता त्यावर भाजलेल्या पापडाचा चुरा पसरुन चौकोनी काप पाडून घ्या. आता हे काप एकावर एक या पद्धतीने रचायचे आहेत. चार तुकडे रचल्यावर हलक्या हाताने दाबत रचलेल्या तुकड्यांचा उंडा बनवून घ्या. आता नेहमीप्रमाणे थोडा जाडसर पराठा लाटा. तो बटर, तूप, तेल यापैकी कशावरही खरपूस भाजून घ्या. या पराठ्याला छान पदर सुटतात. पापडामुळे तो खमंग आणि खुसखुशीत होतो. दही, सॉस, लोणचं या कशाबरोबरही छान लागतो.

## २३ जानेवारी

दिनविशेष

- **१९१९** : कवी, नाटककार आणि विनोदी लेखक राम गणेश गडकरी यांचे निधन.
- **१९२३** : हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा जन्म.
- **१९३२** : प्रभातच्या 'अयोध्येचा राजा'ची हिंदी आवृत्ती 'अयोध्या का राजा' मुंबईमध्ये प्रदर्शित.
- **१९८९** : स्पॅनिश चित्रकार साल्वाडोर दाली यांचं निधन.
- **२००२** : वॉल स्ट्रीट जर्नलचा पत्रकार डॅनियल पर्ल याचं कराचीतून अपहरण.

दोस्त हे मस्त

## कांगारूंच्या जगात

कांगारूचे निरनिराळे प्रकार आहेत. त्यापैकीच एक म्हणजे झाडावरचे कांगारू. त्यांचे पुढचे पाय लांब तर मागचे आखूड असतात. त्यांची शेपूटही लांब असते. झाडावर झटपट चढता यावं यासाठी हातांपायांची नखं लांबुळकी असतात. खूप पूर्वी सगळेच कांगारू झाडावर राहात असत. पण हळूहळू ते जमिनीवर आले आणि जमिनीवरच राहू लागले. पण नंतर यातले काही पुन्हा झाडावर गेले आणि झाडावरच राहू लागले. अर्थात हे सगळं काही कोटी वर्षांपूर्वी घडलंय. झाडावरचे हे कांगारू सगळीकडे आढळत नाहीत. घनदाट जंगलात ते राहतात. उत्तरपूर्व ऑस्ट्रेलिया आणि न्यू गयाना या दोनच ठिकाणी ते आढळतात. या कांगारूंच्या तब्बल ११ प्रजाती आहेत. यातलं सर्वात छोटं कांगारू अमेरिकेतील रॅकून या प्राण्याच्या आकाराचं असतं. सर्वात मोठ्या कांगारूचा आकार कुत्र्याएवढा असतो. बळकट पायांमुळे त्यांना झाडावरून खाली सहज उडी मारता येते. हातापायांच्या खरखरीत पंजांमुळे झाडावर चढणं, उतरणं सोपं जातं. पण माकडांप्रमाणे झाडाच्या फांद्यांवर लोंबकळता येत नाही. हे कांगारू बराचसा काळ झाडावर असतात. अन्न शोधण्याच्या निमित्ताने थोड्या वेळासाठी ते जमिनीवर येतात.

### पंचांग

**शुक्रवार, २३ जानेवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
माघ शु. ५ **(वसंत पंचमी)**,
चंद्रराशी : कुंभ,
नक्षत्र : पू. भाद्रपदा, योग : परिघ,
सूर्योदय ७.१७, सूर्यास्त ६.२४

### फॉरवर्डस

**यहाँ ख़्वाईशें अधूरी सबकी सहरा हो या समंदर...**

**क़िस्मत से जीता क़ौन यहाँ मजनू हो या सिकंदर...!**

आरोग्यमंत्र

## महत्त्व प्राणायामाचं

श्वासाची गती कमी असणाऱ्या जीवांचं आयुर्मान अधिक असतं हे आपण जाणून घेतलं. प्राचीन काळात ऋषींच्या हजारो वर्षापर्यंत जिवंत राहण्याच्या तथ्यांवरून सिद्ध होतं की दीर्घायुष्याचं रहस्य मनुष्याच्या श्वासाच्या गतीमध्ये लपलं आहे. म्हणून आपण श्वासाची गती साधण्यासाठी प्रथम श्वास – उच्छश्वासाच्या पद्धतीला समजून घेणं आवश्यक आहे. श्वासाच्या दोरीवर माणसाचं जगणं आणि आरोग्य अवलंबून आहे. श्वास स्थिर, मजबूत असेल तर जीवन स्वस्थ आणि निरोगी असेल. श्वासात जास्त गतिशीलता, तीव्रता आली तर जगण्याची शक्यता कमी होत जातील. हे शास्त्रीय तथ्य आहे कारण श्वासाचा सरळ संबंध शरीराच्या तापमानाशी आहे. क्रोध, आवेश, उत्तेजनाच्या स्थितीमध्ये श्वासाच्या दरात



अशा प्रकारची वाढ होते. खोल श्वास घेण्याचा अर्थ स्पष्ट करताना प्राणविज्ञान विशेषतज्ज्ञ डॉक्टर मेकडॉवल म्हणतात की, 'प्राणायामामुळे फुफ्फुसांनाच नव्हे तर पोटाच्या संपूर्ण पचनसंस्थेला देखील परिपूर्ण पोषण मिळतं. खोल श्वास घेणं हे रक्तशुद्धीसाठी अमूल्य औषध घेण्यासारखं आहे.' यावरुनच प्राणायामाचं महत्त्व लक्षात यावं. मनुष्याची कार्यक्षमता वाढवण्यात तसंच त्यात स्फुर्ती आणि उल्हास जागवण्यात खोल श्वास घेण्याचा अभ्यास अत्यंत महत्त्वाची भूमिका निभावतो. म्हणूनच दीर्घायुष्यासाठी दररोज नियमितपणे प्राणायाम करणं आवश्यक आहे. यामुळे स्वास्थ्यपूर्ण आयुष्याची हमी मिळते.

### फॅशन पॅशन

✻ तुमच्याकडे छानसं लेदर जॅकेट असायला हवं. ते क्षणात तुमचा लूक बदलून टाकतं. विविध ब्रॅण्ड्सच्या ट्रेंडी जॅकेट्समधून तुम्ही साजेस जॅकेट निवडू शकता. थोडं महाग असलं तरी यातली गुंतवणूक फायद्याची ठरेल याबाबत खात्री बाळगा.

✻ हुडीज हा मस्त ऑप्शन आहे. कंफर्टचा विचार करून हुडीजची निर्मिती करण्यात आली आहे. योग्य हुडीजची निवड आणि ते कॅरी करण्याची पद्धत जमली की याच्याइतकं फॅन्सी दुसरं काहीही असू शकत नाही. चिनोज, जीन्स किंवा ट्राऊजर्सवर हुडी कॅरी करता येतात. **(क्रमश:)**

करिअरवाटा

## वापर साध्या वाक्यांचा

सद्यस्थितीत विविध क्षेत्रातील वाढती स्पर्धा लक्षात घेता नोकरीसाठीचा अर्ज किंवा बायोडाटा, रिझ्युम अधिकाधिक आकर्षक आणि नेमका कसा असेल यावर भर दिला जात आहे. तरिही काही बाबी लक्षात घेणं गरजेचं आहे. मुख्यत्वे रिझ्युममधील माहिती शक्यतो विस्तारित स्वरूपात लिहिलेली नसावी. रिझ्युम जितक्या कमी शब्दात लिहिला जाईल तितका उठावदार




दिसतो. रिझ्युममध्ये यापूर्वी काम केलेल्या कंपनीबाबत नकारात्मकता दिसून येता कामा नये. या शिवाय रिझ्युम लिहिताना साध्या वाक्यांचा उपयोग करावा. यामुळे व्याकरण किंवा स्पेलिंगच्या चुका टाळता येतात. चुकांमुळे तुमच्या एकूणच परफॉर्मन्सबाबत गैरसमज होण्याची शक्यता असते. रिझ्युममध्ये बोल्ड किंवा इटालिक स्टाईलच्या शब्दांचा वापर केला जातो. त्यामुळे रिझ्युम उठावदार होत असला तरी तशा शब्दांची संख्या मर्यादितच असावी. तुमचे एकंदर व्यक्तिमत्त्व आणि तुमच्यातील कौशल्य यांचे प्रतिबिंब रिझ्युममध्ये दिसत असते. त्यादृष्टीने अनेक बारीकसारीक गोष्टी लक्षात घ्याया. साधी, सोपी, ओघवती भाषा, कमीत कमी शब्दात दिलेली अधिकाधिक माहिती यामुळे रिझ्युमला वेगळंच वजन प्राप्त होते. त्यावरून रिझ्युम वाचणाऱ्याचं तुमच्याविषयी मत अनुकूल बनतं. रिझ्युम म्हणजे केवळ कागदाचा तुकडा नसतो तर त्यात तुम्हाला योग्य पदावर बसवण्याची क्षमता असते हे लक्षात घ्यायला हवं.

खेचाखेची

## चालतंय!

**नातेवाईक** : काय चहा घेणार की थंड ?

.
.
.

**मी** : चहा होईपर्यंत थंड द्या...

.
.
.

चालतंय...

वेगळं काही

चीनमधल्या शाळेने इथल्या कर्मचाऱ्यांच्या कौटुंबिक आयुष्याचा खूप विचार केला आहे. या शाळेने शिक्षकांसाठी 'लव्ह लीव्ह' ही संकल्पना आणली आहे. यामुळे प्रियकर किंवा प्रेयसीला वेळ देण्याच्या कारणासाठी हक्काची रजा मिळेल. यामुळे नातेसंबंधही सुधारतील आणि अर्थातच याचा सकारात्मक परिणाम शिक्षकांच्या कामावरही होईल. चीनमधल्या जेहिआंग शहरातल्या 'डिंगलान एक्स्पिरिमेंटल मिडल स्कूल' नामक शाळेने ही अनोखी संकल्पना राबवली आहे. इथे शिक्षकांना आठवड्यातले दोन दिवस अर्धवेळ सुटी दिली जाते. यालाच 'लव्ह लीव्ह' असं नाव देण्यात आलं. एकल शिक्षकांसाठी 'लव्ह लीव्ह'ची तरतूद असून विवाहित शिक्षकांना 'फॅमिली लीव्ह'अंतर्गत सुटी दिली जाते.

## छंदांना व्यवसायाची जोड

जाणून घ्या

अनेक महिलांमध्ये उपजत कला-गुण आढळतात. अनेक महिलांना चित्रकला, हस्तकला, मूर्तीकला आवडते. डिझायनिंग, ॲनिमेशन, गेमिंगमध्येही त्यांना रस असतो. पण या छंदांना, कलागुणांना विविध अभ्यासक्रमांच्या माध्यमातून वाव देता येतो. हे अभ्यासक्रम पूर्ण करून छंद, आवडींना व्यवसायाची जोड देऊ शकता.



चित्रकला, हस्तकला, डिझायनिंगसारख्या कलांना 'फाईन आर्टस' म्हटलं जातं. यात बॅचलर, मास्टर्स किंवा पीएचडी करता येते. सोबत वर्षभराचे डिप्लोमा अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. 'बॅचलर इन फाईन आर्टस' साठी चार वर्षं द्यावी लागतात. दोन वर्षाचा मास्टर्स अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर फाईन आर्टसमध्ये पीएचडी करता येते. दूरस्थ शिक्षण पद्धतीनेही फाईन आर्टची पदवी मिळवता येते. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर अनेक संधी प्राप्त होतात. इतर क्षेत्रांमध्ये नोकरी करणाऱ्या महिला फ्री लान्सर म्हणून काम करू शकतात. आपल्या कलाकृतींचं प्रदर्शन भरवू शकतात. जाहिरात कंपन्या, एजन्सी, आर्ट स्टुडिओमध्ये नोकरी मिळू शकते. क्रिएटिव्ह डायरेक्टर, आर्ट डायरेक्टर, २डी/थ्रीडी आर्टिस्ट, क्रिएटिव्ह डिझायनर, ग्राफिक डिझायनर, क्राफ्ट आर्टिस्ट म्हणूनही तुम्ही काम करू शकता.

## सुडोकू ५६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ६ | | ९ | २ | ३ | | १ |
| | ८ | | | | ७ | | | ९ |
| २ | | | | ८ | | | | ५ |
| ३ | ५ | | | | | ८ | | ६ |
| ६ | | | | ५ | | | | ७ |
| ८ | | ९ | | | | | २ | ४ |
| ९ | | | | ४ | | | | ३ |
| १ | | | ६ | | | | ४ | |
| ४ | | ५ | ८ | ३ | | ७ | | |

**टीप -**

✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.

✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ५५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ९ | ३ | ४ | ५ | १ | ७ | २ | ६ |
| ५ | ७ | ६ | २ | ९ | ८ | ४ | १ | ३ |
| १ | २ | ४ | ६ | ७ | ३ | ९ | ८ | ५ |
| ६ | ८ | ९ | ५ | ३ | २ | १ | ४ | ७ |
| ७ | १ | २ | ९ | ४ | ६ | ५ | ३ | ८ |
| ३ | ४ | ५ | ८ | १ | ७ | ६ | ९ | २ |
| २ | ६ | १ | ७ | ८ | ४ | ३ | ५ | ९ |
| ९ | ३ | ७ | १ | २ | ५ | ८ | ६ | ४ |
| ४ | ५ | ८ | ३ | ६ | ९ | २ | ७ | १ |

## शब्दकोडे क्रमांक ५६

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | | ९ | १० |
| | | ११ | | १२ | | | | १३ | | | १४ | | |
| १५ | १६ | | | | | १७ | १८ | | | १९ | | | |
| | २० | | २१ | | | २२ | | | २३ | | | | |
| २४ | | | | | २५ | | २६ | २७ | | २८ | | २९ | |
| | | ३० | | | | ३१ | | | | ३२ | ३३ | | |
| ३४ | ३५ | | | | ३६ | | | | ३७ | | | | |
| | ३८ | | | ३९ | | | | ४० | | | ४१ | | ४२ |
| ४३ | | ४४ | | | ४५ | | ४६ | | ४७ | ४८ | | | |
| | ४९ | | | ५० | | ५१ | | ५२ | | | | ५३ | |
| ५४ | | | ५५ | | ५६ | | | | | ५७ | ५८ | | |
| ५९ | | | | ६० | | ६१ | ६२ | | ६३ | | | | |
| ६४ | | | ६५ | | ६६ | | ६७ | | | | ६८ | | |
| | | ६९ | | | ७० | | | | ७१ | | | | |

**आडवे शब्द :-**
१) स्वत:
४) श्रीविष्णूचे बटु रूप
९) पाप
११) पूर्वज
१३) पृथ्वीवरील सर्व भाग
१५) यमनगरी
१७) चिंतन
१९) प्रख्यात
२०) उंट हाकणारा
२२) सत्ता
२४) आरोप
२६) रविवासर
२९) हात
३०) नगरपाल
३२) फळांपासून केले पेय
३४) मंत्रीमंडळ
३६) आगबोट
३७) भाद्रपद
३८) सामान, वस्तू
४०) वजन
४१) दृष्टी
४३) अथवा, किंवा
४४) पळून जाणे
४७) वयात आलेली कोंबडी
४९) रजा
५०) चकचकीत, स्वच्छ
५३) तेव्हा (ग्रा)
५४) कृष्णसखी
५६) पोपट
५७) व्याजाच्या द.सा.चे विस्तृत नाव
५९) मगरीचे वास्तव्य असलेला समुद्र
६१) करुणा, कीव
६३) चिता
६४) दरवाजा
६५) वात्रट
६७) पाय
६८) एक रंगीत कंदमूळ
६९) वर्ष, सन
७०) मऊच्या विरुद्ध
७१) पांध्रका रंग, कठोर

**उभे शब्द :-**
१) कुंतीचा धनुर्धारी पुत्र
२) सूर्याचे एक नाव
३) काठ, बाजू
४) छोटी वस्ती
५) अतिशय मऊ कापड प्रकार
६) पक्के आश्वासन
७) तारका
८) मांडणी
१०) पुन्हा पुन्हा
१२) मुख, चेहरा
१४) सुंदर तरुणी
१६) रसदार
१८) बाजेची सुती पट्टी
२१) सदोदित, एकसारखे
२३) दीपक
२४) सजावट
२५) तर्क, ठोकताळा
२७) जहर
२८) सैन्याचा मालपुरवठा
२९) केव्हा (हिं.)
३०) हाकलून देणे
३१) विहिरीतून पाणी काढण्याचे चक्र
✻✻✻ गाडगे
३३) पाठवणी
३५) लक्ष्मीचे एक नाव
३७) हिंदुस्थान
३९) पैंजण
४२) पहारेकरी
४५) लक्ष वेधण्याकरता केलेले हावभाव, नट्टापट्टा
४६) मैत्रीण
४८) गणपतीचे एक नाव
४९) चंद्र
५१) मध्यस्थ
५२) वृक्ष
५३)त्या प्रमाणे
५४) गणपतीची आरती लिहिणारे स्वामी
५५) चलनवलन
५८) तोफगाडी
६०) जव, एक बारीक धान्य
६२) मागणारा
६३) तिडीक, लहर
६६) रोखलेली नजर

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बो | ल | प | ट | | त | मा | म | | का | ल | ह | र | ण |
| ल | | सा | प | ट | | ग | त | का | ल | | ज | व | |
| घे | रा | | | क | सा | | ल | वा | | टा | र | | जी |
| व | न | रा | ज | | ख | रा | ब | | का | क | | भा | व |
| डा | | म | न | ध | र | णी | | क्ष | प | ण | क | | न |
| | मी | | ग | | पे | | त | मा | | खा | र | ट | |
| पा | | स | ण | वा | र | | ल | | सा | र | क | | गो |
| रा | म | रा | म | | णी | | वा | प | र | | री | त | |
| | धु | | न | फा | | स | र | | वा | ह्या | त | | दा |
| म | क | र | | या | च | क | | म | न | | | | रो |
| न | र | मा | ई | | र | ट | र | ट | | नि | | अ | दा |
| क | | ना | श | क | | नि | | का | र | खा | न | दा | र |
| व | ल | य | | ब | द | क | र्म | | द | ल | द | ल | |
| डा | | क | स | र | | ट | | का | न | स | | त | ळ |

# नागपुरात भारताचा विक्रमी विजय




| नागपूर | वृत्तसंस्था |
नागपूरच्या मैदानात रंगलेल्या पहिल्या टी-२० सामन्यातील विजयासह टीम इंडियानं न्यूझीलंडविरुद्धच्या टी-२० मालिकेत विजयी सलामी दिली आहे. नाणेफेक गमावल्यावर पहिल्यांदा फलंदाजी करताना भारतीय संघाने न्यूझीलंडसमोर २३८ धावांसह सर्वोच्च धावसंख्या उभारत विक्रमी डाव साधला. या धावांचा यशस्वी बचाव करत टीम इंडियाने पाच सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. भारतीय संघाने दिलेल्या २३९ धावसंख्येचा पाठलाग करताना न्यूझीलंडच्या संघाकडून ग्लेन फिलिप्सने तुफान फटकेबाजी केली. पण तो बाद झाला अन् टीम इंडियासाठी विजयाचा मार्ग सहज सोपा झाला. न्यूझीलंडच्या संघाला ७ बाद १९० धावांवर रोखत टीम इंडियाने ४८ धावांसह विजय अभिषेक शर्मांने स्फोटक फलंदाजीसह केलेल्या ८४ धावांच्या खेळीसह अखेरच्या षटकात रिंकू सिंह याने अवघ्या २० चेंडूत केलेल्या ४ ४ धावांच्या नाबाद खेळीच्या जोरावर भारतीय संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना निर्धारित २० षटकात ७ विकेट्सच्या मोबदल्यात २३८ धावा केल्या होत्या. न्यूझीलंडचा संघ २०० पारच्या लढाईत पुन्हा एकदा अपयशी ठरला. या धावसंख्येचा पाठलाग करताना न्यूझीलंडची सलामी जोडी धावफलकावर एक धाव असताना तंबूत परतली होती. अर्शदीप सिंगनं डेवॉन कॉन्वेला खातेही उघडून न देता दुसऱ्या चेंडूवर तंबूचा रस्ता दाखवला. त्यापाठोपाठ दुसऱ्या षटकात हार्दिक पांड्याने रचिन रवींद्रला आपल्या जाळ्यात अडकले. तो ५ चेंडूत १ धाव करुन बाद झाला.

विक्रमी धावसंख्येचा पाठलाग करताना न्यूझीलंडच्या संघाकडून ग्लेन फिलिप्सची बॅट तळपली. तिसऱ्या विकेटसाठी त्याने टिम रॉबिन्सच्या साथीनं ३० चेंडूत ५१ धावांची भागीदारी रचली. रॉबिन्सन बाद झाल्यावर चॅपमनच्या साथीनं त्याने खेळ पुढे नेला. चौथ्या विकेट्सला फिलिप्स आणि चॅपमन या दोघांनी ४२ चेंडूत ७९ धावांची भागीदारी केली. ग्लेन फिलिप्सने तुफान फटकेबाजीसह टीम इंडियाने दिलेल्या विक्रमी धावसंख्येचा पाठलाग करण्यासाठी जोर लावला. पण शेवटी त्याच्यासह संघ कमी पडला. अक्षर पटेलच्या गोलंदाजीवर तो मोठा फटका खेळताना बाद झाला. त्याने ४० चेंडूत ४ चौकार आणि ६ षटकारांच्या मदतीने ७८ धावांची खेळी केली. त्याच्यापाठोपाठ मार्क चॅपमन २४ चेंडूत ३९ धावा करून माघारी फिरला.

वनडे मालिका गाजवणारा डॅरिल मिचेल मैदानात आला त्यावेळी टीम इंडियाने सामन्यावर मजबूत पकड मिळवली होती. तो फक्त २८ धावांवर शिवम दुबेच्या जाळ्यात अडकला. याशिवाट कर्णधार मिचेल सँटनरनं १३ चेंडूत २० धावा केल्या. आतापर्यंत फक्त एकदाच तेही झिम्बाब्वेच्या संघाविरुद्ध न्यूझीलंडने २०० पेक्षा अधिक धावांचा यशस्वी पाठलाग केला आहे.

## निवडक



### विद्यार्थ्यांना मिळाले कराटेचे धडे

**अलिबाग** : आज कराटेचे प्रमाणपत्र वाटप करताना जय शोतोकान कराटे अँड स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष संतोष कवळे, शाळेच्या मुख्याध्यापिका स्मिता पाटील, उपशिक्षक सुरेंद्र पाटील,राजकन्या साळुंके, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष अनिता पाटील, प्रगती बरे, हरिश्चंद्र आपटे आणि नुकत्याच डिसेंबर मध्ये पंजाब-चंदिगड येथे झालेल्या गतका मार्शल आर्ट राष्ट्रीय स्पर्धेत सिल्व्हर मेडल विजेत्या मानसी पाटील, वीरेंद्र पाटील इत्यादी उपास्थित होते.

### आता युरोपातही ट्वेन्टी-२० लीग

**नवी दिल्ली** : क्रिकेट खेळणाऱ्या आघाडीच्या देशांत पसरलेले ट्वेन्टी-२० लीगचे जाळे आता युरोपातही पोहोचले आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) मान्यतेने यंदा युरोपीय ट्वेन्टी-२० प्रीमियर लीग सुरू करण्यात येणार असून यात ऑस्ट्रेलियाचा विश्वचषक विजेता माजी कर्णधार स्टीव्ह वॉ, अष्टपैलू ग्लेन मॅक्सवेल आदी नामांकितांची सह-मालकी असलेले संघ असतील. स्टीव्ह स्मिथ, मिचेल मार्श यांसारखे खेळाडू या स्पर्धेत खेळणे अपेक्षित आहे. युरोपीय ट्वेन्टी-२० प्रीमियर लीग अर्थात इटीपीएलमधील ॲम्स्टरडॅम (नेदरलँड्स), एडिनबर्ग (स्कॉटलंड) आणि बेलफास्ट (नॉर्दर्न आयर्लंड) येथील फ्रँचायझींच्या मालकांची बुधवारी घोषणा करण्यात आली. ॲम्स्टरडॅम संघाची मालकी स्टीव्ह वॉ, ऑस्ट्रेलियाच्या हॉकी संघाचा माजी कर्णधार जेमी ड्वायर आणि सेंटर फॉर ऑस्ट्रेलिया-इंडिया रिलेशन्सचे माजी मुख्य कार्यकारी अधिक व केपीएमजी ऑस्ट्रेलियाचे माजी भागीदार टीम थॉमस यांच्या नेतृत्वाखालील गटाकडे असेल. एडिनबर्ग संघाची मालकी न्यूझीलंडचे माजी क्रिकेटपटू नेथन मॅककलम आणि काएल मिल्स यांच्याकडे आहे. तसेच ग्लेन मॅक्सवेल, एनआरएमएचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन लुंड आणि धोरणात्मक भागीदार बेलफास्ट संघाचे सह-मालक असतील, असे एका निवेदनाद्वारे जाहीर करण्यात आले. या स्पर्धेचा पहिला हंगाम याच वर्षी खेळविण्यात येणार आहे. अभिनेता अभिषेक बच्चन या स्पर्धेचा सह-संस्थापक आहे.

### ‘विश्वचषकासाठी संघनिवड अवघड’

**नवी दिल्ली** : विश्वचषक स्पर्धेसाठीची संघनिवड सर्वांत अवघड असते, मग ती स्पर्धा कोणत्या प्रारूपातील आहे याने फरक पडत नाही. संघनिवडीत तुम्हाला काही मोठे निर्णय घ्यावे लागतात. अशा वेळी सर्वांना खूश ठेवणे अशक्य असते, असे भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार रोहित शर्मा याने सांगितले. आगामी ट्वेन्टी-२० विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवर रोहितने या स्पर्धेचे प्रसारण करणाऱ्या वाहिनीशी विशेष संवाद साधला. रोहितच्याच नेतृत्वाखाली भारताने २०२४ मध्ये ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेचे जेतेपद पटकावले होते. त्यानंतर त्याने क्रिकेटच्या लघुत्तम प्रारूपातून निवृत्ती घेतली. रोहितने यापूर्वीच्या सर्व ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धांत सहभाग नोंदवला होता. त्यामुळे यंदा ७ फेब्रुवारीपासून सुरू होणारी स्पर्धा बाहेरून पाहणे हा अनुभव जरा वेगळा असेल असे त्याने मान्य केले. त्याच वेळी त्याने कर्णधारपदाचा प्रवास आणि विविध आव्हाने यावरही भाष्य केले. विश्वचषक स्पर्धेसाठी संघनिवड करणे सर्वांत अवघड असते. तुम्हाला सर्वांना खूश ठेवता येत नाही. काही खेळाडूंना वगळावे लागते, त्यामुळे ते नाराजही होतात. मात्र, तुम्ही हा निर्णय का घेतला, हे त्या खेळाडूला सांगणे महत्त्वाचे असते, असे रोहितने सांगितले. यावेळी त्याने श्रेयस अय्यरचे उदाहरण दिले.

### बांगलादेशसाठी पाकचा आटापिटा!

**नवी दिल्ली** : बांगलादेश आणि आयसीसी यांच्यातल्या वादात पाकिस्तान मुद्दाम घुसण्याचा प्रयत्न करतोय. सुरक्षेचं कारण पुढे करून बांगलादेश क्रिकेट बोर्डाने भारतातील सामने श्रीलंकेत हलवण्याची केलेली विनंती आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने फेटाळून लावली. काल १६ पैकी १४ सदस्यांनी बांगलादेशच्या मागणीला विरोध दर्शवला आणि जय शाह यांच्या अध्यक्षतेखाली काम करणाऱ्या आयसीसीने बांगलादेशला २४ तासांची अंतिम मुदत दिली आहे. आता पाकिस्तान क्रिकेट बोर्डानेही बांगालदेशची मागणी मान्य करा अन्यथा आम्ही पण ट्वेंटी-२० वर्ल्ड कप खेळणार नाही, अशी भूमिका घेतल्याचे वृत्त आहे.पाकिस्तानचा माजी कर्णधार राशीद लथिफ याने पाकिस्तान संघानेही ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेतून माघार घ्यायला हवी, अशी भूमिका मांडली आहे. आयसीसीने बांगलादेशची मागणी फेटाळल्याचा निषेध पाकिस्तानने करावा, असे लतिफचे म्हणणे आहे. तो म्हणाला, भारत आणि पाकिस्तान हा सामनाच होत असेल तर वर्ल्ड कप स्पर्धा तिथेच ५० टक्के संपतेय. सध्याच्या क्रिकेट मक्तेदारीला आव्हान देण्याची ही योग्य संधी आहे. पाकिस्तानने बांगलादेशसोबत खांद्याला खांदा लावून उभं राहायला हवं आणि ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेतून माघार घ्यावी. कठोर भूमिका घेण्याची हीच ती वेळ आहे आणि त्यासाठी खंबीर राहायला हवं.लतिफने यावेळी आयसीसीवरही टीका केली.

## देशातील नेमबाजांचा अलिबागमध्ये लागणार कस



- देशातील १९ राज्यांचा असणार स्पर्धेत सहभाग
- राष्ट्रीय स्तरावरील अर्चरी स्पर्धेचे आज उद्घाटन

| अलिबाग | प्रतिनिधी |
रायगड जिल्ह्याचे मुख्यालय असणाऱ्या अलिबाग येथील आरसीएफ स्पोर्ट कॉम्प्लेक्स येथे राष्ट्रीय स्तरावरील फिल्ड इनडोअर अर्चरी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय केमिकल अँड फर्टिलयाझर्स थळ, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, फिल्ड आर्चरी असोसिएशन ऑफ इंडिया आणि फिल्ड आर्चरी असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन केले आहे. देशातील १९ राज्यांमधील सुमारे ६५० नेमबाजांनी आपला सहभाग या राष्ट्रीय स्पर्धेसाठी नोंदविला आहे.

राज्यस्तरावर विजय संपादन करणाऱ्या विविध गटातील महिला आणि पुरुष धनुर्धारांच्या नेमबाजीचा कस अलिबाग येथे होणाऱ्या स्पर्धेत पहावयास मिळणार आहे. रायगड जिल्ह्याच्या मुख्यालयातील आरसीएफ कुरुळ येथील स्पोर्ट कॉम्प्लेक्समध्ये राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धा रंगणार आहे. या स्पर्धेमध्ये ७ वर्षांखालील, १० वर्षांखालील, १४ वर्षांखालील, १७ वर्षांखालील, १९ वर्षांखालील, वरिष्ठ गट आणि वरिष्ठ अनुभवी धनुर्धर गट असे गट खेळवले जाणार आहेत. ही स्पर्धा महिला आणि पुरुष अशी खेळवली जाणार आहे.

स्पर्धेचा उद्घाटन सोहळा शुक्रवारी (दि.२३) सकाळी ११ वाजता आरसीएफ स्पोर्ट कॉम्प्लेक्स कुरुळ अलिबाग येथे होणार आहे. या स्पर्धेत नाईन स्पॉट नावाचा धनुर्विद्या स्पर्धेतील प्रकार प्रमुख आकर्षण ठरणार आहे. या स्पर्धेत नाईन स्पॉट प्रकार ५ गटात खेळवला जाणार आहे. यामध्ये १० वर्षाखालील, १४ वर्षाखालील, १७ वर्षाखालील आणि १९ वर्षाखालील प्रत्येक गटासाठी प्रथम पारितोषिक २५ हजार, द्वितीय पारितोषिक १५ हजार आणि तृतीय पारितोषिक १० हजार रुपये असणार आहे. तर वरिष्ठ गटासाठी प्रथम पारितोषिक १ लाख रुपये, द्वितीय पारितोषिक ५० हजार रुपये आणि तृतीय पारितोषिक २५ हजार रुपये असणार आहे.

स्पर्धेचा उद्घाटन सोहळ्यासाठी राष्ट्रीय केमिकल अँड फर्टिलायझर्सचे कार्यपालक निदेशक हिरडे, रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, राष्ट्रीय केमिकल अँड फर्टिलायझर्सचे चिफ मॅनेजर ॲडमिन महेश पाटील, फिल्ड आर्चरी असोसिएशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष सीताराम चव्हाण, उपाध्यक्ष संजय पिटवा, सह सचिव रितिका नायर, उपाध्यक्ष अनुप देढे, उपाध्यक्ष मनीष जेडली आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## क्रिकेट चषकाचा मानकरी ठरला देवलाई देवी चिकणी



| पाली | प्रतिनिधी |
समृद्धी ग्रुप नागोठणे विभाग यांच्या वतीने ओपन नाईट बॉक्स अंडआर्म क्रिकेटचे सामने नुकतेच आयोजित करण्यात आले होते.

या सामन्याचा प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला देवळाई देवी चिकणी संघ तर दुसऱ्या क्रमांकावर जोगेश्वरी नगर अ संघाला समाधान मानावे लागले. तृतीय क्रमांक कानिफनाथ नागोठणे ब संघाने पटकावला.

मोठ्या उत्साहात पार पडलेल्या क्रिकेट चषकाचे उद्घाटन किशोर जैन, सुप्रिया संजय महाडिक सरपंच ग्रा. पं. नागोठणे, दिलीप टक्के, संतोष कोळी, उदय जवके आदी मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. या क्रिकेट चषकासाठी युवा नेते सुमित काते मनोज खांडेकर, अनिल डाकी, संजय महाडिक, सचिन कळसकर, अतुल काळे, शेखर गोळे, धनंजय जगताप, नाना बडे, सुनिल सुटे, विजय पाटील, दिपक आवाद, पप्पू शेठ, पोरवाल, वाय के माळी, के.टी शिर्के, भरत गिजे, ज्ञानेश्वर साळुंखे, आदी मान्यवरांनी या सामान्यांना भेट देऊन आयोजकांना शुभेच्छा दिल्या. मान्यवरांच्या हस्ते विजेत्या तिन्ही संघांना रोख रक्कम व आकर्षक चषक देऊन सन्मानित करण्यात आले. समृद्धी ग्रुपचे अध्यक्ष अजय सितापराव यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पदाधिकारी व सदस्यांनी खूप मेहनत घेऊन हे सामने यशस्वी पार पाडले.

## इंग्लंडच्या बेन मायेसने रेकार्ड नोंदवला!



| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |
१९ वर्षांखालील वर्ल्ड कप स्पर्धेत इंग्लंडच्या बेन मायेसने विश्वविक्रमी कामगिरी करून दाखवली. वैभव सूर्यवंशीकडून अशा पराक्रमाची प्रतीक्षा असताना इंग्लंडच्या मधल्या फळीतील फलंदाजाने स्कॉटलंडविरुद्ध वर्ल्ड रेकॉर्ड नोंदवला. १९ वर्षांखालील वर्ल्ड कप स्पर्धेत सर्वोत्तम वैयक्तिक धावसंख्येचा विक्रम त्याने नावावर केला. मायेसचे द्विशतक थोडक्यात हुकले असले तरी त्याने मोठी खेळी करून भारताच्या वैभव सूर्यवंशीचा विक्रम मोडला.

स्कॉटलंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. तिसऱ्या षटकात बेन डॉवकीन्सला (५) बाद करून स्कॉटलंडच्या गोलंदाजांनी चांगली सुरूवात केली. पण, जोसेफ मूर्स व बेन मायेस यांनी दुसऱ्या विकेटसाठी १८८ धावांची भागीदारी केली. मूर्स ६५ चेंडूंत ५ चौकार व ४ षटकारांसह ८१ धावांवर माघारी परतल्यानंतर मायेसने मोर्चा सांभाळला. त्याने कर्णधार थॉमस रेवसह ( २२) ४७ धावा जोडल्या.

## कोलाड संघाचा कबड्डीत विजय

| कोलाड | प्रतिनिधी |
कॉलेजच्या मैदानावर दमदार खेळाचे प्रदर्शन करत तटकरे पॉलिटेक्निक, कबड्डी संघाने झोनल स्तरावरील कबड्डी स्पर्धेत विजय मिळवला असून, आता हा संघ पुणे येथे होणाऱ्या स्टेट लेव्हल कबड्डी स्पर्धेत रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. संघाच्या या यशामागे खेळाडूंची कठोर मेहनत, शिस्तबद्ध सराव तसेच प्रशिक्षक व मार्गदर्शकांचे मोलाचे मार्गदर्शन कारणीभूत ठरले आहे. संपूर्ण स्पर्धेत संघाने उत्कृष्ट सांघिक खेळ, आक्रमक चढाया आणि भक्कम बचाव यांच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजवले.

## अत्याधुनिक स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स हवे : महेंद्र घरत



| उरण | प्रतिनिधी |
पनवेल तालुक्यात सर्वांत जुने रयत शिक्षण संस्थेचे महात्मा ज्योतिबा फुले कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय आहे. या महाविद्यालयामुळे लाखो विद्यार्थी घडलेत. महाविद्यालयाच्या वार्षिक क्रीडा स्पर्धांचे उदघाटन मंगळवारी (ता. २०) मोठ्या उत्साहात करण्यात आले. या क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार यांच्या हस्ते झाले.

यावेळी महेंद्र घरत म्हणाले, मी १९८१ मध्ये या महाविद्यालयात प्रवेश घेतला. तेव्हा खेळाबाबत फार सुविधा नव्हत्या. त्या मानाने आता निश्चितच प्रगती आहे. मात्र कालानुरूप महाविद्यालयाची इमारत आणि सुसज्ज स्पोर्टस कॉम्प्लेक्स हवे. आपल्या महाविद्यालयाचा इतिहास उज्ज्वल आहे. त्यामुळे आता कालानुरूप चेहरामोहरा बदलायलाच हवा.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर म्हणाले, वार्षिक क्रीडा स्पर्धांत महाविद्यालयाच्या स्टाफलाही आम्ही संधी देतो. कारण विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे. महेंद्र घरत यांच्याकडून फिटनेस शिका, कारण आजही ते नियमित व्यायाम करतात आणि क्रिकेटही खेळतात. आयुष्यात समयसूचकता हवी. आपल्या महाविद्यालयाच्या जडणघडणीत अनेक माजी विद्यार्थ्यांचे योगदान खूप मोठे आहे.

करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार म्हणाले, मी याच महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे. ज्यावेळी महाविद्यालयाच्या विकास कामाबाबत माझ्या सहीसाठी पत्र आले, तेव्हा मी अक्षरशः भारावून गेलो होतो. हे परमभाग्य मला लाभले. त्यामुळे रेल्वे ट्रॅक पुलाचे काम मार्गी लागेल, वाहतूक प्रश्न सुटेल. महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी मला शक्य असेल ते मी करणारच.

यावेळी जिमखाना कमिटीच्या वतीने राज्यस्तरीय कुलाबा जीवनगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांचा आणि आगरी समाज भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल महेंद्र घरत यांचा सन्मान करण्यात आला.

## क्रिकेटपटूच्या दोन्ही किडन्या फेल

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |
बंगालचा युवा क्रिकेटपटू आकाश बिस्वास हा जीवन आणि मृत्यूशी संघर्ष करत आहे. आकाश याचे दोन्ही मुत्रपिंड निकामी झाले असून, डॉक्टरांनी त्याला तात्काळ मुत्रपिंड प्रत्यार्पण शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला आहे. मात्र यासाठी येणारा प्रचंड खर्च उभा करणे कुटुंबियांसाठी मोठं आव्हान बनलं आहे.

बंगालचे प्रशिक्षक आणि भारताचे माजी क्रिकेटपटू लक्ष्मीरत्न शुक्ला हे आकाश याच्या मदतीसाठी पुढे आला आहे. त्यांनी आकाश बिस्वास या युवा क्रिकेटपटूचे प्राण वाचवण्यासाठी त्याच्या मदतीसाठी वैयक्तिकरीत्या पुढाकार घेण्याचं आवाहान पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना केलं आहे.क्लबच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, आकाश बिस्वास याची प्रकृती चिंताजनक आहे.

आकाशचे दोन्ही मुत्रपिंड आता निकामी होत आले आहेत. आता त्याचे प्राण वाचवण्यासाठी मुत्रपिंड प्रत्यार्पण करणे हाच एक पर्याय असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

त्याच्या आईची किडनी त्याच्यासोबत जुळली आहे. मात्र शस्त्रक्रिया आणि उपचारांचा खर्च खूपच जास्त आहे. तसेच तो कुटुंबियांना परवडणारा नाही.

### न्यूझीलंडच्या स्टार फलंदाजाने दिला धक्का, रोहित शर्मालाही बसला फटका

## विराटचे वनडे फलंदाजीतील संस्थान खालसा

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |
भारतीय संघाचा स्टार फलंदाज विराट कोहली याचे वन डे फलंदाजांमधील अव्वल स्थान निसटले आहे. न्यूझीलंडचा स्टार फलंदाज डॅरिल मिचेल हा नंबर वन फलंदाज बनला आहे. विराटची दुसऱ्या स्थानी घसरण झाली आहे. हिटमॅन रोहित शर्मालाही धक्का बसला आहे.

भारत-न्यूझीलंड यांच्यातल्या तीन सामन्यांच्या वन डे मालिकेत मिचेलने सर्वाधिक ३५२ धावा केल्या. त्यात दोन शतकं व १ अर्धशतकांचा समावेश होता. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीची आयसीसीने दखल घेतली आणि तो अव्वल स्थानी विराजमान झाला. विराटने तिसऱ्या वन डेत शतकी खेळी करून भारताच्या विजयासाठी शर्थीचे प्रयत्न केले होते, परंतु संघ हरला. विराटने या मालिकेत २४० धावांसह दुसरे स्थान पटकावले. त्याने १ शतक व १ अर्धशतक झळकावले होते.मिचेलने तिसऱ्या वन डेत झळकावलेले शतक हे त्याचे नववे शतक ठरले. ३४ वर्षीय मिचेलने



वन डे क्रिकेटमध्ये सर्वात वेगाने ९ शतकं पूर्ण करणाऱ्या खेळाडूंमध्ये चौथे स्थान पटकावले. त्याने ५४ डावात हा पराक्रम केला, त्याच्यापुढे इमाम उल हक (४८), हाशिम आमला (५२) व क्विंटन डी कॉक ( ५३) आघाडीवर आहेत. या मालिकेत मिचेलने ३५२ धावा केल्या, ज्या तीन सामन्यांच्या वन डे मालिकेत फलंदाजाकडून झालेल्या तिसऱ्या सर्वोत्तम धावा ठरल्या. बाबर आझम ( ३६० धावा वि. वेस्ट इंडिज) आणि शुभमन गिल (३६० धावा वि. न्यूझीलंड) हे या विक्रमात आघाडीवर आहेत.

मिचेलने ही मालिका गाजवल्यानंतर वन डे फलंदाजांमध्ये त्याचे रेटिंग पॉइंट्स ८४५ इतके झाले आहेत आणि विराट (७९५) दुसऱ्या स्थानावर घसरला. अफगाणिस्तानच्या इब्राहिम झाद्रानने ७६४ पॉइंट्ससह रोहितला (७५७) चौथ्या क्रमांकावर ढकलले. रोहितला किवींविरुद्धच्या मालिकेत काही खास कामगिरी करता आली नाही. भारताचा कर्णधार शुभमन गिल (७२३) पाचव्या क्रमांकावर आहे. लोकेश राहुलने (६७०) एका स्थानाच्या सुधारणेसह टॉप १० मध्ये एन्ट्री घेतली आहे. श्रेयस अय्यर एक स्थान घसरून ११ व्या क्रमांकावर गेला. गोलंदाजांमध्ये भारताचा कुलदीप यादव तिसऱ्या क्रमांकावरून सातव्या क्रमांकावर घसरला आहे. श्रीलंकेचा मथिश तिक्षणा, दक्षिण आफ्रिकेचा केशव महाराज, नामिबियाचा बेर्नार्ड श्कोल्त्झ आणि ऑस्ट्रेलियाचा जोश हेझलवूड यांनी आपापल्या क्रमवारीत सुधारणा करताना ३ ते ६ क्रमांक पटकावला. अफगाणिस्तानचा राशिद खान व इंग्लंडचा जोफ्रा आर्चर अनुक्रम पहिल्या व दुसऱ्या क्रमांकावर आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)